अध्यात्म

अ ५५८८५
३५१.१८ विo

स्थळप्रत
म.ग्रं.सं.ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय,
नं.
ता.
ठाणे.

जगाद्धितेच्छु'

ग्रंथ संग्रहा
नं.
ता.
ठाणे.

श्री

# ारायणभावदीपिका

## भगवद्गीतासमश्लोकी.

हें पुस्तक

**वासुदेव चिंतामण नातु कासर**

ं० कोंकण रेव्हेन्यूसर्वे यांणीं नित्यस्मरणांत

तयार केलेलें

**ा. सं. वामन एकनाथ शास्त्री केमकर**

ूनिंग कालेजचे संस्कृताध्यापक ह्यांनीं तपासिलें,

तें

भाविक, जिज्ञासू व गुणज्ञ लोकांकरितां

पुणें येथें

जगाद्धितेच्छु' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

**शके १८२०, आवृत्ति १ ली.**

**किंमत १। सव्वा रुपया.**

८६७ चा आक्ट २५ प्रमाणें पुस्तक रजिस्टर करून सर्व
प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें आपलेकडे ठेविले आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय

संता

तद्विश्वरूपेऽर्पण

स्व... अ. ५. ले. सं.
मराठी ग्रंथ संग्रहालय ... ग्रंथांक ... ता. ...

श्रीराम

# अथ श्रीनारायणभावदीपिकारम्भः

## मंगलाचरण.

वसंततिलका.

**स्वानंदहेतुमखिलश्रुतिसारमेकं ।**
**विश्वाश्रयं विदिततत्त्वमनंतमाद्यम् ॥**
**रामाभिधं विमलकीर्तिकरं महांतं ।**
**नारायणं नरसखं गुरुमानतोऽस्मि ॥ १ ॥**

आत्मानंदाचा किंवा सर्व मांगल्याचा मुख्य हेतु, सर्व वेदोपवेदार्थसारभूत, एक, दृश्य जगाचा आश्रय, सर्वज्ञ, ज्याचा कोणत्याही प्रकारें कोणास अंत लागला नाहीं, लागत नाहीं, व लागणार नाहीं असा, ज्याचा आदिकालही कोणाला ठाऊक नाहीं तो, सर्वांच्या अगोदरचा, साऱ्या देहधारी जीवांना दृश्य विषयांत किंवा योगियांना आपलेच ठायीं रमविणारा, राम नामक आपला गुरु अथवा पवित्र आणि तारक अशी रामायणकीर्ति पृथ्वीवर प्रसृत करणारा, महापुरुष, नार ह्मणजे जगांतले सारे दृश्यभास ते ज्याचें अयन ह्मणजे अस्तित्वाची खूण आहे असा, जीवरूपी नरांचा हितकर्ता सखा, आणि बुद्धिदाता गुरु जो परमात्मा नारायण त्याला मी आदरपूर्वक नमस्कार करितों.

**यस्याश्रयेण सकलाः प्रभवंति विद्या ।**
**लोके प्रकाशयितुमर्थनिधिं प्रवृत्ताः ॥**
**भूत्वा चरंति भुवनस्य हितं सदा तं ।**
**नारायण... ...नतोऽस्मि ॥ २ ॥**

ज्याच्या आश्रयानें सर्व प्रकारच्या विद्या उत्पन्न होतात आणि लोकांत अर्थांचा ठेवा प्रकाशित करण्याकरितां प्रवृत्त होऊन चतुर्दश भुवनांचें हित करितात, असा जो जीवांचा सखा आणि उपदेशक परमात्मा नारायण त्याला मी आदरपूर्वक नमस्कार करितों.

प्रस्तावना पृथ्वी

**प्रलभ्य भुवि मानवीं तनुमिदं वृथैवं गतं ।**
**निजायुरिति मानसेन नु विचिंत्य नित्यं मया॥**
**कृता सुकृतदीपिका हृदि निधाय नारायणं ।**
**वसंततिलकोद्भवा भवभयौघविच्छित्तये ॥३॥**

पृथ्वीवर हें मनुष्यशरीर प्राप्त होऊन, आपलें आयुष्य फुकट गेलें असा मनानें वारंवार नित्य विचार करून, संसारसंबंधी भयप्रवाहाचा नाश होण्यासाठीं मीं, छंदःशास्त्रांतील वसंततिलका वृत्तांत उद्भव पावलेली, अज्ञान अंध तमाचें निवारण करून श्रीनारायणाचा ऐक्यभाव दाखविणारी, "श्रीनारायणभावदीपिका" नांवाची ( श्रीमत् भगवद्गीतेची समश्लोकी टीका ) आपले हृदयांत व तिचे प्रत्येक पद्यांत नारायणाचें स्मरण ठेवून ही पुण्याची दिवटी प्रकाशित केली आहे.

शालिनी.

**श्लोके श्लोके नाममंत्रं निधाय । टीकां कृत्वा सन्महाराष्ट्रगीर्भिः ॥ गीतार्थोयं ह्यादिनारायणस्य । प्रीत्यर्थं तद्विश्वरूपेऽर्पयामि ॥ ४ ॥**

दर एक श्लोकांत नारायणाचा नाम मंत्र कायम ठेवून चांगल्या महाराष्ट्र ( मराठी ) वाणीनें टीका करून हा श्रीमद्भगवद्गीतेचा अर्थ त्या आदिनाराय-णाच्या प्रीतीसाठीं त्याच्या विश्वनामक जगत्स्वरूपाला मी समर्पण करितों.

उपजाति

**अतःपरं प्राकृतभाषया वै वक्ष्यामि नाराय-णभावदीपं । प्रपंचसंमोहतमोपहत्यै । नत्वा गुरुं सज्जनतुष्टयेऽहं ॥ ५ ॥**

आतां येथून पुढें प्राकृत म्हणजे मराठी भाषेंत, प्र-पंचाच्या मोहानें उत्पन्न होणारे अज्ञानाचा नाश होण्यासाठीं व सज्जनांचे मनाचा संतोष होण्यासाठीं श्रीसद्गुरूला वंदन करून हा नारायणभाव दीप–नांवाचा गीतार्थ वर्णन करितों.

अस्य श्रीभगवद्गीतामालामंत्रस्य भगवान्वेदव्यास ऋषिः ॥ अ-नुष्टुप् छंदः ॥ श्रीकृष्णः परमात्मा देवता ॥ अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषस इति बीजम् ॥ सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रजेति शक्तिः ॥ अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुच इति कीलकम् ॥ नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावक इत्यंगुष्ठाभ्यां नमः ॥ न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुत इति तर्जनीभ्यां नमः ॥ अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव चेति मध्यमाभ्यां नमः ॥ नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातन इत्यनामिकाभ्यां नमः ॥ पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रश इति कनिष्ठिकाभ्यां नमः ॥ नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि चेति करतलकरपृ-ष्ठाभ्यां नमः ॥ इति करन्यासः ॥ **एवं हृदयादि ॥**

## अथ ध्यानम्

पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्ये महाभारते ॥ अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनीमंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ १ ॥

पार्थाला उपदेशिली प्रभु तया नारायणानें स्वयें । जी व्यासें रचिली पुराणमुनिनें श्रीभारतामाजि हे ॥ अद्वैतामृत वर्षणार अठरा सर्गी अई! सर्वदा । त्या तूझ्या भवतापहारि भगवद्गीते! जडूं सत्पदा ॥ १ ॥

नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविंदायतपत्रनेत्र । येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥ २ ॥

महामते तूज नमो पवित्रा । हे व्यास नारायण पद्मनेत्रा ॥ जेणें तुवां भारत तैल संगें । हा लाविला ज्ञानदिवा प्रसंगें ॥ २ ॥

प्रपन्नपारिजाताय तोत्रवेत्रैकपाणये ॥
ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥ ३ ॥

नारायणाख्य शरणागत पारिजात । जो वेत्रयुक्त धरि चाबुकही करांत ॥ योगेश कृष्ण नमुं तो निर्जबोधरूपी । गीतामृताख्य—पयदोहक सुस्वरूपी ॥ ३ ॥

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ॥
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥४॥

---

१ अर्जुनाला. २ प्राचीन ऋषीनें. ३ वृष्टि करणार. ४ अध्यायांनीं. ५ नारायणनामक. ६ शरणागताचा कल्पवृक्ष. ७ वेत, ८ आत्मज्ञानरूपी.

नारायणादि सकलश्रुंति कामधेनू । त्या दोहणार
ळी पट्टु नंदसूनू॥ सद्वत्स अर्जुन सुधी नर तोचि भो-
क्ता। गीतामृत प्रियसखा पेय पाजि भक्ता ॥ ४ ॥

**वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ॥**
**देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ ५ ॥**

श्रीवासुदेव वसुदेवसुतादिदेव । चाणूरकंसमद-
नाशक तो सदैव ॥ नारायण प्रभु नमूं सुत देवकीचा
स्वानंददायक जगद्गुरु कृष्ण साचा ॥ ५ ॥

**भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गांधारनीलोत्प-**
**ला शल्यग्राहवती कृपेण वहिनी कर्णेन**
**वेलाकुला ॥ अश्वत्थामविकर्णघोरमकरा**
**दुर्योधनावर्तिनी सोत्तीर्णा खलु पांडवै**
**रणनदी कैवर्तकः केशवः ॥ ६ ॥**

भीष्मद्रोण तटें जयद्रथजळीं पद्में निळीं ते कुरूं
शल्यादी सुसरी गती कृप जिथें कर्णादि लाटा गुरू ॥
अश्वत्थाम-विकर्ण मत्स्यहि महा आर्वर्त दुर्योधन । ती
पंडूसुतिं लंघिली रणनदी नावाडि नारायण ॥ ६ ॥

**पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थगंधोत्क-**
**टं नानाख्यानककेसरं हरिकथासंबोध-**
**नाबोधितम् ॥ लोके सज्जनषट्पदैरहरहः**
**पेपीयमानं मुदा भूयाद्भारतपंकजं कलिम-**
**लप्रध्वंसि नः श्रेयसे ॥ ७ ॥**

व्यासाचें वच शुद्ध सारस महागीतार्थ–गंधें खुले ।
नानाख्यानक–केसरें हरिकथा संबोधनांहीं फुले ॥

---

१ वेद. २ कुशल. ३ पुत्र. ४ सुबुद्धि मनुष्य. ५ दुग्ध. ६ कौरव.
७ थोर. ८ भोवरा. ९ कमळ.

लोकीं सज्जन–भृंग–सेवित सदा नारायणासंगती । होवो भारत पद्म तें कलिमल[1]प्रध्वंसि माझ्या हितीं ॥ ७ ॥

मूकं करोति वाचालं पंगूल्लंघयते गिरीन् ॥
यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवम् ॥ ८ ॥

मूकासि वक्ताहि करी जनांत । कीं पांगुळा चाळवि डोंगरांत ॥ ज्याची कृपा मी नमितों तयाला । स्वानंद नारायण माधवाला ॥ ८ ॥

यं ब्रह्मा वरुणेंद्ररुद्रमरुतः स्तुन्वंति दिव्यैःस्तवै-
र्वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायंति यं सामगाः ॥
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यंति यं योगिनो-
यस्यांतं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः९

सु [2]स्तोत्रें स्तविती मरु[3]द्वरुण ज्यां [4]ब्रह्मेंद्र शंभू
मग । वेदीं सांग पदक्रमोपनिषदीं गाती ज-
या सामगे[5]॥ योगी तद्गत चित्त ठेवुनि जया
नारायणा पाहती । ज्याचा अंत सुरासुरां[6]-
सि न कळे त्या वंदुं देवाप्रती ॥ ९ ॥

इति ध्यानम्.

आतां येथुनि जी महाभगवती श्रीमन्महा-
भारतीं । वर्णी सत्यवती–प्रियात्मज अति
प्रेमें सुभक्तांप्रती॥ गीता सप्तशती प्रसिद्ध ज-
गतीं दावोनिया संगती । वाखाणीन य-
थामति स्मरुनि ती नारायण प्राकृतीं॥१०॥

---

१ पातकाचा नाश करणारें. २ उत्तम स्तोत्रांनीं. ३ वायु आणि वरुण. ४ ब्रह्मदेव आणि इंद्र. ५ साम गायन करणारे. ६ देवदैत्यांस.

# अथ श्रीनारायणभावदीपिकाप्रारंभः

## अध्याय १ ला.

### धृतराष्ट्र उवाच.

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ॥
मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

श्री संजयाप्रति तदा धृतराष्ट्र बोले । क्षेत्रीं पवित्र कुरुच्या कलहार्थ आले । मत्पुत्र पंडुसुतही मिळवोनि मेळे । नारायण स्मरूनि तें वद काय झालें ॥ १ ॥

### संजय उवाच.

दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ॥
आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥

[2]तो बोलिला बघुनि पांडवसैन्य डोळां । दुर्योधनें र-चित तैं गुरुपासिं आला । आणी वदे वचन भूपैति रा-ज्यकामी । नारायणापरिसें जाणुनि बोलका मी ॥२॥

पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ॥
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥

पाहें गुरो तुमुल ही चमु पांडवांची । आहे तुझ्याच

१ खरेपणानें. २ संजय. ३ दुर्योधन. ४ श्रीकृष्णाहून. ५ आपण. ६ तुंबळ. ७ फौज.

ग्रंथ संग्रह नं. ता.

रचना द्रुपदात्मजाची[1]। सेनापती चतुर तो तव शिष्य साजे। नारायणात्मक गुरुत्व तुझें विराजे ॥ ३ ॥

**अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि।**
**युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥**

येथें महाभुज पराक्रमशालि शूर। भीमार्जुनासम महारथि आणि वीर। आले जमोनि युयुधान[2] विराट हेव। नारायणप्रमुख[3]ही द्रुपदादि राव ॥ ४ ॥

**धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान्।**
**पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥ ५ ॥**

तो धृष्टकेतु नृप आणिक चेकितान। काशीपती सबल शैब्य जनीं महान। कीं कुंतिभोज पुरुजित् प्रमुख प्रतापी। नारायणीं सकल हे रत शत्रुतापी[4] ॥ ५ ॥

**युधामन्युश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान्।**
**सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥६॥**

युद्धांत मन्यु[5] अतितीव्र असाहि राजा[6]। कीं वीर्यवान[7] बहुधा नृप उत्तमौजा। सौभद्र[8] ही द्रुपदजासुतें[9] कृष्णभाचे। नारायणप्रिय महारथि सर्व सांचे[10] ॥ ६ ॥

**अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम।**
**नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते॥७॥**

---

१ धृष्टद्युम्नाची. २ सात्यकी. ३ श्रीकृष्ण आदिकरून. ४ शत्रूंस ताप देणारे. ५ क्रोध. ६ युधामन्यु. ७ पराक्रमी. ८ अभिमन्यु. ९ द्रौपदीचे पांच पुत्र. १० खरे.

जे आमुच्यांतील विशिष्ट[1] हि त्यांस जाण। विप्रोत्त[2]-मा मम चमूंतिल ऑन[3]आन॥ संज्ञार्थ मुख्य वदतों तव सान्निधानीं[4]। नारायणा[5]प्रतिहि जे भिडती[6] निदानीं[7]॥ ७ ॥

**भवान् भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ।**
**अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥८॥**

बा तूं स्वयें मम पितामह भीष्म थोर । गा कर्ण आणि कृपही रण जिंकणार । तैसा त्वदात्मज[8] विकर्णहि सौमदत्ती[9] । नारायणस्मरणशील सुचित्तवृत्ती ॥ ८ ॥

**अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ।**
**नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥९॥**

आणीकही बहुत शूर मिळोनि आले । टाकोनि जीवित मदर्थ[10] मरों निघाले । शस्त्रें अनेक धरिती रणदक्ष सारे । नारायणाचरणिं मेळविले पसारे ॥ ९ ॥

**अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ।**
**पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥१०॥**

अक्षौहिणी शिवं[11] पितामह भीष्म रक्षी । हा मी स्वकीय दळभार समर्थ लक्षीं । नारायणाश्रित वृकोदरें[12] पाळि नेटें । ती सप्त[13]संमित चमू[14] असमर्थ वाटे ॥ १० ॥

---

१ मुख्य. २ द्रोणाचार्या. ३ निरनिराळे. ४ समोर ५ श्रीकृष्णाप्रति. ६ झुंजति. ७ अखेरीस. ८ तुझापुत्र (अश्वत्थामा) ९ भूरिश्रवा. १० माझ्यासाठीं. ११ अक्रा. १२ भीमसेन १३ सात अक्षौहिणी. १४ फौज.

**अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ।**
**भीष्ममेवाभिरक्षंतु भवंतः सर्व एव हि ॥११॥**

स्थानें विभागुनि समस्तहि युद्धरीत्या । ज्या ज्या स्थळीं स्थित[1] असा अयनांतुनी[2] त्या । भीष्माप्रतीच अवघे तुह्मि नित्य रक्षा । नारायण[3]स्मरुनि वा[4] आपुलया स्वपक्षा ॥ ११ ॥

**तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः ।**
**सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥१२॥**

रायासि[5] संजय वदे इतुक्यांत राजा[6] । हर्षें तुझा सुत असा कुरुवृद्ध[7] आजा ॥ गर्जोनि सिंहरव वाजवि शंख नेटें नारायणा[8]सहि पराक्रमिसाच वाटे ॥ १२ ॥

**ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ।**
**सहसैवाभ्यहन्यंत स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥१३॥**

तो शंखभेरिपणवानकगोमुखांहीं । दोहीं दळीं त्वरित एक[9] उडोनि घाई । वाद्यें सर्वांचि पिटितां भरुनी नभाला[10] । नारायणापुढति[11] तुंबळ शब्द झाला ॥ १३ ॥

**ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यंदने स्थितौ ।**
**माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥१४॥**

तेव्हां जुपोनि चवघे हय[12] शुभ्रदेही । मोठ्या रथीं बसुनि माधव[13]पांडवांहीं[14] । काढोनि दिव्य विजयी दरे[15] वा-

---

१ कायम. २ हद्दींतून. ३ ईश्वर. ४ अथवा. ५ धृतराष्ट्रासि. ६ दुर्योधन. ७ भीष्म. ८ कृष्णासि. ९ एकदम. १० आकाशाला. ११ कृष्णापुढें. १२ घोडे. १३ कृष्ण. १४ पार्थानें. १५ शंख

जवीले । नारायणें नरेंवरें रण गाजवीलें ॥ १४ ॥

**पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः । पौंड्रं**
**दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥**

नारायणेंद्रियपति प्रभु पांचजन्य । तो देवदत्ताहि धनंजय शंख अन्य । जो निश्चयेंचि धन मेळवि शत्रु जिंकी । गा पौंड्र थोर दर भीम बलिष्ठ फुंकी ॥१५॥

**अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ।**
**नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥१६॥**

राजा अनंतविजय स्फुरि चारुगात्र । नारायणप्रिय युधिष्ठिर कुंतिपुत्र। जे धाकुटे तनय माद्रिस दोने झाले। त्यांहीं सुघोषमणिपुष्पक वाजवीले ॥ १६ ॥

**काश्यश्च परमेष्वासः शिखंडी च महारथः ।**
**धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥१७॥**

काशीपती परमधन्वि महारथीही । पांचालसूनु पहिलाच शिखंडि पाहीं । आणी दुजा द्रुपदपुत्र तसा विराट । नारायणेष्ट युयुधान अजिंक्य धीट ॥ १७ ॥

**द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते । सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक्पृथक् ॥१८॥**

पांचालिपुत्र चिमणे द्रुपदादि थोर । पृथ्वीपती व निधडा अभिमन्यु वीर । यांहीं पृथक्पृथक जे दर वाजवीले । नारायणापुढतिं सद्यश गाजवीलें ॥१८॥

---

१ कृष्णानें. २ पार्थानें. ३ धर्मराज. ४ वाजवी. ५ नकुळसहदेव. ६ धृष्टद्युम्न. ७ कृष्णप्रिय. ८ सात्यकी. ९ शंख.

**सघोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।**
**नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥१९॥**

तो थोर घोष कुरुंच्या हृदयांसि फोडी । आकाश आणि करि भूमि भरोनि थोडी । ऐसा महा तुमुल गर्जवि ब्रह्मगोळ । नारायण प्रतियुगीं निजभक्तपाळ॥१९

**अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।**
**प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः ॥ २० ॥**

यानंतरें बघुनि पुत्र तुझे समोर । तेथें व्यवस्थित कपिध्वज पार्थवीर । होतां प्रवृत्त पृतना मग शस्त्रपातीं । नारायणाप्रिय धनू उचलोनि हातीं ॥ २० ॥

**हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।**

## अर्जुन उवाच.

**सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥२१॥**

तेंव्हां हृषीकेपतिला[1] वचें[2] हें निदानीं । बोले धनंजय दळें[3] आजि सिद्ध दोनी ॥ त्यामाजि मद्रथ[4] उभा करि लागवेगीं[5] । नारायणा[6] आजि महीपति-मध्यभागीं॥२१॥

**यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।**
**कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे ॥२२॥**

येथें उभे असति जे समरोद्यमीं या । कोणासि मी लढुं तयांत धरोनि हीयां[7] ॥ कीं हें बघेन जंव उत्सुक[8]

---

१ इंद्रियपतीला. २ भाषण. ३ सेना. ४ माझा रथ. ५ झटकन्. ६ कृष्णा, ७ धैर्य, ८ उद्युक्त.

युद्धकामीं । नारायणाखिलगुरो तुज सांगतों मी ॥२२॥

**योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः। धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥**

जे हे इथें जमुनिया रण झुंजणारे । आले कुबुद्धि कुरुचे प्रिय चिंतणारे ॥ युद्धीं तयांसि तवसन्मुख मी बघेन । नारायणा शरणही तुजला रिघेन ॥ २३ ॥

## संजय उवाच.

**एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत । सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥२४॥**

निद्रेश अर्जुन असें वदतांच रायां । तो हेतु संजय ह्मणे पुरता कराया । स्थापोनियां रणिं रथोत्तम मध्यभागीं । नारायणेंद्रियपती समरप्रसंगीं ॥ २४ ॥

**भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षितां । उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥२५॥**

आचार्य[२] शांतनव[३] भूपति सर्व आणी । त्यांच्या समोर वदला मग शार्ङ्गपाणी[४] । या कौरवांसह पहा अवध्याहि शूरां । नारायणप्रिय[५] पृथात्मज[६] पार्थवीरा ॥२५॥

**तत्रापश्यत् स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् । आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा २६**

---

१ धृतराष्ट्रा. २ द्रोणाचार्य. ३ भीष्म. ४ श्रीकृष्ण. ५ कृष्णसखा जो तूं ६ कुंतिपुत्रा अर्जुना.

तेथें उभे असति जे चुलते व आजे । आचार्य[1] मातुल सुहृद्[2]गणशूर राजे ॥ बंधू तसेच पुतणे सुत नातु तेही । नारायणप्रिय[3]सख्यासह पार्थ पाही ॥२६॥

**श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि । तान्समीक्ष्य स कौंतेयः सर्वान्बंधूनवस्थितान् ॥२७॥**

जे सोयरे श्वशुरही समरासि आले । दोहीं दळांत मरणाप्रति सिद्ध झाले । पाहूनि सम्यक तयां निज बांधवातें । नारायणांघ्रि[4] मग पार्थ शिवोनि हातें ॥२७॥

**कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ।**

**अर्जुन उवाच.**

**दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥२८॥**

चित्तीं कृपा भरलि फार म्हणोनि साधें । व्याकूळ अर्जुन वदे वच हें विषादें । कृष्णा बघोनि समरस्थ[5] युयुत्सु[6] सारे । नारायणा स्वजन हे अजि या प्रकारें २८

**सीदंति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति । वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥ २९ ॥**

गात्रें ह्मणे ठणकती मुख शुष्क[7] जालें । निःसत्व मद्वपुहि पावुनि कंप हाले । रोमांच गा उठति मी करुं काय आतां । नारायणा नरहरी प्रभु विश्वनाथा ॥२९॥

---

१ गुरु. २ आप्त. ३ कृष्ण. ४ कृष्णपदकमल. ५ रणांतील. ६ योद्धे ७ कोरड पडली. ८ सरळ.

**गांडीवं स्रंसते हस्तात्त्वक् चैव परिदह्यते ॥**
**न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥३०**

गांडीवही गळतसे धरवे न हातीं । शोकाग्निनें जळतसे हरि[1] मत्त्वचा ती । ठाकों शकें नच इथें उगला उभाही । नारायणा[2] मम मन भ्रमतेंच पाहीं ॥ ३० ॥

**निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ॥**
**न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥ ३१**

हें दीसती शकुनही विपरीत[3] मातें । न श्रेय[4]ही मज दिसे स्वजनासघातें । नारायणा वश विधीश[5] सदैव ज्यातें । ठावें खरें सकल त्या तुज केशवातें[6] ॥ ३१ ॥

**न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ॥**
**किन्नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥ ३२**

कृष्णा नको विजय राज्य सुखें धनाढ्य । तूं जाणतोसि सकलेंद्रियवृत्ति-वेद्य[7] । त्या जीवितें नृपपणें उपभोगलोभें । नारायणा मजसि काय विशेष लाभे ॥ ३२ ॥

**येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ॥**
**त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ३३**

ज्यासाठिं राज्य उपभोग सुखादि आम्ही । इच्छीतसों, त्यजुनियां विहितार्थ धामीं । ते प्राण घेउनि उभे

---

१।२ कृष्णा. ३ वाईट. ४ कल्याण. ५ ब्रह्मदेव शंकर. ६ कृष्णातें. ७ जाणण्यास योग्य.

समरांतें ठेले । नारायणा अजि रणाप्रति हे भुकेले॥३३

**आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ॥ मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबंधिनस्तथा ३४**

आचार्य बाप चुलते पुतणे स्वपुत्र । आजे तसे श्वशुर मातुल इष्टमित्र । नातूहि शालक उभे समरासि येथ । नारायणा स्वजन सोयरियांसमेत ॥ ३४ ॥

**एतान्न हंतुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ॥**
**अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किंनु महीकृते ॥३५**

हे मारितील जरिही उगल्यासि मातें । तत्रापि मी मधुरिपो न वधीन यांतें । त्रैलोक्य राज्य फलहेतु तरीहि देवा । नारायणा मग महीं किति वासुदेवा ॥ ३५ ॥

**निहत्य धार्त्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ॥**
**पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥**

प्रीती वधोनि मज कौरव काय बा ते । आह्मांसि पापचि घडे निजबंधुघातें । कीं आततायि तरिही खलमर्दनाचें । नारायणा विहित कार्य जनार्दनाचें ॥३६॥

**तस्मान्नार्हा वयं हंतुं धार्तराष्ट्रान्स्वबांधवान् ॥**
**स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥३७**

यासाठिं अंधसुत बांधव हे वधाया । आह्मी न योग्य

---

१ रणांत. २ मेहुणे ३ कृष्णा. ४ मधुसूदना. ५ पृथ्वी. ६ दुरात्मही ह्मणजे—अग्निदो गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहः ॥ क्षेत्रदारहरश्चैव षडैते ह्याततायिनः ॥ या प्रकारचे. ७ दुर्जन. ८ कौरव.

मराठी ग्रंथ संग्रहालय

शिवतों तुझिया पदां या । नारायणा स्वजन ते निं-
वटोनि भाऊ । लक्ष्मीधवा वद सुखी तरि केविं होऊं ॥३७॥

यद्यप्येते न पश्यंति लोभोपहतचेतसः ॥
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥ ३८ ॥

ना पाहती जरिहि हे अजि मूढबुद्धी । लोभेंकरोनि जगतांतिल सुप्रसिद्धी । कीं काय दोष कुलनाशनिं मित्रघातें । नारायणा अघेंहि नेणुनिया अगा तें ॥ ३८ ॥

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्त्तितुं ॥
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

ना जाणणें तरि कसें परतावयासी । आह्मी अघें स्मरुनि या कुलनाशनासी । प्रत्यक्ष दोष अणि तूज जनार्दनातें । नारायणा बघत दुर्जनमर्दनातें ॥ ३९ ॥

कुलक्षये प्रणश्यंति कुलधर्माः सनातनाः ॥
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥४०॥

जाल्या कुलक्षयहि वंशपरंपरांचे । होतात नष्ट अवघे कुलधर्म सांचे । तेणें अधर्मरत होउनि शेष सारें । नारायणा कुल वसे भलत्या प्रकारें ॥ ४० ॥

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ॥
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥४१॥

---

१ पाप. २ मागें फिरायासी. ३ पाप. ४ कृष्णा. ५ खरें. ६ बाकी राहिलेलें.

कृष्णा अधर्म कुल दूषवि तत्प्रभावें[1] । होतात गा कुलवधू[2] विषम स्वभावें[3] । कीं वर्णसंकर तया कलुषें[4] समर्था । नारायणा घडतसे यदुवंशनाथा ॥ ४१ ॥

**संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ॥**
**पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥४२॥**

त्या संकरें नरकवास कुलघ्न[5] वंशा । होतो घडोनि पितृपात[6] जगद्वंतंसा[7] ॥ कीं भक्तिनें ऋषिसुरां पितरांसि पाणी । नारायणा चरुहि[8] ना मिळतां निदानीं[9] ॥ ४२ ॥

**दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ॥**
**उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ४३**

या वर्णसंकरविकारक वंशहत्या । कर्त्यांचिया प्रकृतिदोषबळेंचि सत्यां[10] । सांडोनिया बुडति सत्कुल जातिधर्म । नारायणोक्त[11] ऋत[12] शाश्वत तें स्वकर्म ॥४३॥

**उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ॥**
**नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥**

ज्यांचे विनष्ट[13] कुलधर्म तया नरातें । होतो सदा नरकवासचि पामरातें । हें ऐकतों निगम[14]सिद्ध जनार्दना मी। नारायणा[15] मति वसो परमेश[16]नामीं ॥ ४४ ॥

---

१ त्या योगानें. २ कुलस्त्रिया. ३ वाईट रीतीनें. ४ पापानें. ५ कुलनाश करणारा. ६ पितर पतन होणें. ७ कृष्णा. ८ पिंड. ९ शेवटीं. १० सत्यत्व. ११ वेदोक्त. १२ खरें. १३ नष्ट झालेले. १४ वेद. १५ कृष्णा. १६ ईश्वरनामीं.

**अहो वत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ॥**
**यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥**

आश्चर्य कीं अवं महा करितों अहाहा । आरंभुनी कलहकृद्व्यवसाय तो हा । जें मारण्यासि उठलों अजि राज्यलोभें । नारायणा स्वजन तें न अह्मांसि शोभे॥ ४५॥

**यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ॥**
**धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥४६॥**

निःशस्त्र मी न करितां प्रतिकार कांहीं । हे धार्तराष्ट्र करिं शस्त्र धरोनि पाहीं । नारायणा रणिं जरी वधितील मातें । कल्याण होइल तरी पुरुषोत्तमा तें॥ ४६॥

**संजयउवाच**

**एवमुक्त्वाऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ॥**
**विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥४७॥**

धीचक्षुला सुमति संजय सांगताहे । बोलोनि अर्जुन असें उगलाचि राहे । टाकोनि चाप शर घेउनिया उदासी । नारायणा निकट बा रथमध्यदेशीं ॥ ४७ ॥

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥**

---

१ मोठें पाप. २ तंटयाचा व्यापार. ३ निवारण. ४ कौरव. ५ युद्धांत. ६ धृतराष्ट्राला. ७ बुद्धिमान. ८ श्रीकृष्णाजवळ. ९ रथामध्यें.

श्रीमान्षड्गुणवान कृष्ण भगवान् गीता श्रुती[1]सार हें योगाची स्मृति[2] द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥ वाखाणीं प्रथमीं[3] विषादहि[4] तिथें पार्थाननें[5] तेचि तो । या चिंतामणिनंदनाननिं हरी टीका मिसें बोलतो ॥ १ ॥

श्रीमन्नारायणार्पणमस्तु.

---

# द्वितीयाध्यायप्रारंभः ।

## संजय उवाच

तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ॥
विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

श्रीव्यास[6]शिष्य पुढती वदला तसाची । शोकाश्रुपू[7]रित विलोकुनि सव्यसाची । दुःखी, तयास मधुसूदन पद्मनेत्र । नारायण[9]प्रभु वदे वच हें पवित्रं[10] ॥ १ ॥

## श्रीभगवानुवाच

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितं ॥
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

ठायीं तुझ्या पडळ सम्यक अर्जुना हें । कोठोनि युद्धसमयीं उठलें स्वमोहें[11] । अज्ञानेंसेव्य[12] नरकार्ते[13] जगन्म-

---

१ वेद. २ शास्त्र किंवा स्मरण. ३ पहिले अध्यायांत. ४ शोक. ५ अर्जुनमुखानें. ६ संजय. ७ दुःखानें डोळे भरून आले असा. ८ अर्जुन. ९ कृष्ण. १० हें गीताशास्त्र. ११ आत्ममोहानें. १२ अज्ञानानें सेवन करण्यास योग्य. १३ नरकदुःख.

मत्व । नारायणप्रिय[1]सख्या अपकीर्ति तत्त्वें[2] ॥ २ ॥

**क्लैब्यं मास्मगमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ॥**
**क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥**

पार्था परंतप रणीं वैर[3] तापवीसी। घेऊनि षंढपण के-
वि अयोग्य होसी ॥ शोभे तुला न तरि दुर्बलता मनाची।
नारायणोक्त उठ सांडुनि तुच्छ[4] सांची[5] ॥ २ ॥

**॥ अर्जुन उवाच ॥**

**कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ॥**
**इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥**

जिष्णू[6] वदे मधुरिपो अजि भोग कामी । भीष्मासवें
गुरुसवेंहि असा कसा मी । पूज्यांसि हाणुनि शरीं[7] झग-
डूं कसोनी[13] । नारायणा षड्रि[8]सूदन[9] तूं असोनी ॥ ४ ॥

**गुरूनहत्वा हि महानुभावाञ्छ्रेयो भोक्तुं भै-**
**क्ष्यमपीह लोके ॥ हत्वार्थकामांस्तु गुरूनि-**
**हैव भुंजीय भोगान् रुधिरप्रदिग्धान् ॥ ५ ॥**

नारायणा न वधितां वडिलां गुरूंतें । भिक्षान्न भ-
क्षणींहि[10] या जनिं इष्ट मातें । अर्थार्थि[11] आणि गुरु मारु-
नि भोग येथें । तद्रक्त[12]दूषितचि कीं उपभोगणें ते ॥५॥

---

१ अर्जुना. २ बीज. ३ शत्रू. ४ शुष्क. ५ खरी. ६ अर्जुन. ७ बाणांनीं १३ मनःपूर्वक. ८ सहा शत्रु. ९ नाशक. १० खाणें. ११ अर्थलोभी. १२ त्यांच्या रक्तानें भरलेले.

नचैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि
वा नो जयेयुः॥ यानेव हत्वा न जिजीविषा-
मस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६ ॥

मारूं मरूं कवण यांत भलें अह्मांला । नेणोंचि हें यश अपेशद[1] वा क्रमाला । कीं ज्यांस मारुनि जनीं जगणें नको तें । नारायणा मम पुरःस्थित[2] हे कुरूंतें ॥६॥

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्म-
संमूढचेताः ॥ यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥ ७ ॥

किंचिज्ञ[3] मी तुज पुसें कृपण स्वभावें । नारायणा विहित धर्म विमूढभावें । कल्याण निश्चिंतहि[4] जें वद तेंच मातें । त्वच्छिष्य[5] मी शिकविं तूं शरणागतातें[6] ॥ ७ ॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्यच्छोकमुच्छो-
षणमिंद्रियाणाम्॥ अवाप्य भूमावसपत्नमृद्धं
राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥ ८ ॥

हृत्ताप[7] नाशक दुजें न दिसे मनासी । जो शोकशोषक[8]चि हा मम इंद्रियांसी । पावूनि राज्य अविभक्त[9] समृद्ध[10] सत्य । नारायणा क्षितिवरी ससुराधिपत्य[11] ॥ ८ ॥

---

१ यश अपयश देणाऱ्या क्रमाला. २ पुढें उमे आहेत त्या. ३ अज्ञान जीव. ४ खचित. ५ तुझा शिष्य. ६ शरण आलेल्याला. ७ मनाचा ताप. ८ शोषण करणारा. ९ भाऊबंदाचे हिस्साराहित. १० सर्व संपत्तीनें परिपूर्ण. ११ देवलोकींचें राज्य.

## संजय उवाच

एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ॥
न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूवह ॥९

बोलोनि संजय ह्मणे जगदीश्वरा हें । गोविंदजी न करिं युद्ध ह्मणोनि राहे॥निद्रेश अर्जुन परंतप तो उगा-ची । नारायणा कथुनि भीति महा अघांची ॥ ९ ॥

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ॥
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥ १० ॥

रे भारता मग तया पदपद्मभक्ता । हांसोनि सस्मित असेचि विषादयुक्ता ॥ दोहीं दळीं वचन तें हृदयस्थ पाहे । नारायणेंद्रियपती मग बोलिला हें ॥ १० ॥

## श्रीभगवानुवाच

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ॥
गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥ ११ ॥

शोकार्ह जे न करिसी आजि शोक त्यांचा । गा बुद्धि-वादहि महा वदसी फुकांचा । मेल्या जित्यास्तव न पंडि-त कष्टि होती । नारायणस्मरणशील मती जयां ती॥११॥

नत्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ॥
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतः परम् ॥ १२ ॥

मी नाहिं तूं नससि हे नव्हते नृपाळ । जालें असें न

---

१।२ कृष्णाला. ३ पातकाची. ४ धृतराष्ट्रा. ५ शोकयुक्ताला. ६ श्रीकृष्ण. ७ अनुभवहीन. ८ राजे.

कधिं यापरि भूतकाळ ॥ नाहीं असें न पुढतीं हि घडेल पाहीं । नारायणीं सकल वर्ततसों सदांही ॥ १२ ॥

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा॥
तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥

कौमार यौवन जरा जशि देहियातें । देहीं यया स्थिति तशी चवथीहि होते ॥ देहांतरें करुनि तेथ सुधीर संत । नारायणीं न चळती जुळती पसंत ॥ १३ ॥

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ॥
आगमापायिनोनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत १४

संबंध कुंतितनया विषयेंद्रियांचे । शीतोष्णरूप सुखदुःखद जाण साचे ॥ होवोनि नासति अनित्यचि जे तयांसीं । नाराय ण स्मरुनि भारत तूंहिं सोशी ॥ १४ ॥

यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ॥
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥१५॥

यांहीं न जो व्यथितें तो पुरुष प्रतापी। लोकीं सुधीरें सुखदुःखि समानरूपी ॥ मोक्षासि योग्य पुरुषर्षभ सव्यसाची । नारायणस्मरणशीलहि तूं तसाची ॥ १५ ॥

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ॥
उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥१६

१ गेलेला. २ ईश्वराचे विश्वरूपांत. ३ तरुणपण. ४ ह्मातारपण. ५ ईश्वराचे ठायीं. ६ सुख दुःख देणारे. ७ ईश्वर स्मरून. ८ येणें करून. ९ जे व्याकुळ होत नाहींत. १० धैर्यवान. ११ पुरुषश्रेष्ठ. १२ अर्जुना.

नाहीं असत्[१] ह्मणुनि भाव कलेवरासी । नारायणांश जनिं सत्[२] न अभाव त्यासी॥अंतस्थ[३] तत्त्व उभयत्र[४] असेंचि यांचें । रे तत्त्वदर्शि[५] बघती जगदात्मयाचें ॥१६॥

**अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ॥**
**विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्त्तुमर्हति ॥१७॥**

तूं जाण तेंचि अविनाशि[६] समस्त जेणें । हें व्यापिलें जग महा परिपूर्णतेनें ॥ कोणीहि नाश न करूं शकती तयाचा । नारायण प्रकट अव्यय[७] ईश याचा ॥१७॥

**अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ॥**
**अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युद्ध्यस्व भारत ॥१८**

हे देह सर्व मरणार परंतु देही[८] । नारायणांश परिपूर्ण तसाचि पाही ॥ नित्य[९]ऽप्रमेय[१०] अविनाश ह्मणोनि ऊठ । रे भारता[११] झगड[१२] धैर्य धरोनि नीट ॥ १८ ॥

**य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ॥**
**उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥ १९**

कीं मारणार जन जाणति जे ययातें । वा मानितात मरणार दुजेहि त्यातें ॥ नारायणांश[१३] परि नेणति तेचि दोनी । कीं हा न मारि न मरे मनिं हें बुझोनी[१४]॥ १९ ॥

---

१ नाशिवंत. २ नित्य शाश्वत. ३ अंतर्गत. ४ दोघांचे. दोन प्रकारानें दोहींत. ५ तत्त्ववेत्ते. ६।७ नाशरहित. ८ देहधारण करणारा जीव. ९ शाश्वत. १० प्रत्यक्ष, अनुमान, उपमान, अर्थ, अभाव आणि शास्त्र या साही प्रमाणांनीं अगम्य असा अप्रमेय. ११ अर्जुना. १२ युद्धकर. १३ जीवात्मा. १४ समजून.

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भ-
विता वा न भूयः ॥ अजो नित्यः शाश्वतो
ऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥२०॥

जो जाहला न नमरे अथवा कधींही । होवोनि होइल
अशापरि होत नाहीं॥ हा नित्य शाश्वत अजन्म पुराण
धीर । नारायणांश न मरे मरतां शरीर ॥२०॥

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ॥
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हंति कम् ॥२१

जो जाणतो अज[1] असा अविनाश यातें । या नित्य
अव्यय तया जगदात्मयातें ॥ नारायणात्मक[2] महापुरुष
स्वयें तो। पार्था कसा वधि कुणा प्रति मारवीतो॥२१॥

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति
नरो पराणि ॥ तथा शरीराणि विहाय जीर्णा-
न्यन्यानि संयाति नवानि देही ॥ २२ ॥

वस्त्रें जुनीं त्यजुनि मानव अन्य घेतो । जैसीं तसींच
जगतांत कलेवरें तो ॥ टाकोनि जीर्ण[3] दुसरीं नविं नित्य
देही । नारायणीं[4] कृत सुचित्र विचित्र घेई ॥ २२ ॥

नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ॥
न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥२३॥

शस्त्रें न तोडिति यया न हुताश[5] जाळी । पाणी य-
यासि भिजवी न कदाहि काळीं ॥ शोषीत नाहिं पुरु-

---

१ अजन्म. २ मायारहित. ३ जुनी. ४ मायाकृत. ५ अग्नी.

पार्थ करोनि वात। नारायणांश परिपूर्ण असा जगांत॥२३॥

**अच्छेद्यो ऽयमदाह्यो ऽयमक्लेद्यो ऽशोष्य एव च ॥**
**नित्यः सर्वगतः स्थाणुरचलो ऽयं सनातनः॥२४॥**

छेदावया दहन वा करण्यास हाही । शोषावया भिजविण्याप्रति योग्य नाहीं । कीं शाश्वत स्थिर अचंचल सर्वगात्मा। नारायणांश जनिं नित्य असा महात्मा॥२४॥

**अव्यक्तो ऽयमचिंत्यो ऽयमविकार्यो ऽयमुच्यते॥**
**तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि॥ २५ ॥**

अव्यक्त ही जनिं अनादि विकारहीन । कीं चिंतवे वदति हा कवणा कधीं न॥ यातें असा म्हणुनि जाणुनि शोक वायां। नारायणस्मर तुला नलगे कराया ॥२५॥

**अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ॥**
**तथापि त्वं महाबाहो नैनं शोचितुमर्हसि ॥२६॥**

आतां जरी स्वमनिं मानिसि नित्य होतो । देहासवें सतत वा मरतो अहो तो ॥ ऐसें तथापि करण्यास्तव शोक साचा । नारायणप्रिय अयोग्यचि तूं ययाचा॥२६॥

**जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ॥**
**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥२७॥**

जो जाहला मरण निश्चित त्यासि आहे। मेल्यासही

---

१ आत्मा. २ अथवा. ३ सर्वव्यापक. ४ आत्मा. ५ व्यक्तपणानें न दिसणारा. ६ ज्याचा जन्मकाल कोणास ठाऊक नाहीं असा. ७ दोषरहित. ८ ईश्वर. ९ खरा. १० श्रीकृष्णसखा.

जनन[1] सत्य जगत्प्रवाहें[2] । कीं गोष्ट ही अपरिहार्य[3] ह्मणो-
नि येथें । नारायणासि[4] भज शोक न योग्य तूंतें ॥ २७ ॥

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ॥
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥२८॥

अव्यक्त[5] मूळ[6] असती अवघींहि भूतें । तीं व्यक्त[7] भा-
सति मधेंचि जगत्प्रभूतें[8] ॥ अव्यक्त जी[9] प्रकृति तींतचि
अंत ज्यांचे । नारायण[10] त्यजुनि शोचन[11] कां तयांचें ॥ २८ ॥

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति त-
थैव चान्यः ॥ आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति
श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥ २९ ॥

आश्चर्यसें बघति कोणि ययासि धन्य । आश्चर्य हें ह्म-
णति एक तसेंचि अन्य[12] ॥ आश्चर्यची ह्मणुनि ऐकति या-
स कांहीं । नारायणा कितिक[13] नेणति ऐकुनीही ॥२९॥

देही नित्यमवध्यो ऽयं देहे सर्वस्य भारत ॥
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ३०

नारायणांश जगतांत अवध्य[14] देही[15] । रे भारता भरुनि
नित्य समस्त देहीं । आहेत नश्वर[16] अशास्तव सर्व भूतें ।
नाहींस शोक करण्याप्रति योग्य त्यांतें ॥ ३० ॥

---

१ जन्म. २ जगाच्या प्रवाहपरंपरेनें. ३ न टळणारी. ४ ईश्वरास. ५ एकरूपी अदृश्य. ६ प्रथम. ७ पृथक्पणानें दृश्य अनेकरूपी. ८ जगांत झालेली. ९ एक मूळ माया. १० ईश्वर. ११ शोक. १२ दुसरे. १३ कोणी. १४ वध करण्यास योग्य नाहीं असा. १५ जीव. १६ नाशिवंत.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं. ......



**स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ॥ धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयो ऽन्यत् क्षत्रियस्य न विद्यते ॥३१॥**

लोकीं स्वधर्म निरखोनि[१] हि गा तुला ती । नारायण-प्रियसख्या नाचि योग्य भीती ॥ कीं धर्मयुद्ध करण्याहुनि आनें[२] कांहीं । रे क्षत्रियांसि परमार्थ विशेष नाहीं ॥३१॥

**यदृच्छयाचोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ॥
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥३२॥**

स्वर्गीं कवाड उघडें सहजेंचि जालें । पार्था सुभाग्य ब-रवें उदयासि आलें । नारायणीं[३] निरत क्षत्रिय जे सुखी ते । निर्दोष लाहति[४] असें रणकर्म येथें ॥ ३२ ॥

**अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ॥
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥३३**

आतां जरी न करिसी विहित स्वकर्म । संग्राम[५] हा त्यजुनि तूं तरि आत्मधर्म । कीर्तीहि नासउनि पातक पावशील । नारायणस्मरणयुक्त असोनि शील ॥ ३३ ॥

**अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम् ॥
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥३४॥**

भूतें समस्तहि अकीर्तिच आणि लोकीं । गातील अ-व्यय तुझी मनिं हें विलोकीं ॥ संभावितांसि मरणापरती असह्य[६] । नारायणप्रिय[७]सख्या अपकीर्ति होय ॥३४॥

---

१ पाहोनी. २ दुसरे. ३ ईश्वराचेठायीं रत असणारे. ४ पावतात. ५ युद्ध. ६ सहन न होणारी. ७ अर्जुना.

**भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः ॥ येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५ ॥**

जाला पराङ्मुख रणांतुनि हा भयानें । ऐसें महारथ तुला म्हणतील यानें । यांमाजि तूंच बहुमान्य असोनि येथें । नारायणें त्यजुनि पावसि लाघवातें ॥ ३५ ॥

**अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः ॥ निंदंतस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६**

बोलों नयेत तसले बहुसाल बोल । बोलोनि शत्रु म्हणतील तुलाचि फोल । सामर्थ्य निंदिति तयाहुनि काय आहे । नारायण स्मरुनि दुःखद हेंचि पाहें ॥ ३६ ॥

**हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥ तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ३७**

स्वर्गासि जासिल जरी मरसील येथें । वा जिंकिसील तरि भोगिसि तूं महीतें । यासाठिं कुंतितनया उठ निश्चयेशीं । नारायण स्मरुनि युद्ध करावयासी ॥ ३७ ॥

**सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ॥ ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८**

मानीं समान सुखदुःख नफे हि तोटे । तैसे जयापजयगा न गणोनि खोटें । नारायणोक्त मति योजि रणासि येणें । पार्था न पावसिल पाप कदापि जाणें ॥ ३८ ॥

१ पाठमोरा. २ यांच्यांत ३ कीर्तिकर नामस्मरण. ४ लघुत्वातें. ५ निर्बळ. ६ दुःख देणारे. ७ किंवा. ८ पृथ्वीतें. ९ अर्जुना. १० माझें वाक्य. ११ बुद्धी.

**एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ॥**
**बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥३९**

रे सांख्य हें तुजप्रती वदलों मुखानें । [1]धी कर्मयोग-गत आयिक ही सुखानें । पार्था जया सुमतिनें छटिके [2]प्रबंध । नारायण स्मरुनि नाशिसि कर्मबंध ॥ ३९ ॥

**नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥४०**

येथें उपक्रमविनाश नसे ह्मणोनी । न प्रत्यवाय निजधर्म करोनि आणी । नाराय[3]णार्पण घडेल जरी हि अल्प[4] । तें तारि वारुनि महाभय[5]क्कृद्विकल्प ॥ ४० ॥

**व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन । बहु-शाखाह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥४१॥**

या मार्गीं एकचि असे व्यवसायियाची । बुद्धी सदा कुरुवरा दृढ निश्चयाची । धी[6]कल्पना बहु अनंत अशा तयांच्या । नाराय[7]णारहित अ[8]व्यर्वसायियांच्या ॥४१॥

**यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ॥**
**वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥४२॥**

स्वर्गादि-पुष्पयु[9]त हे मम वेदवाणी । नेणोनि ते फलब-ळें वदती अडाणी । नारायणारहित जे श्रुं[10]तिवाद करें ।

---

१।६ बुद्धि. २ संसारपाश. ३ ब्रह्मार्पण. ४ थोडें. ५ भय करणारा कल्पनासमूह. ७ नारायणावांचून. ८ कांहीं न करणारे आळशी लोकांच्या. ९ सहित. १० वेद.

पार्थी न याहुनि दुजें ह्मणणार पतें ॥ ४२ ॥

**कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ॥**
**क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥**

कामीं[1] च नाकपर ते बहुलों[2] क्रियांहीं। जे जन्मकर्म फलदा[3] बहु कारकांहीं[4]। गा भोगभाग्यगति साधुनि तत्प्रेतीती। नारायणारहित इच्छुनि पावताती ॥ ४३ ॥

**भोगैश्वर्यप्रसक्तानां तयाऽपहृतचेतसाम् ॥**
**व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ४४**

ऐश्वर्यभोगपथलुब्ध अशा नरांची। ज्यांची तिणेंचि हरिली मति पामरांची। नारायणात्मक जगद्व्यवहारबुद्धी। एकाग्र होउनि कधीं नपवे समाधी ॥ ४४ ॥

**त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ॥**
**निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेमआत्मवान् ४५**

वेदत्रयी विषय हा गुणकर्मसांचा। निष्कर्म निर्गुणचि अद्वय होइ सांचा। निःक्षेम योग जनिं सात्विक अर्जुना तूं नारायणासहित जाणुनि आत्मतत्तू॥४५॥

**यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ॥**

---

१ परलोक इच्छिणारे. २ बहु प्रकारच्या अनेक. ३ फल देणाऱ्या. ४ साहित्यांहीं. ५ अनुभव. ६ नारायणानीं युक्त. ७ पावत नाहीं. ८ ऋक्, यजु, साम या तिन्ही वेदांतील कर्ममार्ग. ९ गुणकर्मांचा ठसा. १० भेदरहित. ११ खरा. १२ मिळविलेल्याचें रक्षण करणें. १३ न मिळालेली वस्तु मिळणें.

**तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥४६॥**

जे धाकुट्या जाळिं हि ते पुरती जलार्थ । मोठ्या [1]र्‍हदीं सहज सर्व तसे फलार्थ । नारायणीं सकळही घडती [2]श्रुतीचे । ब्रह्मज्ञ[3] जे असति जाणुनि तत्त्व त्यांचें ॥४६॥

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥४७॥**

ऐसा तुला दृढ असे अधिकार कर्मी । रे तत्फळीं नच परंतु कधीं स्वधर्मीं । नाहो स्व[4]कर्मफलहेतु नसो प्रसंग । नारायणारहित तूज अ[5]कर्मसंग ॥ ४७ ॥

**योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ॥
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ४८**

कर्मे करीं सकल होउनि योगयुक्त । तूं संग सांडुनि तसें फल तत्प्र[6]युक्त । लाभीं अलाभिं सम साधुनि चित्तवेग । नारा[7]यणीं, सुसमता म्हणताति योग ॥ ४८ ॥

**दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय । बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९ ॥**

कीं काम्य कर्म बहु दूर सुबुद्धियोगा । पासोनि नीच ह्मणऊनि धनंजया गा । बुद्धीच रक्षक पहा [8]कृपणें [9]अनार्यें । नारायणोक्तहि फ[10]लप्रद सर्व [11]कार्यें ॥ ४९ ॥

१ जलानें भरलेल्या तलावांत. २ वेदाचे. ३ ब्रह्म जाणणारे. ४ आत्मकर्माचा. ५ कांहीं न करणें असा. ६ त्यांचे वर्णिलेलें. ७ नारायणाचे ठायीं. ८ निर्बल. ९ हलकट. १० फल देणारीं. ११ कर्में.

**बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ॥**
**तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ५०**

कीं पापपुण्य मतिमंतें[1] ययाच देहीं। दोनीहि नाशुनि सुखी असती विदेही । यासाठिं योगरत हो पैं[2] बुद्धियोग । नारायणा[3]नुभव कर्मि करी सवेग ॥ ५० ॥

**कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः॥**
**जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥५१**

शास्त्रज्ञ[4] बुद्धिबलवंताचि कर्मजन्य[5] । सांडोनियां फल तसे भवबंध[6] अन्य[7] । वारोनि जन्ममरणादि विमुक्त[8] होती । नारायणें[9] स्मरुनि शुद्ध पदासि जाती ॥ ५१ ॥

**यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति । तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च॥५२॥**

संमोहकल्मषं[10]निधी[11] तव बुद्धि जेंव्हां । नारायणाश्रय करोनि तरेल तेंव्हां । वैराग्य पावशिल जें श्रवणीय[12] त्याचें । वा[13] भोग आजवरि ऐकुनि पाहिल्याचे ॥ ५२ ॥

**श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।**
**समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ५३**

नाना[14] श्रुतिश्रवणिं[15] संशययुक्त[16] तूझी । जेंव्हां अचंच[17]-

---

१ बुद्धिवान्. २ चांगला. ३ ब्रह्मसाक्षात्कार. ४ शास्त्र जाणणारे. ५ कर्मापासून उत्पन्न होणारे. ६ संसारपाश. ७ दुसरे. ८ मोकळे. ९ ईश्वरस्मरणानें. १० दोष. ११ समुद्र. १२ ऐकिण्याजोगे न ऐकिलेले. १३ अथवा. १४ अनेक सकामनिष्काम श्रुति. १५ ऐकिल्यामुळें. १६ अनिश्चित झालेली. १७ स्थिर.

ल वसेल अगा समा[1] जी। बुद्धी समाधित[2], तदां स्थिरं पावशील। नारायण स्मरुनि योग सख्या सुशीलें[3] ५३

### अर्जुनउवाच.

**स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव।**
**स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ५४**

ऐकोनि अर्जुन ह्मणें स्थितबुद्धि कैसा। सांगे समा[4]धित सदा असणार ऐसा। श्रीकेशवा वदतसे स्थितधी[5] असेहीं। नारायणा[6] जनिं कसा करि काय कायीं॥५४॥

### श्रीभगवानुवाच.

**प्रजहाति यदा कामान् सर्वान्पार्थ मनोगतान्।**
**आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ५५**

बोले जनेश्वर[7] मनांतिल काम सारे। पार्था दृढ त्य[8]जुनि संसृतिचे[9] पसारे। नारायणात्मक[10] मनें निजरूपिं[11] जेव्हां। संतुष्ट तो स्थितमती[12] ह्मणताति तेव्हां ॥५५॥

**दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः। वी-**
**तरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥**

दुःखामधें मन कधींहि उदास नाहीं। नेणें सुखांतिल फुशारकिची स्पृहाही[13]। कीं काम–कोप–भयवर्जित[14] जो गणावा। नारायणें[15] स्थितमती मुनि तो ह्मणावा॥५६॥

---

१ सारखी समप्रमाणानें. २ समाधियोगांत. ३ चांगले प्रकारचा. ४ समत्वांत. ५ स्थितबुद्धि. ६ कृष्णा. ७ श्रीकृष्ण. ८ पक्केपणानें टाकून. ९ संसाराचे. १० नारायणयुक्त मनानें. ११ आत्मरूपी. १२ स्थितप्रज्ञ. १३ पर्वा. १४ विरहित समजावा. १५ ईश्वराचे ठायीं स्थिर बुद्धि ठेविलेला असा.

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ॥
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥५७

न स्नेह सर्व विषयांत विशेष ज्याचा । जेव्हां जसें-हि सुख दुःख घडेल त्याचा । नारायण स्मरुनि हर्ष विषाद[1] नेणें[2] । त्याची प्रतिष्ठित मती वदती पुराणें ॥५७॥

यदा संहरते चायं कूर्मोऽंगानीव सर्वशः । इंद्रि-याणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥

कीं आवरोनि जळिं कूर्म[3] समस्त अंगें । राहे तसाच विषयांतुनि गा प्रसंगें । नारायणीं[4] अकळि इंद्रियवृत्ति जे-व्हां । त्याची प्रतिष्ठित मती ह्मणताति तेव्हां ॥ ५८ ॥

विषया विनिवर्त्तंते निराहारस्य देहिनः ॥ र-सवर्जं रसो ऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥५९॥

आहार वर्जुनि[5] निवर्तति[6] देहियांचे[7] । लोकांमधें वि-षयभोग तथापि त्याचे । रे वासनामय[8] मनीं[9] रसबीज जें तें । नारायणासिंचि[10] विलोकुनि[11] नष्ट होतें ॥ ५९ ॥

यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ॥ इंद्रि-याणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ६० ॥

कुंतीसुता[12] करि प्रयत्न जरी सुशील । सज्ञान पु-रुष जगांतिल यत्नशील । नारायणोक्त[13] बलवत्तर[14] इंद्रियें तीं

---

१ शोक. २ जाणत नाहीं. ३ कांसव. ४ नारायणाचे ठायीं. ५ वर्ज केलें असतां. ६ नाहींसे होतात. ७ जीवाचे. ८ वासनारूपी. ९ हृदयांत. १० जीवेश्वरैक्य ह्मणजे जीव आणि ईश्वर यांचें एकत्व. ११ पाहून १२अर्जुना. १३वेदांत वर्णिलेली. १४ बलवान.

त्याची बळेंचि हरितात हि चित्तवृत्ती ॥ ६० ॥

**तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ॥**
**वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ६१**

तीं सर्व आवरुनि मत्परें राहताहे । नारायण स्मरणयुक्त असाचि पाहे । कीं इंद्रियें वश जगीं असती जयाचीं । प्रज्ञा प्रतिष्ठित अगा ह्मणती तयाची ॥६१॥

**ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ॥**
**संगात्संजायते कामःकामात्क्रोधोऽभिजायते६२**

ध्यातां मनीं विषय गा पुरुषासि होतो । तत्संग तज्जनित कामहि जो घडे तो । होतां अपूर्ण उपजे मग कोप अन्य । नारायणप्रियसख्या जनिं कामजन्य ॥६२॥

**क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ॥**
**स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति६३॥**

क्रोधामुळें खचितें सम्यक मोह होई । संमोह तो स्मरणशक्ति लयांसि नेई । त्या विस्मृति भ्रमबळें दृढबुद्धि नासे । नारायणारहित तें मरण प्रकर्षे ॥ ६३ ॥

**रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ॥**
**आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति॥६४॥**

निष्काममत्सर सदा विषयांसि घेतो । स्वाधीन इं-

---

१ मनोवृत्ती. २ मला अनुसरून. ३ बुद्धी. ४ त्याचा संग. ५ त्यापासून. ६ क्रोध. ७ अर्जुना. ८ कामापासून होणारा. ९ निश्चयेंकरून. १० नाहींशी करी. ११ निश्चयात्मक. १२ काममत्सरांशिवाय

द्रियसंमूह करोनि जो तो । नारायणस्मरणशील विशु-
द्ध आत्मा । पावे प्रसादपद सम्यैकही महात्मों ॥६४॥

**प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ॥**
**प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ६५ ॥**

नारायणात्मक अशा सुमहाप्रसादें । रे दुःखहानि
अवघीहि घडोनि साधे। चित्तीं प्रसन्नपण जें दृढनिश्चया-
नें । पावे प्रतिष्ठितपणा मेंति शीघ्रे तेणें ॥ ६५ ॥

**नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ॥**
**न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ६६**

अज्ञानियासि मति नाहिंच जो अयुक्त। ना ध्यानही
मनिं तया दृढ भावयुक्त । नारायणावरि न भाव तरी
न शांती । पावे अशांत मग कोठुनि सौख्यकांती॥६६

**इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ॥**
**तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥६७॥**

कीं इंद्रियें विचरतां विषयांत तेथें । नारायणारहित
जें मन योजिती तें । याच्या हरोनि मतिला करितोंचि
घोंका । वारा जसा भ्रमवुनी उदकांत नौका ॥ ६७ ॥

**तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः**
**इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ६८**

वीरार्जुना ह्मणउनी अवघीं जयाचीं । नारायणांघ्रि-

१ समुदाय. २ यथासांग. ३ श्रेष्ठ पुरुष. ४ बुद्धी. ५ लवकर.
६ वागत असतांना. ७ बुद्धीला. ८ अपाय. ९ ईश्वरचरण कमळीं.

युगिं निग्रहिलींच साचीं । रे इंद्रियें दमुनियां विषयांमधूनी । त्याची प्रतिष्ठित मती दृढ तूंहि मानी ॥ ६८ ॥

**या निशा सर्व भूतानां तस्यां जागर्ति संयमी । यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः॥६९॥**

नारायणाविण सदैव निशेंत भूतें । जागे स्वरूपिं परि निग्रहशील तेथें । भूतांसि जागृत दशा विषयांत होते। अज्ञान यास्तव निशा मुनिची पहा ते ॥ ६९ ॥

**आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशंति यद्वत् ॥ तद्वत्कामा यं प्रविशंति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥ ७० ॥**

अंभोनिधी अचलही परिपूर्ण साद्र । नाना जळें शिरति आंत तरी तसाच । नारायणीं स्थिर अयाचित भोगयोगी । पावे सुशांति नर तो न सकामसंगीं ॥७०॥

**विहाय कामान्यः सर्वान् पुमांश्चरति निःस्पृहः ॥ निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति॥७१॥**

सांडोनियां पुरुष सर्वहि काम जो हे । नारायण स्मरुनि निस्पृह वर्तताहे । नेणे अहंकृति मनीं ममता विकारें । तो शांतिसौख्य–पद पावतसे निकें रे ॥७१॥

**एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ॥ स्थित्वाऽस्यामंतकालेऽपि ब्रह्म निर्वाणमृच्छति७२**

---

१ नियमिलीं. २ खऱ्या रीतीनें. ३ रात्रींत. ४ आत्मरूपी. ५ रात्र. ६ समुद्र. ७ ईश्वराचे ठायीं. ८ अनायासें भोग प्राप्त झाले असतांना. ९ काम्यसंगाचे ठायीं. १० निश्चयेंकरून.

ही ब्रह्मिंची स्थिति पृथातनया सुबोधं । जी पावता न उपजे मनिं मोह भेद । नारायण स्मरुनि ही अस-ण्यास भाळीं । निर्वाण आत्मपद पावति अंतकाळीं ७२

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयो ऽध्यायः ॥ २ ॥**

श्रीमान्षड्गुणवंत कृष्ण भगवद्गीता श्रुतीसार हे । योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें । वाखाणी दुसऱ्यांत सांख्यहि तिथें पार्थाप्रती तेंचि नो । या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥ २ ॥

---

# अथ तृतीयाध्यायप्रारंभः

## अर्जुन उवाच.

**ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ॥**
**तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव॥१॥**

नारायणासि मग अर्जुन बोलताहे । कर्माहुनी तुज-

---

१ अर्जुना. २ चांगली समजण्याजोगी. ३ प्रारब्धीं. ४ ब्रह्म. ५ अखेरीस. ६ वेद. ७ शास्त्र किंवा स्मरण. ८ वर्णी. ९ द्वितीयाध्यायांत. १० सांख्ययोग. ११ श्रीकृष्णासि.

सि संमत[1] बुद्धि आहे । कां तूं जनार्दन[2] तरी अजि या स्वधर्मी । श्रीकेशवा[3] मजासि योजिसि घोरकर्मी ॥ १ ॥

व्यामिश्रेणैव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ॥
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम्॥२॥

कां वा विशेष परि मिश्र अशाच [12]डोले । माझी मती करिसि मोहितसी स्वबोलें[4] । नारायणा तरिहि नेमुनि एक सांगें । पावेन मी स्वहित ऐकुनि ज्यास आंगें २

## श्रीभगवानुवाच.

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयाऽनघ
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनां॥३॥

नारायण[6] प्रभु वदे इह लोकिं निष्ठा । मी दोन आधिं वदलों अनघा[7] विशिष्टा[8] । सांख्यांसि सद्गति अगा निजबोधयोगें[9] । [10]धीयोगिया करुनि कर्म [11]श्रुतिप्रयोगें॥३

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ॥
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥४॥

आरंभिल्याविणाहि कर्म अकर्मसिद्धी । पावेचिना पुरुष ही प्रकट प्रसिद्धी । नारायणासहित टाकुनि सर्व कर्में । मुक्ती न पावति अगा इतुक्यांचे[13] धर्में ॥ ४ ॥

न हि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ॥

---

१ मान्य. २ दुर्जनाचा नाश करणारा. ३ कृष्णा. ४ आपल्या बोलण्यानें. ५ स्वतः. ६ श्रीकृष्ण. ७ निष्पापा. ८ श्रेष्ठा. ९ ज्ञानयोगानें. १० बुद्धियोग करणारास. ११ वेदोक्तकर्मानें. १२ झोकाने. १३ कर्मनकर्णें.

कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥

कोणी कधीं क्षणभरीहि अकर्मकर्ता[1]। राहों शके नचि जनांत शरीरधर्ता[2]। नारायणा त्यजुनिया करितीच कर्में। भूतें वश प्रकृतिला त्रिगुणात्मधर्में ॥ ५ ॥

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ॥
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ६

कर्मेंद्रियें अकरुनी हृदयीं तदर्थ। चिंतीत जो वसतसे विषयांसि आर्त। नारायणारहित तोचि विमूढबुद्धी। आचार तत्कृत मृषा जनिं हे प्रसिद्धी ॥ ६ ॥

यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ॥
कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥७॥

जो इंद्रियें दृढमनें नियमोनि पार्था। आरंभितो विहित कर्म जगत्प्रियार्था। कर्मेंद्रियां कडुन संगविहीन उक्त। नारायणाश्रितहि तोचि विशेष—भक्त ॥७॥

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ॥
शरीरयात्रापि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥८॥

नारायण स्मरुनि तूं कारि नित्य कर्म। कीं श्रेष्ठगा

---

कर्म न करणारा. २ देहधारी. ३ भक्तिरहित. ४ सात्विक, राजस व तामस अशा तीन प्रकारच्या आपल्या धर्मानें. ५ हात, पाय, वाणी, गुद उपस्थही पांच आवरून. ६ मनानें त्यांचे विषय. ७ लोभानें व्याकुळ झालेला. ८ मनाच्या निश्चयानें. ९ स्वाधीन ठेवून. १० जगद्धितासाठीं. ११ हेतूरहित यथासांग. १२ भक्तियुक्त.

न करण्याहुनि तो स्वधर्म । चालेचिना न करितां तव देह[1]यात्रा । पाहें विचारुनि तसें अवघें[2] सुपात्रा[3] ॥८॥

**यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ॥**
**तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ ९ ॥**

कृष्णार्पणाविण दुजीं अवघींहि कर्में । होतात बंध[4]क जनांप्रति दैवधर्में[5] ॥ यासाठिं कर्मफलसंग करोनि पर्ता[6] । नारायणार्थ[7] कारें सम्यक तूंहि पार्था ॥ ९ ॥

**सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ॥**
**अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् १०**

पूर्वींच यज्ञसह निर्मुनि यां प्रजांला । नारायणोक्त[8] विधि[9] हृद्गत[10] बोलियेला ॥ व्हा वर्धमान जगतीं प्रसवोनि येणें । हा हो तुह्मा सुरभि[11] इष्टदे[12] यज्ञ तेणें ॥ १० ॥

**देवान् भावयतानेन ते देवा भावयंतु वः ॥**
**परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥**

[13]देवांसि नित्यहि तुम्ही भजतां ययानें । ते देति निर्जर[14] तुम्हां फलभाग तेणें ॥ नारायणा[15]प्रति परस्पर या प्रकारें । पावाल पूजुनि महा निज[16]सौख्य सारें ॥ ११ ॥

**इष्टान् भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः॥**
**तैर्दत्ता न प्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः१२**

---

१ उदरनिर्वाह. २ सारें. ३ विचार करण्यास पात्र आहेस अशा. ४ बंधन करणारीं. ५ प्रारब्धधर्मानें. ६ पलीकडे. ७ यज्ञार्थ. ८ ईश्वरानें सांगितलेलें. ९ ब्रह्मदेव. १० मनांतलें गुह्यगुज. ११ कामधेनु. १२ इच्छित देणारा. १३ विश्वरूपांतील अनेक देवतांस. १४ देव. १५ ईश्वराप्रति १६ आत्मसुख.

देताति इष्ट सुखभोग तुम्हांसि देव । जे यज्ञपूजित तयां नचि जो सदैव ॥ देतां प्रदायक सुरां स्वयमेव खातो। नारायणासि चुकवोनिहि चोरसा तो ॥ १२ ॥

**यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ॥**
**भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् १३**

नारायणार्पितहि जे हुतशेष खाती । ते सर्व पातक धुवोनि विमुक्त होती ॥ खातात पातकचि ते जन नष्ट पापी । आत्मार्थ जे पचविती विविधान्न सूपीं ॥१३

**अन्नाद्भवंति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ॥**
**यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥१४॥**

भूतें समग्र जनिं अन्नरसेंच होती । तो अन्नसंभव असे जलवृष्टिहातीं ॥ पर्जन्य होय घडल्यास्तव यज्ञधर्म । नारायणप्रिय तदुद्भवहेतु कर्म ॥ १४ ॥

**कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ॥**
**तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् १५**

नारायणोक्त निगमोद्भव सर्व कर्म । तो वेद अक्षरेंज कीं अविनाश धर्म ॥ यांसाठिं सर्वगत तत्त्वहि जें कळेना । यज्ञीं प्रतिष्ठित सदोदित तें ढळेना ॥ १५ ॥

---

१ इच्छित आवडते. २ यज्ञांत पूजिलेले. ३ आपल्यास इष्ट सुख देणारे. ४ स्वता आपलें आपणच. ५ ईश्वरास. ६ ईश्वरार्पित ह्म० त्यास समर्पण केलेलें. ७ आपल्या देहासाठीं. ८ धान्यादिकाची उत्पत्ति. ९ यज्ञधर्म उत्पन्न होण्याचा हेतु. १० वेदापासून झालेले. ११ अक्षरापासून झालेला. १२ व्यापक.

**एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ॥ अ-**
**घायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥१६॥**

नारायणें[1] प्रगट वर्तविलें[2] प्रकर्ष[3] । सत्कर्म—चक्र जनिं वर्तवि[4] जो न ऐसें ॥ पापायु[5] तोचि विषयेंद्रियलुब्ध जंतू[6] । पार्था वृथैव जगतांत वसे जिवंत ॥ १६ ॥

**यस्त्वात्मतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ॥ आ-**
**त्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥१७॥**

जो आत्मतत्वरँत[7] शिष्ट असाचि शोभे । संतृप्त मानव सदोदित आत्मलाभें[8] ॥ नारायण स्वगत जाणुनि तुष्ट राहे । कर्तव्य कर्म जगिं त्यास अगा नसे हें ॥ १७ ॥

**नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ॥ न**
**चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥**

कीं केलियास्तव तयासिं फलार्थ[9] नाहीं । वा प्रत्यवायँ[10]-हि इथें न करोनि कांहीं ॥ रे सर्व भूतिंहि नसेचि यया स्वदक्षा । नारायणा[11]रहित कांहिं फलाभिकांक्षा[12] ॥ १८ ॥

**तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ॥ अस-**
**क्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ १९ ॥**

यासाठिं सांडुनि सदा फलसंग हेतू । कर्तव्य कर्म जनिं सम्यक आचरें तूं ॥ निष्काम गा सकल कर्म

---

१ ईश्वरानें. २ ठरविलें. ३ उत्सुकतेनें. ४ चालवित नाहीं. ५ पापी आयुष्याचा. ६ एकप्रकारचा किटकरूपी जीव. ७ आपुल्या बिम्बात्म तत्त्वाचे ठायीं रममाण होणारा. ८ आपुल्याच लाभानें. ९।१२ फलांची इच्छा. १० अपवाद. ११ ईश्वरावांचून.

हि जो करीतो। नारायणात्मक पदाप्रति पावतो तो॥१९॥

**कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ॥**
**लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्त्तुमर्हसि ॥ २० ॥**

कर्में अशींच करितां जनकादि सिद्धी। गा पावले जगतिं सम्यक हे प्रसिद्धी॥ हा लोकसंग्रह तरी निरे-खोनि भोग्यै। नारायणोक्त अससी करण्यास योग्य॥२०

**यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ॥ स**
**यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ॥ २१ ॥**

जें जें स्वकर्म करि शिष्ट तुझ्यासमान। तें तें तसें इतरही जन थोर सान॥ कीं तो प्रमाण ठरवी विहिता-र्थे जसें। नारायण स्मरुनि वर्तति लोक तैसें ॥ २१ ॥

**न मे पार्थास्ति कर्त्तव्यं त्रिपु लोकेपु किंचन ॥**
**नानवाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥२२ ॥**

नारायणप्रिय पृथातनया विलोकीं। कर्त्तव्य कांहिंहि नसे मजला त्रिलोकीं॥ नाहीं अवाप्यहि तसा अनवाप्त काम। लोकांत वागुनि तरी करितोच काम ॥ २२ ॥

**यदि ह्यहं न वर्त्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ॥ मम**
**वर्त्मानुवर्त्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥**

नारायण प्रभुच मी जरि या स्वकर्मी। वागेन सावध न राहुनि आत्मधर्मीं॥ मद्रीतिनें सकलही नर वर्तती त्या।

---

१ श्लोकांत वर्णिलेलें महान् अर्थानें युक्त असें ब्रह्मपद. २ पाहोनी. ३ भोगण्याचा तो. ४ वेदाचें किंवा माझें वचन. ५ श्रेष्ठ मनुष्य. ६ माझ्या सख्या. ७ अर्जुना. ८ प्रिय. ९ अप्रिय काम. १० माझ्या रीतीनें. ११ मनुष्य वागतील.

पार्था मदाश्रित अशास्तव शास्त्ररीत्या ॥ २३ ॥

**उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ॥**
**संकरस्य च कर्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः॥२४॥**

हे भ्रष्ट होतिल चतुर्दश लोक पाहीं । तें युक्त कर्म जरि मी करणार नाहीं ॥ नारायण प्रकट संकर कृत्य कर्ता । होईन कीं सकल या स्वजनासि हंता ॥ २४ ॥

**सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ॥ कुर्याद्विद्वांस्तथाऽसक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥**

कर्मीं प्रसक्त फल इच्छुनि अज्ञ जैसी । गा भारता झटुनियां करितात तैसीं ॥ नारायणार्पित असंग करो स्वधर्मा तीं लोकसंग्रहचिकित्सक सुज्ञ कर्मे ॥ २५ ॥

**न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ॥**
**जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥२६॥**

ना बुद्धिभेद करणें अबुधा नरांचा । जे काम्य कर्म ठ,तया विधिकिंकराचा॥ नारायणात्मक बुधें करवावि सारीं । कर्मे स्वयें करुनि युक्त यथाप्रकारीं ॥ २६ ॥

**प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ॥**
**अहंकारविमूढात्मा कर्त्ताहमिति मन्यते ॥२७॥**

नारायण प्रकृतिच्या गुणसंगधर्मे । होतात सर्वहि

---

१ प्रत्यक्ष ईश्वर, २ आपल्या प्रजेला मारणारा. ३ अत्यंत उत्सुकतेनें. ४ अज्ञान लोक. ५ अर्जुना. ६ ब्रह्मार्पणबुद्धीनें. ७ लोकहिताविषयीं विचार करणारा. ८ अज्ञान. ९ ईश्वर प्रयुक्त. १० ईश्वर मायेच्या. ११ प्रारब्ध सेवकाचा.

सदा क्रियमाण[1] कर्मैं ॥ तेथें अहंकृति[2]बळें परि मीच
कर्ता । ऐसें विमूढ[3]मति मानितसे अपुर्ता ॥ २७ ॥

**तत्त्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ॥ गु-**
**णा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते ॥२८॥**

तत्त्वज्ञ[4] तो तरि बघे गुणकर्मभोगीं । नाराय[6]णात्मक अ-
कर्तृ[7]पणा स्वआंगीं ॥ कीं वागती गुण गुणीं विषयीं हृ[8]-
षीकें । मानोनि यापरि तिथें विजया न सो[9]के ॥ २८ ॥

**प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जंते गुणकर्मसु ॥ तान-**
**कृत्स्नविदो मंदान् कृत्स्नविन्न विचालयेत्॥२९॥**

मायागुं[10]णग्रथित मूढमती जयाची । नारायणाविण
असद्[11]गुणकार्मीं तेचि ॥ झोंबोनि राहति अकृत्स्न[12]विदां ज-
डां त्या । सर्वज्ञि[13] ना चिथविणें उपदेशरीत्या ॥ २९ ॥

**मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ॥**
**निराशीर्निर्ममो भूत्वा युद्ध्यस्व विगतज्वरः॥३०॥**

मातें समर्पुनि तरी अवघींहि कर्मैं । अध्यात्मि[14]का
सुमतिनें व्यवहारधर्मैं ॥ नारायणो[15]रहित दुर्ममता दुरा-
शा । सांडोनि निर्भय करीं रण शत्रुनाशा ॥ ३० ॥

**ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठंति मानवाः ॥ श्रद्धा-**
**वंतो ऽनसूयंतो मुच्यंते ते ऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥**

---

१ करीत असलेलीं. २ अज्ञान देह अंहकाराच्या वेगानें. ३ मोहितबुद्धीचा. ४ तत्त्व जाणणारा ज्ञानी. ५ पद्धतींत. ६ ईश्वर-प्रयुक्तमीपणानें ७ अकर्तेपणा. ८ इंद्रियें. ९ सवके लुब्ध होई. १० मायापाशानें बांधलेली. ११ वाईट. १२ असर्वज्ञ. १३ सर्व जाणत्यांनीं. १४ वेदांतविचारयुक्त. १५ ईश्वरभक्तिराहित.

नारायणोक्त मत नित्य असेंच माझें। प्रेमें अनुष्ठितिल मानव तेहि हें जे॥ श्रद्धालु सज्जन अनिंदक मत्कृतीचे। कर्मांतुनी सहज गा सुटतील साचे ॥ ३१ ॥

**ये त्वेतदभ्यसूयंतो नानुतिष्ठंति मे मतम् ॥**
**सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥**

नारायणोवरिच ठेवुनि दोष कोणी। जे हें न आचरति मन्मत आदरोनी। सर्वत्र बोधपथिं मूर्ख विशेष तेची। निर्बुद्ध जाण खल सन्मति नष्ट ज्यांची ॥ ३२ ॥

**सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ॥ प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥**

पूर्वार्जित-प्रकृति-तुल्यचि गा स्वतांच्या। वर्ते सुजाणहि रुढींत जगन्मताच्या ॥ नारायणप्रकृतिला वश सर्व भूतें। याकारणें करिल निग्रह काय तेथें ॥ ३३ ॥

**इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ।**
**तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥ ३४ ॥**

अर्थी व्यवस्थित सदा सकलेंद्रियांच्या। जे काम कोप असताति अगा तयांच्या ॥ नारायणाविण अधीन कधीं न व्हावें। या मोक्षमार्गिं रिपु तेचि निज स्वभावें ३४

---

१ श्रुतिसिद्ध मत. २ उपासितील, आचरितील. ३ भक्तिमान. ४ माझ्या अलौकिक कर्मांची निंदा न करणारे. ५ सर्वेश्वरावर. ६ माझें मत. ७ ज्ञानमार्गी. ८ चांगली बुद्धि. ९ नाहींशी झाली आहे. १० पूर्वी संपादन केलेल्या. ११ सारखा. १२ वागतो. ९ ईश्वरमायेला १० अत्मतत्त्वरहित ११ शत्रु.

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥३५॥

कल्याणकारकाचि गौण[2] तरी स्वधर्म । संपूर्ण सांग करण्याहुनि अन्य[3] कर्म ॥ मेल्यासही सुगति[4] साधतसे स्वकर्मी । नारायणाविण महाभय अन्य[6] धर्मी ॥ ३५ ॥

## अर्जुन उवाच

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः । अनि-
च्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥३६॥

बोले पृथासुत अतां कवणें तरी तो । हा प्रेरिला पुरुप पातक जो करीतो ॥ नारायणा यदुवरा न च इ-च्छितांना ।कीं योजिल्यापरि बळें विधर्मीहि नाना॥३६॥

## श्रीभगवानुवाच

काम एप क्रोध एप रजोगुणसमुद्भवः ॥ महा-
शनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणं ॥ ३७ ॥

नारायणें प्रभु वदे सकळांसि जोंची । हा काम कोपहि[13] रजोगुणजन्य तोची ॥ खादाड पातकि महा इह मर्त्यलोकीं।तूं जाण आणि रिपु[14] यासि मनीं विलोकीं३७

धूमेनाव्रियते वन्हिर्यथाऽऽदर्शो मलेन च ॥ य-
थोल्बेनावृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥

कीं धूम्रवेष्टित हुताशन[15] मंद जगा । आदर्श[16] होय म-

१ हितकारक. २ नीच असला तरी. ३ दुसरें किंवा दुसऱ्याचें. ४ उत्तम गति. ५ आपुले कर्मांत ६ दुसऱ्याचे धर्मांत. ७ अर्जुन. ८ प्रेरित केला. ९ कृष्णा. १० वाईट कर्मात. ११ श्रीकृष्ण. १२ जेर करी. १३ क्रोध. १४ शत्रु. १५ अग्नि. १६ आदर्श म्ह० आरसा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... अ... ३ रा. त. ४५

लयुक्तहि अंध तैसा । ... णस्मृति[1] विज्ञानें गर्भ ... कें । हें वेढिलें[2] जग तशापाशें[3] कामजाळें ॥ ३८ ॥

**आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ॥**
**कामरूपेण कौंतेय दुष्पूरेणानलेन च ॥ ३९ ॥**

संवेष्टिलें[4] सकल ज्ञा... व तत्त्व येणें । जो ज्ञानियासि रिपु[6] काम सदैव तेणें ॥ नारायणाविण अनेक सकामरूपें । पार्था हुताशन[7] दुर्धर आत्मतापें ॥ ३९ ॥

**इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ॥ एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥**

कीं इंद्रियें मनहि ... ठिकाण ज्याचें । नारायणारहित वर्णिति वेद वाचें । यांहीं विमोहित करी सकळां जिवांला । हा ज्ञान वेष्टुनि हि कामचि देहियांला ॥ ४० ॥

**तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ॥ पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनं ॥ ४१ ॥**

यासाठिं तूं भरत... ... आधीं । तीं इंद्रियें नियमुनी परमार्थ साधीं ॥ नारायण स्मरुनि या वधि[10] पापियासी । जो ज्ञान आणि ... नभूति[11] समग्र नाशी ॥ ४१ ॥

**इंद्रियाणि परा...रिंद्रियेभ्यः परं मनः ॥**
**मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥**

---

१ ईश्वरस्मरणावांचून. ... केलें. ३ आशापाशानें. ४ सम्यक् प्रकारेंकरून वेष्टन केलें ... ५ ज्ञान. ६ शत्रु. ७ अग्निप्रमाणें. ८ आपुल्या. ९ भरतकुळांत श्रेष्ठ अशा अर्जुना. १० मार. ११ अनुभव.

स्थूलाहुनी[1] पर कवी म्हणती हृषीकें[2] । त्यां इंद्रियां पलिकडे मन तूंहि देखें ॥ तैसी मनाहुनि परें[3] स्थिर बुद्धि साजो । नारायण प्रभुच बुद्धिपलीकडे[4] जो ॥४२॥

**एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ॥**
**जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥४३॥**

बुद्धीहुनी पर तिनेंचि[5] असा महात्मा । जाणोनि थांबवुनि तो हृदयीं स्वआत्मा ॥ नारायण स्मरुनि सम्यक सव्यसाची । तूं कामरूपि रिपु[6] मारि अजिंक्य[7] तोची ४३

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥**

श्रीमान् षड्गुणवान कृष्ण भगवद्गीता श्रुतीसार[8] हें ।
योगाची स्मृति[9] द्यावया जनपदीं[10] जी ब्रह्मविद्या स्वयें ॥
वाखाणी तिसऱ्यांत[11] कर्मसरणी[12] पार्थाप्रती तेचि तो ।
या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें[13] बोलतो ॥ ३ ॥

**श्रीमन्नारायणार्पणमस्तु.**

---

१ स्थूलदेहाहून. २ इंद्रियें. ३ पलीकडे. ४ पलीकडचा. ५ बुद्धीनेंच. ६ शत्रु. ७ जिंकण्याजोगा नाहीं. ८ वेदांतसार. ९ आत्मयोगाचें स्मरण. १० जगांत ११ तिसरे अध्यायांत. १२ कर्माची पद्धत. १३ टीका निमित्तानें.

# चतुर्थाध्यायप्रारंभः ।

**श्रीभगवानुवाच.**

**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ॥
विवस्वान् मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत् १**

नारायण प्रभु वदे निगमप्रयोग । हा मी रवीसि वदलों निजं कर्मयोग ॥ सांगे अनादि पथेंही रवि तो मनूलॉ । इक्ष्वाकु तत्सुत तया मनु बोलियेला ॥ १ ॥

**एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ॥ स
कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥**

हा योग पावुनि अशाच परंपरेनें । राजर्षि जाणति महा दृढनिश्चयानें ॥ काळेंकरूनि बहुता दिशिं तो तुह्मांला । नारायणासम सख्या जनिं अस्त जाला ॥ २ ॥

**स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ॥
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ३**

तो हा असा तुजसिं म्यां कथिला प्रयोग । नारायणोक्तचि पुरातन कर्मयोग ॥ सद्भक्त तूं मम सखा म्हणऊनि आजी । व्हाया प्रसिद्ध गुज उत्तमही समाजीं ॥३॥

---

१ श्रीकृष्ण. २ वेदांत. ३ सूर्याला. ४ आत्मकर्मयोग. ५ मार्ग. ६ वैवस्वतमनूला ७ त्याचा मुलगा. ८ हरिश्चंद्ररामचंद्रासारखे राजकुलांतील महात्मे पुरुष. ९ सूर्यप्रमाणें. १० अदृश्य. ११ वेदोक्तच. १२ आपले गुह्यहृद्गत.

## अर्जुन उवाच.

**अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ॥ कथ-
मेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४ ॥**

साश्चर्य[1] अर्जुन वदे वसुदेवधार्मी[2] । जालें तुझें जनन[3] सूर्य अनादि[4] आम्ही ॥ ऐकों तरी समजणें मग सांग कैसें । नारायणा प्रथम तूं वदलासि[5] ऐसें ॥ ४ ॥

## श्रीभगवानुवाच.

**वहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ॥
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥५॥**

नारायण प्रभु वदे घडली[6] अनंत । माझीं तुझींहि जनेनें[7] कथितातिसंत ॥ तीं जाणतों सकल ईश[8] ह्मणूनि मी तूं[9] । किंचिज्झ नेणसि परंतप[10] गा परंतू ॥ ५ ॥

**अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोपि सन् ॥
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥६॥**

मी तो असोनिहि अजन्म[11] अनाश आतमा । भूतांसि ईश्वर अचिंत्य[12] असा महात्मा ॥ नारायणप्रकृतिलागिं[13] अधिष्ठुनीयां[14] । होतों[15] तिनें जगतिं जी विमलात्ममाया[16] ६

**यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत**

---

१ आश्चर्ययुक्त. २ घरीं. ३ जन्म. ४ पुरातन. ५ सांगितलेंस. ६ होऊन गेलीं. ७ जन्में ८ ईश्वर. ९ जीव. १० युद्धांत दुसऱ्यास जर्जर करणारा असा [illegible]वान. ११ जन्मरहित. १२ चिंतन करण्यास योग्य नाहीं असा निर्गुण. १३ ईश्वरमायेला. १४ अनुसरून. १५ जन्मतों. १६ निर्मल आत्मशक्ति.

**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥७॥**

ज्या ज्या प्रसंगिं घडते जनिं धर्महानी । ती ग्लानि पाहुनिहि धर्म–मताभिमानी ॥ जाणोनि आणि अभिवृद्धि अधार्मिकांची । नारायणाख्यतनु मी सृजितों स्वतांची ॥७॥

**परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ॥**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८ ॥**

साधूंचिया सतत सम्यक रक्षणाला । नाशावयाप्रतिहि पातकि दुर्जनांला ॥ स्थापावया स्तव पुन्हां निज धर्म नामी । नारायण प्रतियुगीं जनिं संभवें मी ॥ ८ ॥

**जन्मकर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ।**
**त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥९**

जाणे अलौकिक अशीं मम जन्मकर्में । नारायण स्मरुनि सत्यहि जो स्वधर्में ॥ पार्था त्यजोनि वपुला परिपूत होतो । जन्मा न ये पुनरपी मज पावतो तो ॥ ९ ॥

**वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ॥**
**बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ॥१०॥**

गा काम कोप भय यां विरहीत नित्य । मद्ध्याननिष्ठचि मदाश्रित आणि सत्य ॥ ज्ञानें तपें बहुत होउनि पूत लोकीं । नारायण स्मरुनि मत्पद पावले कीं ॥१०॥

---

१ उदासी. २ धार्मिकमताचा अभिमानी मी. ३ विशेष वृद्धि ४ दुर्जनाची. ५ उत्पन्न करितों. ६ चांगले प्रकारानें. ७ दुष्कर्म करणारे. ८ चांगला. ९ होतों १० शरीराला. ११ पवित्र.

**ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् । मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ ११ ॥**

कीं जो जसा भजतसे मजला तसाच । मीही तयास भजतों जगतांत साँच ॥ नारायण स्मरुनि मत्पथिं वर्ततातो । पार्था यथामति समस्त मनुष्यजाती ॥ ११ ॥

**कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः ॥ क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा १२**

कीं इच्छुनी जनिं सकामचि कार्यसिद्धी । आराधिती इतर देव विमूढबुद्धी ॥ त्या सिद्ध होति नरलोकिं सवेग अन्य । नारायण स्मरुनि सर्वहि कर्मजन्यें ॥ १२ ॥

**चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ॥ तस्य कर्त्तारमपि मां विद्ध्यकर्त्तारमव्ययम् १३**

त्यां चार वर्ण जगतांतरिं निर्विकारें । नारायणोक्त गुणकर्मगतिप्रकारें ॥ कर्त्ता बनोनि रचिलें तरिही अकर्त्ता। त्यांचा असें समज अव्यय मीच भर्ता ॥ १३ ॥

**न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा ॥ इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बद्ध्यते॥१४**

कर्में न लिंपति मला तसि तत्फळींही । मातें नसे गरज हें समजोनि पाहीं ॥ नारायण प्रभु असें मज जाणतो तो । कर्में करूनिं न कदापिहि बद्ध होतो ॥ १४ ॥

---

१ खरेपणानें. २ माझ्या मार्गी. ३ नानाप्रकारे निरनिराळे. ४ मूढ बुद्धीचे लोक. ५ कर्माने उत्पन्न होणाऱ्या त्या सिद्धि. ६ मालक.

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ॥
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरैः कृतम् ॥ १५

कर्में असें समजुनी अवघींहि केलीं। प्राचीन साधक जनीं बघ पूर्वकालीं॥ नारायण स्मरुनि यास्तव कर्म तूंही॥ केलें तसेंचि करि पूर्विलें पूर्वजांहीं ॥ १५ ॥

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ॥
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् १६

गा कर्म कायहि अकर्म कसें असेंच। चिंतूनि मोहित इथें कवि तेहि साच॥ नारायणोक्त तुज तें कथितों स्व-कर्म। जाणोनि जें अशुभ मुक्त चि होसि वर्म ॥ १६ ॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ॥
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः॥१७॥

कीं जाणणें विहित वैदिक कर्मतत्त्व। तैसें विकर्महि निषिद्ध जगन्ममत्व ॥ नारायणार्पित सुकर्म अकर्म चोख। ऐसी त्रिधा गहन कर्मगतीच एक ॥ १७ ॥

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ॥
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत्॥१८॥

कर्मीं अबाधितँ असेंचि अकर्म पाहीं। नारायणोक्त अघकर्म अकर्मि जोही ॥ तो बुद्धिमान मनुजांतरिं युक्त तोच। सर्वज्ञ कर्म सगळें करणार साच ॥ १८ ॥

---

१ पुरातन. २ पूर्वींच्या वडील मंडळींनीं. ३ विचार करून. ४ पातक अथवा दुःख यांतून मोकळा होसील. ५ तत्त्व. ६ शुद्ध. ७ न बाधणारे निर्दोष.

**यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ॥**
**ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः॥१९॥**

आरंभितां विहित सर्वेहि कर्म-ज्याचें । संकल्पकाम-परिवर्जित चित्त साचें ॥ नारायण स्मरुनि पंडित जाळि कर्में । ज्ञानाग्निनें ह्मणति तो बुध आत्मधर्में ॥ १९ ॥

**त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ॥**
**कर्मण्यभिप्रवृत्तोपि नैव किंचित्करोति सः॥२०॥**

टाकोनि कर्मफलसंग सदैव तृप्त । लोकीं निराश्रित असोनि नसे अतृप्त ॥ नारायणस्मरणशील वसे स्वधर्मीं । कांहीं प्रवर्तुनि[1] न तो करि सर्व कर्मीं ॥ २० ॥

**निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ॥**
**शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम्॥२१॥**

देहीं निराश दृढ जो मन जिंकिलेला । सर्वत्र संसृति-परिग्रह[2] टाकिलेला ॥ कर्तव्य कर्म वपुचें[3] कारितां स्वभावें । नारायणप्रियसखा अघ[4] तो न पावे ॥ २१ ॥

**यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ॥**
**समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबध्यते२२**

होतो अयोचित[5] तया निजदैवलाभें । निर्द्वंद्व मत्सर-विहीन सुखींच शोभे ॥ कीं सिद्ध्यसिद्धिसमयींहि समान जो तो । नारायणप्रिय[6] न बद्ध करोनि होतो ॥ २२ ॥

**गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ॥**

---

१ प्रवृत्तक होऊन, २ संसारसंग. ३ शरीराचें. ४ पाप. ५ अनायासें. ६ नारायणाचा भक्त.

**यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥**

कर्तृत्वमुक्त[1] गतसंग[2] असा जयाचें। नारायणीं सतत संस्थित[3] चित्त त्याचें ॥ यज्ञार्थ[4] जें विहित कर्म जगांत गों[5] तें। होऊनियां सफल सर्व लयासि[6] जातें ॥२३॥

**ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ॥**
**ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥**

कीं ब्रह्म तेंचि हवि[7] अर्पण कर्मकर्ता। ब्रह्माग्निमाजि हुत ऐक्य बुझोनि[8] कर्ता ॥ ब्रह्मींच संगम तया निगम-प्रयोगें। नारायणस्मरण–कर्म–समाधियोगें ॥ २४ ॥

**दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ॥**
**ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ २५ ॥**

दैवी उपासिति जसे क्रतु[9] कर्मयोगी। नारायणस्मरण-भाव धरोनि आंगीं ॥ ब्रह्माग्निमाजि दुसरे यजिताति यज्ञ। ब्रह्मार्पणेंचि विधिपूर्वक तेविं सुज्ञ ॥ २५ ॥

**श्रोत्रादीनींद्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ॥**
**शब्दादीन्विषयानन्य इंद्रियाग्निषु जुह्वति ॥२६॥**

श्रोत्रादि[10] इंद्रियसमूह तसेच कोणी। या निग्रहाग्नितहि होमिति आवरोनी ॥ नारायणप्रिय दुजे यजिताति संत। शब्दादि ते विषय इंद्रियपावकांत[11] ॥ २६ ॥

---

१ सर्व कर्मांपासून मोकळा झालेला. २ संगरहित. ३ सम्यक् स्थिर झालेलें, ४ यज्ञरूपीनारायणाप्रीत्यर्थ ५ अर्जुना. ६ समाप्ति होते. मग त्याचा भोग उरत नाहीं. ७ होमद्रव्यें. ८ समजून केलें असतां. ९ यज्ञ. १० कान आदिकरून. ११ इंद्रिय-रूपी अग्नीमध्यें.

सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ॥
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥२७॥

प्राणक्रियाहि करणीं सकलेंद्रियांचीं । ज्ञानप्रकाशित निरोधहुताशिं साचीं ॥ आत्मार्पणें अपर सम्यक होमिताती । नारायणामृत मुखें हुतशेष खाती ॥२७॥

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथापरे ॥
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥२८

कीं द्रव्ययज्ञ तपयज्ञहि योगयज्ञ । नारायण स्मरुनिया यजिताति सुज्ञ ॥ स्वाध्याय–बोध–मख सुव्रतवंत अन्य । गा यत्नशीलहि उपासुनि होति धन्य॥२८॥

अपाने जुह्वति प्राणं प्राणे ऽपानं तथा ऽपरे ॥
प्राणापानगती रुध्वा प्राणायामपरायणाः २९॥

प्राणासि होमिति अपानिं तसेच कोणी । प्राणीं अपान यजिती दृढ आवरोनी ॥ दोनीहि कोंडुनि गती असतात अन्य । नारायणस्मृतिपरायण तेहि धन्य॥२९

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ॥
सर्वे ऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥३०॥

आहार नेमुनि दुजे हटयोगि कांहीं । प्राणांतची निज असू यजिताति पाहीं ॥ नारायणप्रिय समस्तहि यज्ञवेत्ते । यज्ञीं असें निरसिती निज पातकांतें ॥३०॥

---

१ आत्मनियमनाग्नींत, २ ब्रह्मार्पणानें, ३ इतर, ४ यज्ञशेषपुरोडाश, ५ प्राण, ६ यज्ञ जाणणारे.

**यज्ञशिष्टामृतभुजो यांति ब्रह्म सनातनम् ॥**
**नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ३१**

जे यज्ञशेष अमृताप्रति सेविणारे । ते ब्रह्म पावति सनातन अर्जुना रे ॥ नारायणाख्य[1] न अयज्ञ[2] जनासि साचा । हा लोक सौख्यद तया परलोक कैंचा ॥३१॥

**एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ॥**
**कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ३२**

ऐसे अनेकविध यज्ञ श्रुति[3]प्रयोगें । विस्तारले विधि[4]-मुखीं निजकर्मयोगें ॥ नारायणोक्त अजि कर्मज[6] जाण सारे । जाणोनि हें सुटसि सांडुनिया पसारे ॥ २२ ॥

**श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ।**
**सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥३३॥**

द्रव्याध्वराहुनि[8] विशेषचि बोधयज्ञ[9] । नारायणोक्त विजैंया[10] वदताति सुज्ञ ॥ ज्ञानींच कीं सकल सूक्त[11] असूक्त[12] कर्में । सर्वांशीं[13] संपति[14] पृथातनया स्वधर्मे ॥ २२ ॥

**तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ॥**
**उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥३४॥**

तें ज्ञान जाण नमनें विनयेंचि प्रश्नें । नारायणा[15]समचि सद्गुरुसेवनानें ॥ गा साधुवर्य तुजला उपदेशितील ।

---

१ नारायण नामक, २ यज्ञ न करणारे, ३ वेद, ४ ब्रह्मदे[illegible] मुखानें, ५ वेदोक्त, ६ कर्मापासून होणारे, ७ संसार [illegible] द्रव्य-यज्ञाहून, ९ ज्ञानयज्ञ. १० अर्जुना, ११ बरीं [illegible] सा-रीं सर्व प्रकारानें, १४ पूर्णता पावतात, १५ ईश्वर[illegible]

ज्ञानी सदैक्य वघणार सुशास्त्रशील ॥ ३४ ॥

**यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ।**
**येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥३५**

जाणोनि जें पुनरपी नच मोहेसील। गा पांडवा कधिं असा जइं पाहसील । नारायणात्मक चराचर आपणांत। माझेहि ठायिं मग ऐक्य तसें जनांत ॥ ३५ ॥

**अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ॥**
**सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥**

आहेस पाप करणार विशेष पापी । रे सर्व पातकिजनांत जरी तथापी ॥ या ज्ञानरूप तेरिनें अघसागरासी नारायण स्मरुनि सत्य तरोनि जासी ॥ ३६ ॥

**यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ॥**
**ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥३७॥**

कीं इंधनें ज्वलित वन्हि सवेग लोकीं । जाळोनि भस्म करि जेविं तसीं विलोकीं ॥ ज्ञानाग्नि भस्म करि सम्यक सर्व कर्में । नारायणप्रियें पृथातनया स्वधर्में ॥ ३७ ॥

**न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥**
**तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति ३८**

ज्ञानासमान इहलोकिं पवित्र नाहीं । नारायणा शपथ आणिक अन्य कांहीं ॥ ज्ञान स्वयें सहज तें दृढ

---

१ चांगलें एकत्व, २ मोहीत होसील, ३ ईश्वरात्मक, ४ स्थावर जंगम जग, ५ नौकेनें, ६ पाप, ७ पेटलेला, ८ अग्नि, ९ लवकर, १० श्रीकृष्णास आवडणाऱ्या कुंतीपुत्रा अर्जुना,

योगसिद्ध। कोळेंचि आत्मैपणिं लाहतसे प्रसिद्ध ॥३८॥

**श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ॥**
**ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ३९**

नारायणस्मरणतत्पर भक्तिमंत। तो ज्ञान लाहत जितें-द्रिय सुज्ञ संत ॥ ज्ञानासि पावुनि सत्वेंगचि थोर शांती। पावे अचंचल महा अविनाशकांती ॥ ३९ ॥

**अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ॥**
**नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ४०**

अज्ञान आणिक अभक्त तसाच लोकीं। जो संशयी नर विनाश तया विलोकीं ॥ नारायणोक्त इहलोकिं परत्र आणी। नाहींत संशयि–जनास सुखेंहि दोनी ॥ ४० ॥

**योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् ॥**
**आत्मवंतं न कर्माणि निबध्नंति धनंजय ॥४१॥**

कर्में त्यजी करुनि सर्व समत्वयोगें। ज्ञानेंचि संशय हरी निगमैप्रयोगें ॥ नारायणीं स्थिर सदा निजैरूपिं जागा। कर्में न बाधति तयास धनंजया गा ॥ ४१ ॥

**तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ॥**
**छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥४२॥**

अज्ञानजन्य तरि छेदुनि अंतरींचा। ज्ञानासिनेंचि-

---

१ कालांतरानें २ आपुलेंच ठायीं. ३ वेदोक्त. ४ परलोक. ५ वेदवाक्यांनीं. ६ आतमस्वरूपीं. ७ अर्जुना ८ अज्ञानापासून उत्पन्न होणारा. ९ ज्ञानरूपी तरवारीनें.

निजं संशय हा मनींचा ॥ नारायण स्मरुनि ऊठ सख्या सवेग । गा भारतो करिं सुखें निज कर्मयोग ॥४२॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ॥
ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णा-
र्जुनसंवादे ज्ञानयोगो नाम चतुर्थोऽध्यायः ॥४॥

श्रीमान् षड्गुणवान कृष्ण भगवान् गीता श्रुतीसार हें। योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥ वाखाणी निजबोधयोगहि तिथें चौथ्यांत जिष्णूस तो। या चिंतामणिनंदनानें हरी टीकामिसें बोलतो ॥४॥

---

# अध्याय ५ वा.

## ॥ अर्जुन उवाच ॥

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ॥
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥१॥

ऐकोनि अर्जुन वदे सकल क्रियांचा । त्याग प्रशंसिसिहि योग पुन्हां तयांचा ॥ जें यांत एक मज सौख्यद कृष्णनाथा । नारायणा वद सुनिर्श्चित तेंचि आतां ॥१॥

---

१ आपला. २ अर्जुना. ३ स्मरण.. ४ वर्णी. ५ ज्ञानयोग. ६ मुखानें. ७ संन्यास. ८ निश्चये करून.

श्रीभगवानुवाच

**संन्यासः कर्मयोगश्च निश्रेयसकरावुभौ । त-**
**योस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥२॥**

कल्याणकारक वदे परमेश दोनी । संन्यासतत्त्व निजकर्मविधान आणी ॥ नारायणप्रिय तयांत गुरू परं तू । त्यागाहुनी विहितकर्मविधान–तंतू ॥ २ ॥

**ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति।**
**निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥३॥**

संन्यासि तो समजणें विजया सदाही । द्वेषीत नाहिं मनिं इच्छित जो न कांहीं ॥ निर्द्वंद्व मुक्तचि असे भव-बंधनानें । नारायण स्मरुनियां सुटतो सुखानें ॥ ३ ॥

**सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः ॥**
**एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विंदते फलम् ॥४॥**

गा बोलती पृथक सांख्यहि कर्मयोग । अज्ञान ते परि न पंडित तेविं मोघ ॥ कीं एक सम्यक उपासुनि दो परीचें । नारायणोक्त फल पावति सुज्ञ साचे ॥४॥

**यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ॥**
**एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति॥५॥**

जें स्थान सांख्यें समजोनिहि पावताती । सत्कर्मयोग करणार तिथेंचि जाती ॥ जो सांख्य–योग–गुज एकपणें

---

१ श्रीकृष्ण. २ ईश्वरास मान्य. ३ निरनिराळे. ४ वेदोक्त. ५ अद्वैत बोध. ६ निर्गुण अद्वैत. आणि सगुणकर्म योगाचें. रहस्य श्रेष्ठ.

विलोकी । नारायणाप्रियाचि तो बगणार लोकीं ॥ ५ ॥

**संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ॥**
**योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥६॥**

संन्यास योगविधिवांचुनि पार्थवीरा । नारायणासम सुदुर्लभ ये विचारा ॥ जो कर्मयोगरत सन्मुनि तो स्व-भावें । गा ब्रह्मतत्त्व जनिं सम्यक शीघ्र पावे ॥ ६ ॥

**योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः॥**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नापि न लिप्यते ॥७॥**

योगें विशुद्ध[1]मति जो मन जिंकिलेला । नारायणीं स्थिर जितेंद्रिय जाहलेला ॥ कीं सर्वभूतहृदयस्थित[2] शुद्ध आत्मा । कर्में करी तरि अलिप्ताचि तो महात्मा ॥७॥

**नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ॥**
**पश्यन्शृण्वन्स्पृशन् जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन् श्वसन्८**

कांहींच मी न करि या परि तत्त्ववेत्ता[3] । नारायण स्मरुनि मानि परेशसत्ता ॥ कीं पाहतां परिसतां शिवतां हि जातां । वा हुंगितां श्वसनिं[4] भोजनिं झोंप घेतां ॥८॥

**प्रलपन्विसृजन्गृण्हन्नुन्मिषन्निमिषन्नपि ॥**
**इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तंत इति धारयन् ॥ ९ ॥**

लोकांमधें प्रलपतां[5] त्यजितांहि घेतां । उन्मेषणीं[6] मिटुनि नेत्रहि काळ जातां ॥ सर्वेंद्रियें विषयिं वर्तति हें

१. शुद्धबुद्धीचा. २ सर्व भूतांच्या हृदयांत राहणारा ३ ज्ञानी. ४ श्वासोच्छ्वास चालतांना. ५ बरें वाईट बोलतांना. ६ डोळे उघडे असतांना.

धरोनी । नारायणोक्त मनिं आणि जनिं स्मरोनी ॥९॥

**ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोतिं यः॥**
**लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥१०॥**

ब्रह्मीं समर्पण करोनि समस्त कर्में । जो संग सांडुनि सदा करितो स्वधर्में ॥ नारयणप्रणत तो नच पापलिप्त । राहे जसें कमलपत्र जळीं अलिप्त ॥ १० ॥

**कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि ॥**
**योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वात्मशुद्धये ११**

लोकीं शरीर मन आणिक बुद्धियांहीं । वा वासनारहित केवल इंद्रियांहीं ॥ योगी स्वकर्म करिती निजशुद्धिसाठीं । नारायण स्मरुनि सांडुनि संगघाटी ॥११॥

**युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीं ॥**
**अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबद्ध्यते १२**

योगी त्यजोनि फलसंगति युक्त तोची । पावे सुशांति निर्गमोक्त निजस्थितीची ॥ नारायणस्मरणहीन अयुक्त जो तो । संकल्पयुक्त फल इच्छुनि बद्ध होतो ॥१२॥

**सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी ॥**
**नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३ ॥**

कर्में करोनि अवघीं त्यजुनी मनें हीं । नारायणीं रत-

---

१ वेदोक्तरहस्य, २ आपुल्या वर्णाश्रमधर्मानें. ३ नारायणभक्त ४ पापानें दूषित. ५ आपुलें कर्म. ६ संगाची रीत. ७ ज्ञानी. ८ वेदोक्त. ९ अज्ञानी.

सुखें समचित्त राही ॥ द्वारें जयां नव तयां नगरांत देही[1] । ऐसा स्वयें न करि तो करवी न कांहीं ॥१३॥

**न कर्त्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ॥**
**न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्त्तते ॥१४॥**

कर्त्तृत्व आणि जगतांतिल सर्व कर्में । नारायण प्रभु नें निर्मि[2] परेश[3] धर्में ॥ तैसेंच कर्मफलभोग परि प्रभावें । वर्ते प्रकर्षितपणें प्रकृति स्वभावें ॥ १४ ॥

**नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ॥**
**अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ॥१५॥**

तो घेत नाहिं विभु पातक वा कुणाचें । तैसें न घे सुकृत[4] संचितही जनाचें ॥[5] सतज्ञान वेष्टितें अजाणपण-भ्रमानें । नारायणीं चुकति मोहुनि जीव तेणें ॥ १५ ॥

**ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ॥**
**तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥१६॥**

ज्यांचें अजाणपण तें हृदयस्थ बोधें[6] । नारायण स्मरुनि सद्गुरुवाक्यशोधें ॥ जें नासलें रविसमानाचि तें तयांचें । ज्ञान प्रकाशि गुणधर्म परा जडाचे ॥ १६ ॥

**तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ॥**
**गच्छंत्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥१७॥**

---

१ देहधारी. २ उत्पन्न करीत नाहीं. ३ ईश्वर. ४ पुण्य. ५ गंडाळलेले. ६ आत्मज्ञानानें.

तज्ज्ञाननिष्ठ[1] जनिं तद्गतचित्तबुद्धी[2] । नारायणस्मृतिपरायण[3] तोचि सुबुद्धी[4] ॥ जाती पुन्हां परतणें न कधीं जिथोनी । ज्ञानोदधींत[5] कृतकल्मष[6] ते धुऊनी ॥ १७ ॥

**विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ॥**
**शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः १८**

विद्वान जो विनययुक्त अशा द्विजाच्या । ठायींहि गाय गज निंद्य तया शुनाच्या[7] ॥ आत्मत्विं पंडित[8] सदा सम पाहताती । नारायणात्मक जनीं श्वपचादि[9] जाती ॥ १८ ॥

**इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ॥**
**निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः १९**

येथेंचि सम्यक तिहीं भव[10] जिंकियेला । ज्यांचा मनोंकुर सदा समतेंत ठेला ॥ कीं ब्रह्म तें सम अदोष ह्मणोनि पाहीं । नारायणीं सुजन ते स्थिर सर्वदाही ॥ १९ ॥

**न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियं ॥**
**स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणिं स्थितः ॥ २० ॥**

पावोनि हर्षत नसे प्रिय जो विदेही । उद्विग्न नाहिं जगिं अप्रिय पावतांही ॥ नारायणस्थित असा अविमोहवंत[11] । ब्रह्मज्ञ आत्मपदिं सुस्थिर बुद्धिमंत ॥ २० ॥

**बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखं ॥**

---

१ त्या ज्ञानाच्या ठायीं निष्ठा ठेविणारे. २ त्यांतच गेली आहे चित्त आणि बुद्धि ज्यांची. ३ स्मरणशील. ४ सुबुद्धी. ५ ज्ञानसमुद्रांत ६ पाप. ७ कुत्र्याच्या. ८ शहाणे ९ चांडाळादि. १० संसार. ११ मोहरहित.

**स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥ २१ ॥**

मायीक बाह्य[1] विषयांतरिं सक्त नोहे । स्वानंद पावुनि सुखी निज[2]रूपिं राहे ॥ जो ब्रह्मयोगरत तो स्थिरचित्त योगी । नारायण स्मरुनि अक्षय सौख्य भोगी ॥२१॥

**ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ॥**
**आद्यंतवंतः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥**

जे स्पर्शजन्य अवघे विषयोपभोग । ते दुःखकारणचि गा कृतकर्मसंग ॥ आद्यं[3]तवंतहि तिथें रमती न सुज्ञ । नारायणप्रिय पृथातनया मति[4]ज्ञ ॥ २२ ॥

**शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ॥**
**कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः२३**

जो येथ सोसुं शकतो असतां जिवंत । प्राणी शरीरमरणा अधिं बुद्धिमंत । गा काम[5]कोपज भयंकर वेग आंगीं । नारायण स्मरुनि तो सुखि तोचि योगी ॥२३॥

**योंऽतः सुखोंऽतरारामस्तथांऽतर्ज्योतिरेव यः ॥**
**स योगी ब्रह्म निर्वाणं ब्रह्मभूतोधिगच्छति॥२४॥**

अंतस्थ जो सुखि हृदीं रममाण होतो । ज्योतिः स्वरूपचि तसा हृदयस्थ जो तो । निर्वाण आत्मपद योगि ययाच लोकीं । नारायणात्मकचि होउनि पावतो कीं ॥२४॥

---

१ बाहेरच्या विषयांत. २ आत्मस्वरूपीं, ३ आदिअंतवान. ४ बुद्धिमान. ५ कामक्रोधांपासून उत्पन्न होणारे.

**लभंते ब्रह्म निर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ॥**
**छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥२५॥**

निर्वाणें तें विगतपातक भक्त संत । ब्रह्मस्वरूप मुनि पावति गा पसंत ॥ छेदोनि भेदमति जे स्थिर सर्व भूतीं । नारायणासम हितीं रत राहताती ॥ २५ ॥

**कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसां ॥**
**अभितो ब्रह्मनिर्वाणं वर्तते विदितात्मनाम् २६**

जे कामकोपसुविहीनाचि यत्नशील । ऐसे यती नियतें चित्ताहि जे सुशील ॥ नारायणात्मक सभोंवति गा तयांच्या । निर्दोप ब्रह्म वसतें विदितात्मयांच्या ॥ २६ ॥

**स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ॥**
**प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ॥२७॥**

बाहेर बाह्यविषयांप्रति हट्टयोगी । सांडोनि दृष्टि जुळिती भ्रुंवमध्यभागीं ॥ गा प्राण आणिक अपान–गती समाना । नारायणीं करुनि नासिकिं वाहतांना ॥२७॥

**यतेंद्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ॥**
**विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः २८**

कीं इंद्रियें मन मती स्थिर सर्व कर्मीं । नेमूनि जो मुनि परायण मोक्षधर्मीं ॥ ज्याच्या मनांत न वसे भय

---

१ नित्यनिर्दोष २ मन जिंकिलेले ३ आत्मतत्व जाणणारांच्या ४ भोंवयांच्यामध्यभागीं ५ बुद्धि.

कोप आस । नारायणप्रणत तोचि विमुक्त खासें[1] ॥२८॥

**भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ॥**
**सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति २९**

भोक्ता असे सकल यज्ञ तपः क्रियांचा । नारायण प्रभु-महेश्वरही जगाचा ॥ आत्माचि जो सुहृद[2] यापरि सर्व भूतीं । जाणोनि त्या मजसि पावतसे सुशांती ॥ २९ ॥

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मसंन्यासयोगो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥**

श्रीमान्षड्गुणवान कृष्ण भगवान् गीता श्रुतीसार हे । योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥ कर्मन्यास[3] पृथासुतासि वदला हा पंचमीं तोंचि तो । या चिंतामणिनंदनानें[4] हरी टीकामिसें बोलतो ॥ ५ ॥

**श्रीमन्नारायणार्पणमस्तु.**

ग्रंथ संग्रहालय. नं. ता. ठाणे

## षष्ठाध्यायप्रारंभः

**श्रीभगवानुवाच.**

**अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ॥**
**स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः १**

---

१ निश्चयेंकरून. २ आप्त. ३ कर्मसन्यांसयोग. ४ चिंतामणिसुताच्यामुखानें.

बोले रमेश[1] न झटेनि फलाश्रयातें । कर्तव्य उक्त करणें करि जो तयातें ॥ संन्यासि तोचि जनिं सात्विक कर्मयोगी । नारायणेष्ट[2] न निराग्नि अकर्मि जोगी ॥ १ ॥

**यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव ॥**
**न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥२॥**

संन्यास जो ह्मणति पंडुसुता सुजाण[3] । सत्कर्म योग जगतांतिल तोचि जाण ॥ कीं काम्य[4]संग त्यजिल्याविण कर्ममार्गीं । नारायणप्रिय न कोणिहि होति योगी ॥२॥

**आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ॥**
**योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥**

आरोहणेच्छु निजयोगि मुनी तयास । नारायणोक्त[6] निजकर्मचि हेतु खास[7] ॥ आरूढ योगिं जरि होय तरी तयातें । ध्यानस्थितीस दृढ कारण बोलिजे तें ॥ ३ ॥

**यदा हि नेंद्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ॥**
**सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥**

नारायणस्मरणहीन कधींहि जेव्हां । कर्मीं हृषीकें विषयीं न झटेल तेव्हां ॥ संकल्प सांडुनि समस्त वसे विमुक्त । आरूढ योगिं मग तो ह्मणणें सयुक्त ॥ ४ ॥

**उद्धरेदात्मनात्मानं नात्मानमवसादयेत् ॥**
**आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥५॥**

---

१ श्रीकृष्ण २ ईश्वरप्रिय ३ जाणते लोक ४ कामिक बुद्धि ५ साधक ६ वेदोक्त ७ निश्चित ८ सिद्ध ९ इंद्रियविषयांचेठायीं.

गा आपुलें मनाचि आपण उद्धरावें । आपापि कीं भव-जळीं न बुडोनि ध्यावें ॥ नारायणोक्त निजचित्ताचि आ-पणातें । बंधूसमान समयीं रिपुतुल्य होतें ॥ ५ ॥

**बंधुरात्मात्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ॥**
**अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्त्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥**

मित्रासमान सुखवी मन तें तयाचें । जें जिंकिलें बु-झुनि रूप निजात्मयाचें ॥ नारायणात्मपद नेणुनि चित्त वर्ते । शत्रुत्व तें करि अनात्म जनासि पुतें ॥ ६ ॥

**जितात्मनः प्रशांतस्य परमात्मा समाहितः ॥**
**शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥७॥**

जे कां सुशांत जितचित्त मुनी तयांचें । नारायणीं सम महास्थिर चित्त साचें ॥ शीतोष्णकालिं सुखदुःख मनोविकारीं । मानापमानिंहि तसेंचि समप्रकारीं ॥ ७ ॥

**ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ॥**
**युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ॥८॥**

ज्ञानें तया अनुभवें जनिं तृप्त आत्मा । नारायणीं स्थिर जितेंद्रिय जो महात्मा ॥ आरूढ तो ह्मणति पंडित युक्त योगी । माती खडे कनकही सम ज्यास भोगीं ८

**सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ॥**
**साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ९ ॥**

---

१ आपले आपण. २ वेदांत वर्णन केल्याप्रमाणें. ३ शत्रूप्रमाणें. ४ अज्ञानजनास. ५ जिंकिलें आहे मन असा. ६ सोनें समजून.

कीं आप्त मित्रहि उदासिन अन्य लोक । मध्यस्थ शत्रु जनबांधवही अनेक ॥ नारायणस्मरणशील तसेच पापी । पाहे समान मतिनें नर तो प्रतापी ॥ ९ ॥

**योगी युंजीत सततमात्मानं रहसि स्थितः ॥**
**एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः १०**

योगारुरुक्षु[1] नर सन्मति गा असे जो । एकांतिं एकटें[2] सुखें मन नित्य योजो ॥ नारायणीं नियमुनी निज चित्त कायां[3] । सांडूनि आस सकलार्थपरिग्रहा[4] या ॥ १० ॥

**शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ॥**
**नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ११**

नारायणप्रणत यापरि व्हावयासी । स्थापूनि सुस्थिर निजासन शुद्ध देशीं ॥ तें फार उंच अति नीच नसोनि घालीं । ऊर्णा[5]तळीं अजिनें[6] दर्भ तयाहि खालीं ॥ ११ ॥

**तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः ॥**
**उपविश्यासनेयुंज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ १२ ॥**

एकाग्र सम्यक तिथें मन तें करोनी । प्राणेंद्रियादि कृति सर्वहि आवरोनी ॥ गा योजिजे बसुनि आसनिं योगघाटी[7] । नारायण स्मरुनियां निजशुद्धि[8]साठीं ॥१२॥

**समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ॥**

---

१ योगारूढ होऊं इच्छिणारा साधक. २एकटा. ३शरीर. ४मायीक अर्थ संग्रहाला. ५लोकर. ६चर्म-कातडें साली इ०. ७योगाची रीति ८ आत्मशुद्धि.

**संप्रेक्ष्य नासिकाऽग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥**

नारायणार्थ शिर[१] मान शरीर तैसें । यत्नें धरूनि सम सुस्थिर ना हलेसें ॥ गा नासिकाग्र बघणें अपुलेंचि एक । ना पाहतां दशदिशादिक दृश्य लोक ॥ १३ ॥

**प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ॥**
**मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥**

शांतस्थितींत मन निर्भय ब्रह्मचर्यें । नारायणात्मक[२] जनांत वसोनि धैर्यें ॥ जो चित्त आकळुनि लावि मम स्वरूपीं । तो युक्त मत्पर असो सुखि आत्मरूपीं १४

**युंजन्नेवं सदात्मानं योगी नियतमानसः ॥**
**शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति १५**

योगासि जो मन असें अपुलें नियोजी । नारायण-स्मरणिं आवरुनी समाजीं ॥ तो मोक्षसाधन अशी परमा सुशांती । मन्निष्ठ ती अनुभवी ममरूपिं अंतीं ॥ १५ ॥

**नात्यश्नतस्तु योगोऽस्ति न चैकांतमनश्नतः ॥**
**न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन १६**

होई न योग जनिं पुष्कळ जेउनीया । तैसा न केवळ उपोषित राहुनीया ॥ नारायणाविण न वा अति झोंप घेतां । कीं जागतांहिं न घडे अभिमन्युताता[३] ॥ १६ ॥

**युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ॥**
**युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा १७**

---

१ डोकें २ नारायणरूपी ३ अर्जुना

आहार[1] आणिक विहाराहि[2] युक्त[3] ज्याचे । कर्मी स्वचेष्टित[4] सदा नियमीं च साचें ॥ नेमस्त जागर सुषुप्ति तया स्वबोधें[6] । नारायणस्मरणिं सौख्यद[7] योग साधे ॥१७॥

**यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ॥**
**निस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा॥१८॥**

जेव्हां स्वरूपिं निज चित्त नियोजिलेलें । काम्यक्रियाविषयिं निस्पृह जाहलेलें ॥ राहेल सिद्ध निजयोगि[8] तदा ह्मणावा । नारायणस्मरणयुक्तचि तो गणावा १८

**यथा दीपो निवातस्थो नेंगते सोपमा स्मृता ॥**
**योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः॥१९॥**

जैसा निवांत सदनीं गति पावुनीया । ना हालतां स्थिर दिवा उपमाहि ती या ॥ चित्ताप्रती विजितमानस[9] योगियाच्या । नारायणाख्यपदिं योजिल योग त्याच्या १९

**यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ॥**
**यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति॥२०॥**

स्वानंदकारक निरुंद्ध[10] सुचित्त जें तें । गा योग सेवन करोनि रमेल जेथें ॥ कीं आत्मतत्त्व मन आपणिं[11] जेथ पाहे । नारायणाख्यपदिं तुष्ट जिथेंचि राहे ॥ २० ॥

**सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ॥**

---

१ खाणेंपिणें २ वागणें ३ योग्य ४ वर्तणक ५ झोप ६ आत्मबोधानें ७ सुखदायक ८ आत्मयोगी ९ चित्त जिंकिलेल्या १० स्वाधीन ठेविलेलें ११.आपलेठायीं. आत्मपदीं.

**वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥२१॥**

अत्यंत सौख्यद महासुख तत्त्व जेथें । जें इंद्रियां पलिकडे मतिनें कळे तें ॥ जाणे, जिथोनि न चळे स्थित जो असा तो । नारायण[1]प्रणत हा निजयोगि होतो २१

**यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ॥**
**यस्मिन् स्थितो न दुःखेन गुरुणाऽपि विचाल्यते२२**

लाहोनि जें सुख दुजा निजलाभ कांहीं । नारायणा-परिस थोर गणीत नाहीं ॥ दुःखें यया सुखिं वसोनि असह्य तापें । हालेचिना तरिहि योगबलप्रतापें ॥२२॥

**तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ॥**
**स निश्चयेन योक्तव्यो योगोऽनिर्विण्णचेतसा२३**

या दुःखसंगतिविहीन अनाश आद्या । ती योगसंज्ञक उपासन नाम विद्या ॥ तो निश्चयें करुनि यत्न मनें स-वेग । नारायणोक्त करणें सुखसाध्य योग ॥ २३ ॥

**संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ॥**
**मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥ २४ ॥**

संकल्पे[2]संभवहि सूक्त [3]असूक्त काम । सांडूनिया स-कल आत्मे[4]विशुद्धिकाम ॥ नारायण स्मरुनि इंद्रियसंघ पाही । दंडूनिया सम मनोंचि समस्त ठायीं ॥ २४ ॥

---

१ नारायणभक्त. २ संकल्पापासून उत्पन्न होणारे ३ बरेवाईट ४ आत्म्याची विशेषेंकरून शुद्धि करणारा.

**शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ।**
**आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् २५**

त्यानंतरें हळुहळूचि विरक्त व्हावें । गा धैर्ययुक्त मतिनें दृढ भक्तिभावें ॥ चिन्मात्र आत्मपदिं योजुनि चित्त तेंही । नारायणारहित चिंतुं नयेच कांहीं ॥२५॥

**यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ॥**
**ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥२६॥**

ज्या ज्या स्थलीं विषय लक्षुनि धांव घेई । अस्थीर चंचलहि जें मन सर्व ठायीं । त्या त्या स्थलींच नियमोनि निजात्मयातें । नारायणीं वश असें करिजे तयातें ॥२६॥

**प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ॥**
**उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥**

जो शांत आणि समचित्तहि तोचि योगी । मोक्षाख्य[1] आत्मपदिं उत्तम सौख्य भोगी ॥ शांत स्थलीं, रजतमोगुण जाउनीया । नारायणैकमय निर्मल[2] होउनीया ॥२७॥

**युंजन्नेवं सदात्मानं योगी विगतकल्मषः ॥**
**सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥ २८ ॥**

योजी असा सतत आपुलियाच ठायीं । योगी स्वचित्त गतपातक जो विदेही ॥ स्पर्शोनि ब्रह्मपद तो सहजीं विसावे । नारायणीं निरत थोर सुखासि पावे ॥२८॥

---

१ मोक्षनामक. २ निष्पाप.

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ॥
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥

कीं सर्वभूतिंहि असे हृदयस्थ आत्मा। भूतें तदाश्रित तयापरि हें महात्मा ॥ गा योगयुक्त बघतो स्थिर राहणारा । नारायणाश्रित सदा सम पहाणारा ॥ २९ ॥

यो मां पश्याति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ॥
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ३०

सर्वत्र जो मजसि पाहतसे असारे । हें विश्व आणि बघतो मजमाजि सारें ॥ त्याचाच मी, कधिं न सोडिं तयास तोही। नारायणप्रिय मला नचि सोडि पाहीं ३०

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ॥
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१॥

जो सर्वभूतहृदयस्थित आत्मयातें । एकत्व साधुनि सदैव भजेल मातें ॥ सर्वापरी जरिहि संसृतिलागिं भोगी। नारायणेष्ट तरि तो मजमाजि योगी ॥ ३१ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ॥
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः॥ ३२॥

जो आपुल्या अनुभवें सम सर्व पाहे । गा सौख्य दुःख अथवा जग अर्जुना हें ॥ नारायणस्मरणशील विशेष धन्य । तो थोर योगिवर कीं मजलागिं मान्य ३२

---

१ माझ्या विश्वरूपांत २ हरिभक्त ३ सर्व भूतांच्या हृदयांत राहणाऱ्या आत्म्याशीं ४ सर्वाप्रकारांनीं ५ संसाराला. ६ ईश्वरप्रिय.

मराठी ग्रंथ संग्रहालय.



### अर्जुन उवाच.

**योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ।**
**एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिराम् ३३**

चौश्लोकिं अर्जुन ह्मणे वदलासि योग । साम्यें स्वयें तुजासि समंत तो प्रयोग ॥ त्याची स्थिती मधुरिपो स्थिर मी न देखें । नारायणा स्वमन कीं चळे हर्ष शोकें ३३

**चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ।**
**तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ३४**

कृष्णा असे मनाचि चंचल सर्वथैव । जें इंद्रियें मथि बळें विषयीं वृथैव ॥ तन्निग्रहा परम दुष्कर मानितों मी । नारायणा पवननिग्रहसा स्वधामीं ॥ ३४ ॥

### श्रीभगवानुवाच

**असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ॥**
**अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ३५**

नारायणें प्रभु वदे जनिं पार्थवीरा । दुःसाध्य सत्य मन चंचल होय धीरा ॥ अभ्यास आचरुंनि साध्य करोनि घेणें । वैराग्य साधुनिहि तें दृढनिश्चयानें ॥३५॥

**असंयतात्मनो योगो दुष्प्राप इति मे मतिः ॥**
**वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ३६**

---

१ श्लोक० २९ पा० ३२ पर्यंत चार श्लोकांनीं २ समत्वानें ३ कृष्णा ४ चंचल ५ रगडी ६ त्याच्या निग्रहाला ७ वायूचानिग्रह जसा ८ आपले घरीं ९ श्रीकृष्ण १० आचरण करून.

आटोपिल्याविण मनाप्रति योगसिद्धी । अप्राप्य माझिहि असीच असे स्वबुद्धी ॥ नारायणीं सुवेशाचित्त तयासि यत्नें । पावावया सुखद शक्य असे प्रयत्नें ३६

## अर्जुन उवाच

**अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ॥ अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥**

जिष्णू ह्मणे असुनि भाविक यत्नहीन । योगांतुनी मन चळे नचि होय लीन ॥ कृष्णा अशास्तव विमोक्ष न पावतां तो । नारायणा कवणिया गतिलागि जातो॥३७

**कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ॥ अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ३८**

कीं काय तो विहित पंथ चुकोनि दोनी । छिन्नाभ्रसाचि वितळेल तयांमधोनी ॥ गा अप्रतिष्ठित विमूढविधातृसंगीं । नारायणा तव महाभुज भक्तिमार्गीं ॥ ३८ ॥

**एतन्मे संशयं कृष्ण च्छेत्तुमर्हस्यशेषतः ॥ त्वदन्यः संशयस्यास्य च्छेत्ता न ह्युपपद्यते ३९**

ऐसा अशेष मम संशय तूंचि कृष्णा । छेदावया असासि योग्य महासहिष्णा ॥ नारायणा तुजविणें मम संशयाचा । छेत्ता दुजा नचि दिसे जगतांत याचा ३९

---

१ चांगल्या प्रकारानें रत आहे चित्त ज्याचें २ अर्जुन ३ प्रवृत्तिनिवृत्तिमार्ग ४ मेघाच्या फुटकळ ढगाप्रमाणें. ५ ब्रह्मसृष्टींत ६ हे महाबाहो ३ समग्र. ७ छेदन करणारा.

श्रीभगवानुवाच.

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ॥
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ४०

नारायणं प्रभु ह्मणे इहलोकिं नाहीं । पार्था तया न परलोकिं विनाश कांहीं ॥ कल्याण कृत्य करणार कधींहि कोणी । बापा न जाइलचि दुर्गतिला चुकोनी ॥ ४० ॥

प्राप्य पुण्यकृतांल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ॥
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोभिजायते ॥४१॥

पावोनि पुण्यभुवना चिरकाल तेथें । स्वर्गीं वसोनि उपभोगुनिया सुखातें ॥ नारायणीयुत शुची सदनीं पहा तो । विभ्रष्टयोगि बहुधा अवतीर्ण होतो ॥ ४१ ॥

अथवा योगिनामेव कुले भवति धीमतां ।
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥४२॥

होतो प्रसिद्ध अथवा कुळिं योगियांच्या । नारायण-प्रिय-महामति-सात्विकांच्या ॥ हा जो असा परम दुर्लभ जन्म लोकीं । पावेचि तो सहज यापरिचा विलोकीं ४२

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ।
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥

तो बुद्धियोग मग सम्यक तेथ लाहे । प्राग्जन्मिं जो विधिवशें परिपक्क नोहे ॥ नारायण स्मरुनि यत्न

---

१ कृष्ण. २ उत्तम लोकाला ३ लक्ष्मीयुक्त ४ योगभ्रष्ट ५ जन्मतो.

पुन्हां करी तो । तेंव्हां स्वसिद्धिकारितां कुरुनंदना तो४ ३.

**पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ॥**
**जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥४४॥**

अभ्यास पूर्विल तयाप्रति ओढितो तो । तेणें असा अवश यद्यपि योजिजे तो ॥ नारायणाश्रित मुमुक्षुहि योगवेत्तो । वागे सुखीं ह्मणुनि शब्दविधीपरौतां ॥४४॥

**प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ॥**
**अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ४५**

यत्न प्रकर्षितपणेंचि करोनि ऐसा । योगी धुऊनि अघ शुद्धहि तो अपैसा ॥ नारायणस्मरण सिद्धि अनेक जन्मीं । साधोनि मुक्तगति पावतसे अजन्मी ॥ ४५ ॥

**तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः॥**
**कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ४६**

लोकीं तपस्वि मनुंजाधिक होय योगी । कीं ज्ञानियांहुनि सुसंमति त्याचिलागी ॥ वा कर्मठांपरिस योगि विशेष तूंही । नारायणप्रियसख्या तरि योगि होई॥४६॥

**योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ॥**
**श्रद्धावान् भजते यो मां स मे युक्ततमो मतः ४७**

---

१ आत्मसिद्धी २ अर्जुना ३ पूर्वींचा ४ मायिकाविषयसंगतीमुळें निवृत्तिमार्गाकडे कधींही वळण्याजोगा नाहीं तथापि ५ जाणणारा ६ वैदिकविधी ७ पलीकडे ८ पराकाष्ठेचा ९ आपोआप. १० मनुष्याहून आधिक.

सर्वत्र योगिजनिं मद्गत निर्मळात्मा । नारायणस्मरण-
शील असा महात्मा ॥ श्रद्धाळु जो मज भजे निजधर्म-
युक्त । लोकांत आणि मज सम्मत तोचि भक्त ॥४७॥

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अभ्यासयोगो नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥**

श्रीमान्षड्गुणवंत कृष्ण भगवद्गीता श्रुतीसार हे ।
योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥
योगाभ्यास विचार षष्ठिं वदला पार्थाप्रती तेंचि तो ।
या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥ ६ ॥

**श्रीमन्नारायणार्पणमस्तु.**

---

# सप्तमाध्यायप्रारंभः ।

## श्रीभगवानुवाच.

**मय्यासक्तमनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ॥**
**असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥१॥**

नारायणें प्रभु वदे दृढ सव्यसाची । आसक्ति मत्स्व-
रुपिं राहुनिया मनाची ॥ योजोनि योगाहि मदाश्रित
सत्य मातें । सर्वांस्वि जाणसि जयापरि ऐक तूं तें ॥१॥

---

१ भक्तिमान २ स्मरण ३ साहव्यांत ४ श्रीकृष्ण ५ अर्जुना.

ज्ञानं ते ऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ॥
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते॥२

सज्ज्ञान मी अनुभवासह तूजलागीं । हें सांगतों अजि अशेष अशा प्रसंगीं ॥ नारायणस्मरणिं जें समजोनि येथें । गा जाणणें पुनरपी न दुजें उरे तें ॥ २ ॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ॥
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥३

नारायणाश्रित[1] सहस्र नरांत कोणी । मोक्षार्थ यत्न विरळा करणार आणी । त्या यत्नसिद्ध जनिं सम्यक षड्गुणातें[2] । जाणें असा क्वचित[3] मानवसिंह मातें ॥३॥

भूमिरापो ऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ॥
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥

भू[4] आप[5] अग्नि[6] चवथा बलशालि वात । आकाश आणि मन बुद्धि असींच सात ॥ नारायणात्मक सचेतन मीपणाही । भिन्ना मम प्रकृति यापरि अष्टधा[8] ही ॥४॥

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे परां ॥
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥५॥

हें कार्यरूप अपरा परि मूळमाया । माझी परा प्रकृति कारण दृग्भ्रमा[9] या ॥ कीं जीवरूपिणि जिणें धरिजे जगातें । नारायणाश्रित असे विजयीं[10] अगा ते ॥५॥

---

१ हरिभक्त २ नारायणाला ३ एखादा ४ पृथ्वी ५ उदक ६ तेज ७ वायु ८ आठ प्रकारचीं ९ दृष्टिभ्रमाला. १० अर्जुना.

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ।
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥६॥

ही भूतयोनि [1]जननी अवघ्या जनांची । चिच्छक्ति जाण हृदयीं जगजीवनाची ॥ नारायण प्रभुच मी ज-[2]नितो जगाचा । सर्वांसि अं[3]तक तसा [4]प्रलयींहि साचा ६

मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ॥
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

लोकीं नसे मजविणें पर अन्य कांहीं । नारायणाश्रित धनंजय तूंचि पाहीं ॥ हे सर्वही मजमधें जन गोंवियेले । सूत्रामधें दृढ जसे मणि ओंवियेले ॥ ७ ॥

रसोऽहमप्सु कौंतेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः ॥
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥

पार्था समस्त उदकीं रसतत्त्व तें मी । आहे प्रभा प्रकट मी अजि सूर्य सोमीं॥ नारायण प्रणव अक्षर सर्व वेदीं । आकाशिं शब्द पुरुषीं पुरुषत्वबुद्धी ॥ ८ ॥

पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ॥
जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥

जो [5]पुण्यगंध पृथिवींतिल सर्व तोही । नारायण प्रभु हुताशनिं तेज पाहीं ॥ जीवित्व अन्न उपजीवन सर्व भूतीं । कीं तापसांत तप निश्चय मद्विभूती ॥९॥

---

१ आई २ बाप ३ मृत्यु ४ अखेरीस ( अंतकाळीं ) ५ उत्तम सुवास.

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ॥
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहं ॥१०॥

गा बीज मी सकल भूतजनांसि नित्य। पार्था सनातन असें अविनाश नित्य ॥ नारायणीं निरत जे मतिमंत त्यांत । बुद्धीच मी प्रखर तेजहि तै[1]जसांत ॥ १० ॥

बलं बलवतां चाहं कामरागविवर्जितम् ॥
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥११॥

नारायणांश बल मी बलवज्जनांत । जे कामकोप वे[2]वहीनचि सज्जनांत ॥ नाहीं विरुद्ध निजधर्मिं तसाच भूतीं । तो भारता विहित कामहि मद्विभूती ॥११॥

ये चैव सात्विका भावा राजसास्तामसाश्च ये ॥
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥१२॥

ऐसेच हे सकल सात्विक भाव सा[3]दी । आणीक जे पृथक राजस तामसादी ॥ नारायणाश्रितचि ते परि जाण नाहीं । मी त्यांत आणि मजमाजिं समस्त तेही १२

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ॥
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥१३॥

यांहीं अशा गुणमय त्रिगुण स्वभावें । संपूर्ण हें जगत मोहुनि सर्व भावें ॥ जाणेचिना सतत अव्यय नित्य मातें । नारायण प्रभु गुणां परता तयातें ॥ १३ ॥

---

१ तेजस्वियांत २ वेगहीन ३ समूल ४ आविनाश.

**दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ॥**
**मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ १४ ॥**

दैवी अशी गुणमयी मम मूळ माया । प्रख्यात जी परम दुस्तर ती शमाया ॥ मातेंचि जे भजति ही तरताति गा ते । नारायणी सहज तारितिही जगातें ॥१४॥

**न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यंते नराधमाः ॥**
**माययाऽपहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥१५॥**

दुष्कर्म जे करिति मूढ मला न लोकीं । गा सेविती जन नराधम ते विलोकीं ॥ नारायणप्रकृतिनें भ्रम पावलेले । ज्यांचे स्वभाव असुरी दृढ जाहलेले ॥ १५ ॥

**चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोर्जुन ॥**
**आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ॥१६॥**

नारायणा भजति मानव चौ प्रकारें । पार्था मला सुकृति ते ह्मणोंचि सारे ॥ दुःखार्त आणिक मुमुक्षुहि वित्तलोभी । ज्ञानी तसा कुलज भारत तूंहि नाभीं १६

**तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ॥**
**प्रियोहि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः॥१७॥**

ज्ञानी तयांत मम भक्त सदैव योगी । अद्वैत एक निजभक्ति विशेष भोगी । कीं ज्ञानियाप्रतिच मी प्रिय

---

१ मायेनें २ राक्षसी (क्रूर) ३ चार ४ पुण्यवान् ५ दुःखानीं गांजलेले ६ आत्मज्ञानाची इच्छा बाळगणारे ७ धनार्थी ८ ज्ञानवान् ९ कुलीन १० भिऊं नको.

फार ऐसा । नारायण प्रभु मला प्रिय तोहि तैसा ॥१७॥

**उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतं॥आ-**
**स्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिं ॥१८**

चारी उदाराचि असे परि तो महात्मा । ज्ञानी जनीं मजासि वाटतसे मदात्मा [१] ॥ नारायणस्मरणयुक्त सदैव राहे । कीं मीचि सद्गति तथा जगतांत आहें ॥१८ ॥

**बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते॥ वासु-**
**देवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ १९ ॥**

जातां जनीं बहुत जन्म असेचि अंतीं । ज्ञानी भजे मजासि पावुनिया सुशांती ॥ कीं वासुदेव अवघें जग या प्रकारें । नारायणाप्रिय सुदुर्लभ तो निका [२] रे ॥ १९ ॥

**कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यंतेऽन्यदेवताः ॥**
**तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया २०**

ज्यांची मति हरियली विविधार्थकामीं । ते त्याप-री भजति अन्य [३] सुरांसि कामी ॥ नारायणोक्त [४] दृढ नेम धरोनि ते ते।गा आपुल्या प्रकृतिला वश जे स्वयें ते२०

**यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयाऽर्चितुमिच्छति॥**
**तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहं ॥२१**

जो जो सुभक्त भजुं इच्छिल रूप जें जें । नारायण स्मरुनि भाव धरोनि माझें ॥ ती तीच भक्ति अचला

---

१ माझा आत्मा २ निश्चयेंकरून ३ देवांना ४ वेदोक्त.

विविध स्वरूपीं । त्या त्या अगा करुनि मी धरितों[1] स्वरूपीं ॥ २१ ॥

**स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ॥ लभते च ततः कामान्मयैव विहितान् हि तान्२२**

तो मीं दिला दृढ तया निजभक्तियोगें । त्याचें करी भजन सांग श्रुतिप्रयोगें ॥ त्यापासुनी मिळवि कामहि उंच नीच । नारायणाशपथ ते मजपासुनीच ॥ २२ ॥

**अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ॥ देवान्देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि२३**

गा नाशवंत उघडें फलही तयांचें । तें होय अल्पमति कर्मठ[2] मानवांचें ॥ देवांसि ज्या यजिति त्यांसचि पावती ते । नारायण स्मरुनिही मम भक्त मातें २३

**अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः ॥ परं भावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥**

अव्यक्त एक परि मानिति रूपवान । नारायणासि मज भिन्नपणें अजाण ॥ नेणोनि सम्यक परात्पर मत्प्रभाव । गा नित्य उत्तम तसा सगुण स्वभाव ॥ २४ ॥

**नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ॥ मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् २५**

माझी प्रभा प्रकट नाहिं समस्तलोकीं । मी योगशक्तिकवचें दृढ झांकलों कीं ॥ नारायणप्रभु अशास्त्र.

---

१ धारणकरितो २ कर्मकरणाऱ्या.

व मूढ लोक। हे नेणती अज मला अविनाश एक २५

**वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ॥**
**भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन२६**

मी जाणतों अजवरी गत जाहलेलीं। रे पार्थ सांप्रत जनीं स्थिर राहिलेलीं ॥ नारायणाश्रित पुढें घेडणार भूतें। कोणीहि नेणति परंतु मज प्रभूतें ॥ २६ ॥

**इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत ॥**
**सर्वभूतानि संमोहं सर्गे यांति परंतप ॥२७॥**

गा द्वेष अप्रिय पथीं उपजे प्रियाशा। भेदभ्रमें करुनि गा भरतावतंसा ॥ भूतें सख्या सकल मोहुनि मोह भूकीं। नारायणारहित पावति सृष्टिकाळीं ॥ २७ ॥

**येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ॥**
**ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥ २८ ॥**

ज्यांचें समस्त [illegible] पाप [illegible] गेलें। जे पुण्यशीळ सुकृतें परिपूत जाले ॥ ते द्वंद्वमोहमलमुक्त सदैव मातें। नारायणा-भजति ना भिउनी यमातें ॥ २८ ॥

**जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतंति ये ॥ ते**
**ब्रह्म तद्विदुः कृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् २९**

नाशावया मरणभी परतन्त्रता ही। जे का मदा-

---

१ यापूर्वी होऊन गेलेली २ होणारी ३ आवडत्याची आशा. ४ भरतकुलश्रेष्ठा ५ प्रारंभा ६ केलेलेपाप ७ पुण्याईने ८ पवित्र ९ मरणाचेभय.

श्रिताचि यत्न करीति पाहीं ॥ ब्रह्मज्ञ ते सकल जाणति गा स्वधर्म । नारायण स्मरुनि सर्व स्वभावकर्म ॥ २९ ॥

**साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ॥**
**प्रयाणकालेपि च मां ते विदुर्युक्तचेतसः॥३०॥**

कीं साधिभूत मजला जन साधिदैव । गा साधियज्ञ जगिं जाणति जे सदैव ॥ देहावसानसमयीं मज तोचि भक्त । नारायण स्मरुनि जाणति योगयुक्त ॥३०॥

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगो नाम सप्तमो ऽध्यायः ॥ ७ ॥**

श्रीमान् पड्गुणवंत कृष्ण भगवान् गीता श्रुतीसार हें । योगाची स्मृति ह्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥ सद्बोधानुभवार्थ सप्तमिं वदे पार्थाप्रती तेचि तो । या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥ ७ ॥

---

# अष्टमाध्यायप्रारंभः

**॥ अर्जुन उवाच ॥**

**किं तद् ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ॥**

---

१ ब्रह्मजाणणारे २ अधिभूतासह ३ अधिदैवासह ४ अधियज्ञसह. ५ मरणकालीं. ६ ज्ञान विज्ञान योग. ७ सातव्यांत.

**अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥१॥**

तें ब्रह्म काय सहजेंची पुसे किरीटी[1] । अध्यात्म केविं अणि कर्म कसी रहाटी ॥ देवात्वदुक्त अधिभूत कुणा म्हणावें । नारायणा वदति कां अधिदैव नांवें ॥ १ ॥

**अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ॥**
**प्रयाणकाले च कथंज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥२॥**

कैसा असे कवण तो अधियज्ञ येथें । या देहिं हें मधुरिपो[2] वद शीघ्र मातें ॥ नारायणा निधन[3]काळिंहि योगियांना । तूं ज्ञेय[4] केविं असती मज तें कळेना ॥२॥

**श्रीभगवानुवाच**

**अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ॥**
**भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥**

नारायणाख्य[5] अचलाक्षर[6] ब्रह्म लोकीं । अध्यात्मही हरि[7] वदे निजभाव[8] शेखीं ॥ भूतस्थितिप्रभवकारक जो विसर्ग । तो कर्मसंज्ञकचि भौतिक सृष्ट वर्ग ॥ ३ ॥

**अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ॥**
**अधियज्ञोहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥**

जो नश्वर क्षरचि तो अधिभूतभाव । गा देहदैवत तसा अधिदैव जीव ॥ विश्वेशमी धनि इथें अधियज्ञ जागा । नारायणाख्य[9] शरिरीं पुरुषर्षभा[10] गा ॥४॥

---

१ अर्जुन २ मधुसूदना ३ मरण ४ समजण्यास योग्य. ५ नारायणनामक ६ अचल अविनाश ७ श्रीकृष्ण ८ स्वभाव ९ नारायण नामक. १० पुरुष श्रेष्ठा (अर्जुना).

अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ॥
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥५॥

देहांतकाळिंहि अशा मजला स्मरोनि । सांडोनि देह निजधैर्य बळें करोनी ॥ जो जाय पावत असे मम भाव तोही । नारायणात्मकचि संशय येथ नाहीं ॥ ५ ॥

यं यं वाऽपि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ॥
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ ६ ॥

नारायणारहित अन्य[1]हि रूप जें जें । अंतीं स्मरोनि वपु[2] जो त्यजि दिव्य तेजें ॥ पावे स्वयें सकळ सम्यक भाव ते ते । कीं अंतरीं सतत चिंतुनिया तयांतें ॥६॥

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध्य च ॥
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥ ७ ॥

तूं सार्वकाळ ह्मणऊनि मलाचि भावें। चित्तीं स्मरोनि रणकंदन[3]ही करावें ॥ कीं अर्पितां मम पदीं मन बुद्धि नित्य । नारायणासि मज पावसि सत्य सत्य ॥ ७ ॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ॥
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिंतयन् ॥८॥

अभ्यास आचरुनि जें स्थिर योगयुक्त । अन्यत्र जाय न तया सुमनें सुयुक्त ॥ नारायणात्मक महापुरुषा पवित्रा । नित्य स्मरोनि जन पावति कुंति[4]पुत्रा ॥ ८ ॥

---

१ दुसरे २ शरीर ३ युद्ध ४ अर्जुना.

कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांस-
मनुस्मरेद्यः ॥ सर्वस्य धातारमचिंत्यरूप-
मादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥ ९ ॥

सर्वज्ञही कवि पुरातन विश्वपाल । सूक्ष्मांत सूक्ष्मतर सम्यक जो स्मरेल ॥ ना चिंतवे गुरु असा सकळांसि धाता । नारायणात्मकचि सूर्य तमापरौता ॥ ९ ॥

प्रयाणकाले मनसाऽचलेन भक्त्या युक्तो
योगबलेन चैव ॥ भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य
सम्यक्स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ १० ॥

प्राणप्रयाणिसमयीं मन आवरोनी । नारायण स्मरणयोगबळें करोनी ॥ प्राणासि सम्यक धरी भिवयांत भावें । तो त्या स्वयंप्रभ परा पुरुषासि पावे ॥ १० ॥

यदक्षरं वेदविदो वदंति विशंति यद्यतयो
वीतरागाः ॥ यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति
तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥ ११ ॥

वेदज्ञ अक्षर जया ह्मणताति संत । वैराग्ययुक्त यतिही शिरती जयांत ॥ कीं ज्या पदास्तव जनीं गुरुभक्त होती । नारायणाख्य पदवी कथितों अगा ती ॥ ११ ॥

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुध्य च ॥
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् १२

१ सर्व जाणणारा २ मालक धनी. ३ मरणकालीं ४ वेदार्थजाणणारे ५ अविनाश ६ भगवद्भक्त ७ संन्यासी. ८ ब्रह्मचारी. ९ नारायण नांवाचें ब्रह्मपद.

द्वारें समस्त वपुचीं बुजवोनि खासीं। नारायणार्थ हृदिं कोंडुनिया मनासी॥ जो आपुले धरुनिही असु मस्तकांत। गा योगधारण करोनि वसे सुखांत॥ १२॥

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन्॥**
**यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम्॥१३**

ओंकार हें प्रणव अक्षर एक तेंची। ब्रह्माख्य चिंतित सदा स्मरतां मलाची॥ जो जाय टाकुनि कलेवर तो सुखावे। नारायणीं विधिसेवें सुगतीस पावे॥ १३॥

**अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः॥**
**तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः१४**

मी नान्य एकचि अशा मतिनें सदाही। नित्य स्मरे मजसि जो हरिभक्त पाहीं॥ कुंतीसुता सुलभ मी बहुधा तयातें। नारायण प्रभु सदा निजँ योगियातें॥१४॥

**मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम्॥**
**नाप्नुवंति महात्मानः संसिद्धिं परमां गताः १५**

नारायणासि मज पावुनि दुःखधाम। गा नाशवंत पुढती परतंत्र जन्म॥ ना पावती जनिं महा जन सिद्ध संत। जे पावले परम सद्गतिला पसंत॥ १५॥

**आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन॥**
**मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते॥१६॥**

---

१ शरीराची, २ प्राण, ३ ब्रह्मनामक, ४ शरीर, ५ ब्रह्मदेवाबरोबर ६ दुसरा नाहीं ७ आत्मयोगियाते ८ दुःखाचे बिऱ्हाड.

भूरादि सत्यभुवनांत समस्त लोक । ते अर्जुना पु·
ढती[1] परतविणार[2] देख ॥ नारायणा मजासि पावुनि गा प-
वित्रा । जन्मा नये पुनरपी कधिं कुंतिपुत्रा[3] ॥ १६ ॥

**सहस्रयुगपर्यंतमहर्यद्ब्रह्मणो विदुः ॥**
**रात्रिं युगसहस्रांतां तेऽहोरात्रविदो जनाः॥१७॥**

जाती सहस्र मितें[4] चार युगें तयांचा । जो जाणती
दिवस एक पितामहाचा[5] ॥ नारायणोक्त[6] तासि शेर नि-
शाहि तेथें । गा ब्रह्मलोकिं जन ते दिनरात्रिविवेक्ते ॥ १७॥

**अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ॥**
**रात्र्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८ ॥**

नारायणं[9]प्रकृतिपासुनि भिन्न होती । मायागुणें[10]
विधि दिनागमिं[11] भूतजाती ॥ जाती निशामुखिं[12] लया-
सहि मुख्य सत्वीं । अव्यक्तसंज्ञक तया परमात्मतत्त्वीं १८

**भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ॥**
**रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥**

गा तोचि भूतगणें[13] हा प्रकृतिस्वभावें· । होऊनि हो-
उनि पुन्हां प्रलयासि पावे ॥ नारायणीं सहज रात्रिं धनं-
जया[14] तो । कल्पादयीं[15] पुनरपी उदयासि येतो ॥ १९ ॥

---

१ पुन्हा २ माघारेफिरविणारे. ३ अर्जुना ४ एकहजारवेळ ५ ब्रह्मदेवाचा ६ वेदातवर्णिलेली ७ रात्र. ८ काल मोजीत बसणारे. ९ ईश्वरमायेपासून वेगळेपणानें प्रकाशित होतात १० मायेच्या त्रिगुण तंतूनें ११ ब्रह्मदेवाज्या दिवसाच्या ( नैमित्तीक कल्पाच्या ) आरंभीं १२रात्र सुरूहोताच१३भूतसमूह१४अर्जुना १५ कल्पारंभीं.

**परस्तस्मात्तु भावोऽन्योऽव्यक्तो व्यक्तात्सनातनः ॥ यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति २०**

अव्यक्त[1] याहुनि दुजा प्रकृतीपरौता[2] । नारायणाख्य[3]चि सनातन भाव पार्था ॥ कीं जो गुणांसह समस्तहि भूतसंघ । होतां विनष्ट न ढळेचि असा अभंग ॥ २० ॥

**अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिं ॥ यं प्राप्य न निवर्त्तंते तद्धाम परमं मम ॥२१॥**

अव्यक्त अक्षर जया ह्मणताति संत । नारायणाख्य[4] परमा गति तो पसंत ॥ पावोनिया परतती[5] न कधीं जयातें । माझें अगा परम धाम धनंजया[6] तें ॥ २१ ॥

**पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ॥ यस्यांतःस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् २२**

पार्था महा पुरुष तो त्रिगुणांपरौता[7] । लाभे अनन्य निज भक्ति बळेंच हाता ॥ नारायण प्रभु जया उदरं[8]स्थ सारें । जेणेंचि हे सकळ व्यापियले पसारे ॥ २२ ॥

**यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ॥ प्रयाता यांति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ २३**

ज्या काळिं नाहिं पुनरागम योगियांसी । आवृत्ति[9] आणि करणेंहि पडे तयांसी ॥ नारायणोक्त[10] निज दैवगतीस जातां । तो भारतासि कथितों तुज काळ आतां २३

---

१ एकरूपीं, २ मायेच्या पलीकडचा, ३।४ नारायणनामक ५ मागे फिरती, ६ अर्जुना, ७ तिन्ही गुणाच्या पलिकडचा, ८ उदरांत ९ पुनरावृत्ति. १० वेदोक्त.

**अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ॥**
**तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः २४**

ज्योतिःस्वरूप हृदयीं जठराग्नि जागा । नारायण[1] प्रभु दिनाधिप[2] बाह्य तैं गा ॥ शुद्धोत्तरायाणींहि[3] जे वि-लयास जाती । वेदज्ञ ते विधिपदीं[4] गति पावताती २४

**धूम्रो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ॥**
**तत्र चांद्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते २५**

धूम्रप्रयुक्त तम आणि निशाँ[5]जनांची । दैवीनिशा[6] असितँ[7] पक्ष विशेष जाची ॥ चंद्रांशुतेजबल पावुनि तेथ योगी । नारायणोक्त जग हें परतोनि भोगी॥२५॥

**शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ॥**
**एकया यात्यनावृत्तिमन्ययाऽवर्तते पुनः ॥२६॥**

गा शुक्लकृष्ण गति शाश्वत याच दोनी । नारायणें नियमिल्या निगमीं वदोनी ॥ विश्वास कीं पहिलि पावुनि जन्म नाहीं । लोकीं पुन्हां दुसरिनें फिरणें सदाही २६

**नैते सृती पार्थ जानन्योगी मुह्यति कश्चन ॥**
**तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥२७॥**

या सार जाणुनि गती त्रिजगद्विभागीं । कोणी कधींहि न चि मोहति आत्मयोगी ॥ हो सार्वकाळ तरि

---

१ श्रीसूर्यनारायण, २ दिवसाचा अधिपती, ३ चंद्र आणि सूर्य यांच्या उत्तरायणांत, ४ ब्रह्मलोकीं. ५ रात्र. ६ दक्षिणायन. ७ कृष्णपक्ष. ८ वेदांनी वर्णिलेले. ९ वेदांतवर्णन करून. १० तिन्ही लोकांच्या हद्दीत.

तूं परमेशभक्त। नारायणप्रियसख्या निजयोग[1] युक्त २७

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्। अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम्॥ २८॥

वेदांत यज्ञ तप यांत तसेंच दानीं। नारायणोक्त फल वर्णित जें बुधांनीं[2]॥ केलें अतिक्रमि समस्तहि तें स्वभावें। जाणोनि योगि अचल स्थल आद्य पावे २८

इति श्रीद्भग० सूप० ब्रह्म० योग० श्रीकृष्णा० अक्षरब्रह्मयोगो नाम अष्टमोऽध्यायः ८

श्रीमान् षड्गुणवंत कृष्ण भगवद्गीता श्रुतीसार हें। योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें॥ वर्णी, अक्षर आत्मयोग अठव्या अध्यायिं पार्थास तो। या चिंतामणिनंदनाऽनैनिं हरी टीकामिसें बोलतो॥८॥

श्रीमन्नारायणार्पणमस्तु

---

# नवमाध्यायप्रारंभः

## श्रीभगवानुवाच

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे॥
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् १

---

१ आत्मयोग युक्त. २ ज्ञाते लोकांनीं. मुखानीं.

नारायण[1] प्रभु वदे निज गुह्य हें तें । मी सांगतों अजि सख्या तुज सज्जनातें ॥ ज्ञान स्वयें अनुभवा- सह शांततेसी । जें जाणुनीच अशुभांतुनि मुक्त होसी १

**राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ॥**
**प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ २ ॥**

गा राजगुह्य जन वर्णिति राजविद्या । लोकीं पवित्र बहु उत्तम हीच आद्या[3] । प्रत्यक्ष ये अनुभवाप्रति धं[4]- र्म्य ऐसी । नारायणोक्त करि नित्य महासुखासी॥ २ ॥

**अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ।**
**अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥**

लोकीं अभक्त नर या निजधर्ममार्गीं । नारायण- प्रियसख्या तरि ते कुमार्गी । मातें न पावुनि वृथा फिरती जनांत । गा जन्ममृत्युकर संसृतिभाजनांत ॥ ३ ॥

**मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना । म-**
**त्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥४॥**

हें व्यापिलें सकल सम्यक्[6] उंच नीच । नारायणें जग अमूर्तिपणें[7]हि मींच । या कारणें मजमधें अवघीं- हि भूतें । त्यांमाजि वस्ति न परंतु मज प्रभूतें ॥ ४ ॥

**न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ।**
**भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥५॥**

---

१ श्रीकृष्ण २ मोकळा ३ सर्वांच्या अगोदरची अनादी. ४ ध- र्मानें युक्त ५ पात्रांत ६ चांगल्याप्रकारानें. ७ निर्गुण एक रूपानें.

भूतेंहि नाहिंतचि गा मम सत्स्वरूपीं । मद्योग ई-
श्वरि असा बघ आत्मरूपीं । भूतासि मीं धरितसें परि
त्यांत नाहीं । नारायणाख्य जनभावन मीच पाहीं ॥५॥

**यथाकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ।**
**तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय॥६॥**

आकाशिं ज्यापरि अमूर्तेंहि नित्यवारा । व्यापोनि-
या सकल थोर दिसे पसारा । नारायणप्रकृतिनें तसिं सर्व
भूतें । मद्रूपिं भासति अशा धरिं निश्चयातें ॥ ६ ॥

**सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ॥**
**कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ७**

भूतें समस्त लय पावति कुंतिपुत्रा । माझ्या परा
प्रकृतिमाजि अगा पवित्रा । कल्पांतिं जीं पुढतिं मी सृ-
जितों तयांना । नारायण प्रभुच कल्प अरंभितांना ॥७॥

**प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ।**
**भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥**

आटोपुनी अपुलिया प्रकृतीस पाहीं । विस्तारितों
पुढतिं मीच पुनः पुन्हां हीं । हा भूतसंघ अवघा सह-
ज स्वभावें । नारायण प्रभु निज प्रकृतिप्रभावें ॥ ८ ॥

**न च मां तानि कर्माणि निबध्नंति धनंजय ।**
**उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥**

यासाठिं तीं मज न बाधति सृष्टिकर्में । गा अर्जु-
ना भयद बंधकर स्वधर्मैं । कीं मीं उदासिन अलिप्त

---

१ प्रत्यक्षन दिसणारा. २ मायेनें ३ उत्पन्न करितों ४ समुदाय.

जसा अकर्मी । नारायण प्रभु तया अवघ्याहि कर्मी ॥९

**मयाऽध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ।**
**हेतुनाऽनेन कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥**

नारायणाश्रितचि मत्प्रकृती अगा ते । उत्पन्न होउनि विते स्थिरजंगमातें ॥ या हेतुसाठिं वदती बुध अर्जुना हें । माझेचि ठायिं जग चित्र विचित्र आहे ॥ १० ॥

**अवजानंति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ॥**
**परं भावमजानंतो मम भूतमहेश्वरम् ॥ ११ ॥**

ना मानितीच मजला जन जे विमूढ । पाहोनिया मनुजरूपिं परंतु गूढ ॥ नेणोनि सम्यक परात्पर भाव साचा । नारायणाख्य मम भूतमहेश्वराचा ॥ ११ ॥

**मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ॥**
**राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः १२**

आशा वृथा मनिं तसींच वृथैव कर्मे । ज्ञानेंहि ज्या कुमतिचीं जनिं काम्य धर्मे ॥ कीं राक्षसी असुरि जी प्रकृती विमूढ । नारायणाविण तदाश्रित जे निरूढ १२

**महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ॥**
**भजंत्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ १३ ॥**

पार्था महा सुजन मानव तेचि मातें । नारायणप्रकृतिसंश्रित जाण येथें ॥ ऐक्यात्मभावमतिनें भजती सदैव । भूतादि अव्यय महा समजोनि देव ॥ १३ ॥

---

१ माया २ ज्ञाते ३ मूर्ख ४ नारायणनामक ५ दैवीप्रकृती ६ सम्यक आश्रय केलेले.

**सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ॥**
**नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते १४**

मत्कीर्तनीं रत असोनिच कीं सदैव । ते निश्चयें करिति भोगुनि यत्न दैव ॥ नारायणा पदिं मला नमुनी-हि भावें । योगी उपासिति सदोदित आत्मभावें ॥१४॥

**ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजंतो मामुपासते ।**
**एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥१५॥**

नारायणोक्त निजबोध मखेंहि कोणी । मातें उपासिति मति स्वरुपीं यजूनी ॥ ऐक्यें तसेचि सुरयाजक भिन्नरूपीं । मी विश्वतोमुख तया बहुधा स्वरूपीं १५

**अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ॥**
**मंत्रोहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ॥ १६ ॥**

नारायण प्रकट मी क्रतु आणि यज्ञ । स्वाहा·स्वधाहि समिधा यजमान सुज्ञ ॥ मी मंत्र मी घृत हुताशन मीच पाहीं ॥ होणार त्यांत हुत सम्यक वस्तु तेंही॥१६

**पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ॥**
**वेद्यं पवित्रमोंकार ऋक्सामयजुरेव च ॥ १७ ॥**

नारायण प्रभुच मी जनिता जगाचा । माता धनी गुरु पितामह तेविं साचा ॥ ओंकार वेद्य पद एक पवित्र-सत्त्व । ऋक्साम आणि यजु या श्रुतिचें सुतत्त्व ॥१७॥

---

१ आत्मज्ञान. २ यज्ञानें. ३ तूप. ४ अग्नि. ५ हविर्द्रव्य. ६ उत्पन्न करणारा बाप. ७ आजा. ८ खरा. ९ वेदाचें.

**गतिर्भर्त्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ॥**
**प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥१८॥**

भूतांसि सद्गति पति प्रभु साक्षि आत्मा । वास्तव्य[1]-धामहि शरण्य सखा महात्मा ॥ नारायण प्रभव वा प्रल[2]-यादि ठाव । मी बीजभूताचि असें अविनाश ठेव ॥१८॥

**तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ॥**
**अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥ १९ ॥**

मी तापतों जगतिं जीवनें[3] वर्षतों मी । कीं ओढितों पुढतिं आणिक सोडितों मी ॥ नारायणांश अमृतत्व तसाचि मृत्यु । गा अर्जुना सत असत्पथ मी अमृत्यू ॥ १९ ॥

**त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयंते । ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोकमश्नंति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ २० ॥**

निर्दोष वैदिक तिन्ही मज सोमपानीं[4] । स्वर्लोक याचिति मखीं बहुधा यजूनी ॥ ते पुण्य साधुनि सुरेंद्रपदादियोग । नारायणोक्त[5] दिवि[6] भोगिति दिव्य भोग ॥२०॥

**ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति । एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभंते ॥ २१ ॥**

ते स्वर्गलोक उपभोगुनि थोर तोही । पुण्यक्षयीं पर-

---

१ राहण्याचें ठिकाण. २ जनन अथवा मरणादि. ३ पाणी. ४ सोमपान करणारे. ५ वेदोक्त. ६ स्वर्गी.

तती नरलोकिं पाहीं ॥ नारायणाविण तिन्ही श्रुतिभक्त धार्मी । जा ये असीच गति पावति कामकामी ॥ २१ ॥

**अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते । तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ २२ ॥**

नान्यत्रें आपण असें समजोनि मातें । चिंतीत जे करिति चित्तिं उपासनातें ॥ ते नित्य योगिजन यास्तव तत्प्रपंच । नारायण प्रकट चालवितोंहि मीच ॥२२॥

**येऽप्यन्यदेवताभक्ता यजंते श्रद्धयान्विताः । ते ऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् २३**

जे कोणि अन्यसुरपूजन भिन्न भावें । गा भक्तिनें करिति मत्प्रकृतिस्वभावें ॥ मातेंचि ते यजिति कुंति-सुता परंतू । नारायणीं अविधिपूर्वक जाण तें तूं ॥२३॥

**अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च । न तु मामभिजानंति तत्त्वेनातश्च्यवंति ते ॥२४॥**

कीं मीच सर्वविध यज्ञपतीहि भोक्ता । नारायण प्रकट आश्रय संतभक्तां ॥ ना जाणती मज अशास्तव तत्त्वतां ते। संसारिं या पतित होउनि खाति गोते ॥२४॥

**यांति देवव्रता देवान् पितॄन्यांति पितृव्रताः । भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनो ऽपि माम् २५**

---

१ वेदत्रयांतील धर्म आचरणारे. २ विषयभोगकाम इच्छिणारे. ३ दुसरे नाहीं. ४ दुसरे. ५ देवपूजन. ६ माझ्या मायेच्या योगानें. ७ पूजिती. ८ पूर्णपणानें.

देवांसि जाण सुरयाजक[1] पावताती । जे तर्पिती[2] पितर ते पितृलोकिं जाती ॥ भूतेज्य[3] भूतगति पावति आणि मातें । नारायणा यजिति[4] मद्गति[5] पावती ते २५

**पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।**
**तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥**

जो पान फूल फल जीवन[6] भक्तिभावें । नारायणासि मज आर्पि निज स्वभावें ॥ प्रेमें अहैतुक[7] मदर्थचि आणिलें तें । मी सेवितों करुण तें मन तृप्त होतें ॥ २६ ॥

**यत्करोपि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।**
**यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥**

कुंतीसुता ह्मणुनि जें करिसीहि खासी । जें होमिसी विहित वा इतरांसि देसी ॥ नारायणार्थ तप जें करिसील कांहीं । निष्काम गा मज समर्पि समस्त तेंही २७

**शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः ।**
**संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि २८**

ऐसा शुभाशुभ फलांतुनि सत्यसंध[8] । गा मुक्त होसिल निवारुनि कर्मबंध ॥ संन्यासयोगयुत शुद्ध करोनि आत्मा । स्वेच्छ स्वतंत्र मज पावसि तूं महात्मा २८

**समो ऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः**
**ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् २९**

---

१ देवयज्ञ करणारे. २ तृप्त करतात. ३ भूतयज्ञ करणारे. ४ पूजिती. भजती. ५ माझी गति. ६ पाणी. ७ हेतुरहित. ८ खरेपणानें वागणारा.

सर्वेश सम्यकहि मी सम सर्व देहीं । भूतात अप्रिय मला प्रिय कोणि नाहीं ॥ नारायणप्रिय परी भजती मला जे । मद्रूपिं ते वसति वर्तन त्यांत माझें ॥२९॥

**अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ।**
**साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ३०**

आचारहीन जरिही असला तथापि । ऐक्यें भजे मजसि तो न ह्मणोनि पापी ॥ नारायणप्रणत संतचि कीं गणावा । वागे विमुक्तचि सुनिश्चय तो ह्मणावा ३०

**क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ।**
**कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ३१**

तो होय शीघ्रतरें धार्मिक आणि पावे । मच्छांति शाश्वत जनीं सहज स्वभावें ॥ नारायणप्रिय सख्या धरिं पैज चित्तीं । मद्भक्तनाश न अशी करितों खरी ती ३१

**मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ।**
**स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम् ३२**

नारायणात्मक मदाश्रयही धरोनी । पार्था जनीं असति ज्या श्वपचादि योनी ॥ पापी स्त्रिया वणिज आणि तसेच शूद्र । तेही महासुगति पावति गा सुभद्र ॥३२॥

**किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ॥**
**अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व मां॥३३॥**

---

१ चांगल्या प्रकारें करून. २ भगवद्भक्त. ३ एकत्वानें. ४ मोकळा. ५ लौकर. ६ अर्जुना. ७ चांडाळादि. ८ कल्याणकारक.

राजर्षि भक्त जन जें द्विज पुण्यवान । यांचें पुन्हां नवल काय मनांत आण ॥ हा लोक पावुनिहि दुःखद नाशवंत । नारायणासि मज तूं भज हो सुसंत ॥३३॥

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥**
**मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ३४**

मद्रूपिं लावुनि मना मम भक्त होई । माझाचि याज्ञिकं[1] नमीं मजलागि पायीं । योजोनिया सहज तूं ममरूपिं येसी । नारायणीं पदिं मदाश्रित वृत्ति ऐसी ॥३४॥

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णा० राजविद्याराजगुह्य-योगो नाम नवमो ऽध्यायः ॥ ९ ॥**

श्रीमान्षड्गुणवंत कृष्ण भगवद्गीता श्रुतीसार[2] हे । योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें । वाखाणी निजराजगुह्य नवमीं ती राजविद्याहि तो । या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥ २ ॥

**श्रीमन्नारायणार्पणमस्तु.**

---

१ यजन करणारा. २ वेदरहस्य.

# दशमाध्यायप्रारंभः

## श्रीभगवानुवाच

**भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः ॥**
**यत्तेहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया १**

बोले रमेश[१] विजया[२] पुनरेव माझें । नारायणोक्त[३] वच ऐक अगाध गा जें ॥ मी आवडीस्तव तुझ्या अनुराग-युक्त । आणी हितार्थ कथितों सुविचार उक्त ॥ १ ॥

**न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ॥**
**अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥२॥**

माझा प्रभाव नचि जाणति देव कांहीं । वा जन्म-कर्म–चरितासि महाऋषी ही ॥ कीं मीचें आदि सकळां सुरदानवांतें । नारायण प्रभु महाऋषि–मानवांतें ॥ २ ॥

**यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ॥**
**असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥**

जो जाणतो जनिं अजन्म अनादि मातें । नारायण प्रभुच लोकमहेश्वरातें ॥ तो सुज्ञ सर्व मनुजांत समस्त पाप । नासोनि होय मलमुक्त अगा अपापँ ॥ ३ ॥

**बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ।**
**सुखं दुःखं भवो भावो भयं चाभयमेव च ४**

---

१ श्रीकृष्ण. २ अर्जुना. ३ वेदोक्त. ४ भाषण. ५ प्रीति. ६ योग्य. ७ आपोआप किंवा निष्पाप.

गा ज्ञान बुद्धि निजमोहविनाश शोध । सत्य क्षमा-
हि मन इंद्रियवृत्तिरोध ॥ दुःखें सुखें जनन मृत्यु प्र-
दक्षिणा ही । नारयणोक्तचि भयाभयलक्षणांहीं ॥४॥

**अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशो ऽयशः ॥**
**भवंति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः॥५॥**

संतोष साम्य[2] तप दान दया सुकीर्ती । नारायणारहि-
त आणि तसी अकीर्ती ॥ हे भूतभावहि पृथग्विध[3] ते
अपैसे । होताति गा मजचिपासुनि भिन्न ऐसे ॥ ५ ॥

**महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ।**
**मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः६**

सृष्टयाद्यकालिं जनिं सात महर्षि थोर । नारायण-
प्रिय तसेचि मनूहि चार ॥ मद्भक्त मानस असे सन-
कादि जाले । कीं यत्प्रजा[4] जगचि हें उदयासि आलें॥६॥

**एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ॥**
**सो ऽविकंपेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥७॥**

ही मद्विभूति असि आणि ममात्मयोग । जो तत्त्व
जाणुनि मनीं समजे अमोघ[5] ॥ तो युक्त होइल अचंचल
भक्तिनेंही । नारायण स्मरुनि संशय येथ नाहीं ॥७॥

**अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ॥**
**इति मत्वा भजंते मां बुधा भावसमन्विताः॥८॥**

उत्पादक प्रभव मी सकळासि आहें । वर्तें समस्त

---

१ वेदोक्त. २ समता. ३ वेगळाले. ४ ज्यांच्या प्रजा. ५ सत्य.

मजपासुनि विश्व गा हें ॥ मानोनि यापरि मला भजती पैसंत । नारायणप्रणत भाविक सुज्ञ संत ॥ ८ ॥

**मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ॥**
**कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥९॥**

मद्रूपिं चित्त असु योजुनि गा स्वभावें । संबोधिती जनिं परस्पर भक्तिभावें ॥ नारायणासि मज वर्णिति-ही सदैव । संतोषती रमति मानुनिया सुदैव ॥ १० ॥

**तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ॥**
**ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥१०॥**

त्यांतें सदोदित अशा निजयोगियुक्तां । मी प्रेमपूर्वक मला भजणार भक्तां ॥ नारायणोक्त शुभ तो निज बुद्धि-योग । देतों जिहीं मजसि पावति ते सवेग ॥ १० ॥

**तेषामेवानुकंपार्थमहमज्ञानजं तमः ॥**
**नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ११**

त्यांच्या कृपेस्तव असा म्हणऊनि साचा । अज्ञान-जन्य तम तो भ्रम मी तयाचा ॥ नारायण प्रशमितों हृ-दयस्थ पाहीं । गा ज्ञानदीप रविसा उजळोनि देहीं ११

## अर्जुन उवाच.

**परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ।**
**पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥१२॥**

नारायणासि मग पार्थ ह्मणे विचित्र । त्या ब्रह्म जें प-

---

१ उत्तम. २ प्राण. ३ आत्मयोगियाला. ४ वेदोक्त. ५ लवक-र. ६ खरा. ७ नाहींसा करतों. ८ सूर्यासारखा.

रम धामहि सत्पवित्र ॥ तें तूं महापुरुष नित्य निजप्रे-
काश । दिव्यादिदेव अविनाश अजन्म ईश ॥ १२ ॥

**आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ।**
**असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे १३**

नारायणा ह्मणति तूज महर्षि ऐसें । गा नारदादि
अवघेहि सुरर्षि तैसे ॥ व्यासादि वा[2] असित देवल हे
मुनीही । मातें स्वयें वदसि आणि तसेंच तूंही ॥ १३ ॥

**सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ।**
**नहि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः १४**

मी मानितों सकल सत्यचि हें रमेशा । जें केशवा
वदसि तूं मजला हमेशा[3] ॥ नारायणा ह्मणि[4] तुझी भग-
वंत मूर्ती । ना जाणती त्रिदश[5] दानवही संपुर्ती[6] ॥१४॥

**स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ॥**
**भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥ १५ ॥**

तूं तो स्वयंप्रभचि आपण आपणासी । सर्वत्र आदि
पुरुषोत्तम जाणतोसी ॥ हे भूतसेव्य[7] जनपालक देव-
देवा । नारायणाखिलजगत्पति वासुदेवा ॥ १५ ॥

**वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ॥**
**याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि१६**

नारायणा असिस योग्य कथावयातें । निःशेष वा नि-

---

१ आत्मप्रकाश. २ अथवा. ३ नेहमीं. ४ खरोखर. ५ देव. ६ पूर्णपणानें. ७ भतानीं सेवन करण्यास योग्य.

जविभूतिहि दिव्य मातें ॥ हे लोक ज्या विविध आत्मविभूतिंनीं तूं । व्यापोनिया वससि विश्वपटांत तंतू॥१६॥

**कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिंतयन् ॥**
**केषु केषु च भावेषु चिंत्योऽसि भगवन्मया १७**

योगेश्वरा अजि कसा समजेन आतां। मी चिंतितां अनुदिनीं तुज दीननाथा ॥ नारायणा कवणरूपिं कशा प्रकारें । आहेस चिंत्य[2] मज तेंहि निवे[3]दिं सारें ॥१७॥

**विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ॥**
**भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम्१८**

विस्तारपूर्वक मला निजयोग आंगें । आणी सख्या सगुण दृश्य विभूति सांगें ॥ वि[4]र्श्वार्दना पुढतिं कीं मम तृप्ति नाहीं । नारायणामृत सुखें बहु ऐकतांही ॥१८॥

## श्रीभगवानुवाच.

**हंत ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ॥**
**प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यंतो विस्तरस्य मे१९**

नारायणें प्रभु वदे मग अर्जुनातें । मी आपुल्या कथिन दिव्यविभूति तूतें । गा मुख्य मुख्य बहुधा कुरुवंशदीपा । नाहींच अंत ह्मणऊनि मम स्वरूपा ॥ १९ ॥

**अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ।**
**अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च॥२०॥**

१ नानाप्रकारच्या. २ चिंतन करण्या योग्य. ३ सांग. ४ जनार्दना. ५ श्रीकृष्ण.

नारायण प्रभुच मी प्रमुखात्मभूत । निद्रेश्वरा सकल-भूतहृदाशयांत ॥ मी आदिमध्य आणि अंत हि त्या ज-डाचा । जैसा घटाप्रति सदाश्रय मृत्तिकेचा ॥ २० ॥

**आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ॥**
**मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥२१॥**

पुत्रांमधें अदितिच्या मम विष्णु रूप । ज्योतींतही परम दिव्य रविस्वरूप ॥ मातें मरीचि ह्मणती मरुतांत भद्रे । नारायण प्रकट मी भगणांत चंद्र ॥ २१ ॥

**वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ॥**
**इंद्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना २२**

सर्व श्रुतींत मनमोहन सामवेद । देवांत इंद्र बत्र चित्तिं करोनि शोध ॥ मी इंद्रियांत मन आणि समस्त भूतीं । नारायण प्रभुच चेतन आत्मवृत्ति ॥ २२ ॥

**रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ॥**
**वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् २३**

रुद्रांमधें सदय शंकर रूप माझें । गा यक्ष राक्षस ज-नांत कुबेर साजें ॥ मी पावकाभिधें वसूंत महानगांत । नारायणासदृश मेरु असें जगांत ॥ २३ ॥

**पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ॥**
**सेनानीनामहं स्कंदः सरसामस्मि सागरः २४**

---

१ अर्जुना. २ कल्याणकारक. ३ नक्षत्रांत. ४ वेदांत. ५ पावक नांवाचा. ६ मोठ्या पर्वतांत.

पार्थी पुरोहित जगांतिल जे उपाध्ये । मी वाक्पति[1] प्रमुख जाण तयांहि मध्यें ॥ सेनापतींत मम रूपचि तारकारी[2] । नारायणासम सरांत समुद्र भारी ॥ २४ ॥

**महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ॥**
**यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः २५**

ब्रह्मर्षिमाजि भृगु तो मम रूप पाहीं । वाणींत मुख्य प्रणवाक्षर[3] एक तेंही ॥ नारायण क्रतुपथीं[4] जपयज्ञ उक्त । गा स्थावरीं हिमगिरी[5] म्हणणें सुयुक्त ॥ २५ ॥

**अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ॥**
**गंधर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः २६**

साऱ्या तरूंत बघ पिंपळ रूप माझें । देवर्षिमाजिं मुनि नारद भक्त साजें ॥ गंधर्वि चित्ररथ सिद्धजनांत पाहीं । नारायणांश कपिलाख्य[6] महामुनीही ॥ २६ ॥

**उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ॥**
**ऐरावतं गजेंद्राणां नराणां च नराधिपम् ॥२७॥**

उच्चैःश्रवा रविरथाश्व तुरंगमांत[7] । मद्रूप जो अमृतमंथनिं संप्रभूत ॥ ऐरावताभिधहि जाण गजांत माझा । नारायणांश नरलोकिं नृपाल राजा ॥ २७ ॥

**आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ॥**
**प्रजनश्चास्मि कंदर्पः सर्पाणामस्मि वासुकिः २८**

---

१ बृहस्पति. २ कार्तिकस्वामी. ३ ॐकार. ४ यज्ञमार्गी. ५ हिमाचल. ६ कपिल नामक. ७ घोड्यांत.

मी आयुधांत पवि[1] आणिक कामधेनू । गायींमधें, कि- तिक हें गुज तूज वानूं ॥ संतानहेतु निजयोषिति[2] काम कामीं । नारायणांश, उरगांतिल[3] वासुकी मी ॥२८॥

**अनंतश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ॥**
**पितॄणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम्॥२९॥**

नागांमधें मम विभूति अनंत शेष । यादोगणीं जलपती वरुणाख्य ईश ॥ मी अर्यमा पितृगणाधिपही जनांत । नारायणांश यम निग्रहकारकांत ॥ २९ ॥

**प्रल्हादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ॥**
**मृगाणां च मृगेंद्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम्॥३०॥**

प्रल्हादरूप दितिजांतिल[4] मीच आहें । मी चालकांतिलहि मालक काल पाहे । कीं सिंह मी वनपशूंतिल मुख्य जात ॥ नारायणांश विनतासुत[5] पक्षियांत३०

**पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ॥**
**झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जान्हवी ३१**

जे धांवती पळति त्यांत समीर[6] नाम । माझी विभूति आणि शस्त्रधरांत राम ॥ मत्स्यादिकीं मगर मी जलवासियांत । नारायणांघ्रि[7]दुहिता अवध्या नद्यांत[8] ॥३१ ॥

**सर्गाणामादिरंतश्च मध्यं चैवाहमर्जुन ॥**
**अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम्३२**

---

१ वज्र २ स्वस्त्रियेचेठायीं ३ सर्पांतिल ४ दैत्यांतील. ५ गरुड ६ वायु ७ अग्रभाग ८ गंगा.

कीं आदि अंतचि चराचर सृष्टिचा मी।मध्य स्थिती-
हि विजया जगभास नामी ॥ विद्यांत विश्वपद्बोधक
आत्मभाव । नारायणांश वदत्यांत विवाद नांव ॥३२॥

**अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च॥**
**अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुखः ३३**

मी अक्षरांतरिं अकार दिसें जनांसी । गा द्वंद्वनामक
समास तसा समासीं ॥ नारायण प्रभु सनातन मीच
काल । मी सर्वधारक समस्तहि हालचाल ॥ ३३ ॥

**मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् । कीर्तिः**
**श्रीर्वाक् च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ३४**

मृत्यूच मी सकलनाशक मूळ आहें । होणार जें
जगत जन्म तयांत पाहें ॥ श्री वाणि योषित्–जनींहि
सुकीर्ति कांती । नारायणस्मृति मती धृति शुद्ध शांती ३४

**बृहत्साम तथा साम्नां गायत्री छंदसामहम् ॥**
**मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः॥३५॥**

तैसी बृहत् मम विभूतिहि सामवेदीं । गायत्रि मुख्य
ह्मणती मजलागिं छंदीं ॥ कीं मार्गशीर्ष महिना महि-
न्यांत मीच । नारायणांश ऋतुमाजिं वसंत साच ॥३५॥

**द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम्॥ जयो**
**ऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥३६**

कीं द्यूतनाम कपटांत तसेंच माझें । गा तेज तैजस

---

१ अर्जुना. २ लक्ष्मी ३ सरस्वति ४ स्त्रीजनात ५ स्मरणशक्ति
६ बुद्धि ७ धैर्यवृत्ति ८ बृहत्साम ९ निश्चयेंकरून

जनांत महाविराजे ॥ नारायणोक्त जय निश्चय मीच दोनी । वेव्हारिं सात्विक जनांतिल सत्त्व आणी ॥३६॥

**वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पांडवानां धनंजयः ॥**
**मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ३७**

वृष्णीकुळीं[1] प्रकट मी वसुदेवपुत्र । गा पांडवांतिल धनंजय तूं पवित्र ॥ मद्रूप, तो मुनिजनीं शुकतात[2] संत । नारायणांश कवि शुक्रहि मी कवींत ॥ ३७ ॥

**दंडो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ॥**
**मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ३८**

मी दंड दंड करणार महाजनांत । गा नीति मी स्वहित जिंकिति जे तयांत ॥ गुह्यांत मौन मम रूप अगा विलोकीं । नारायणांश निजबोध[3] सुजाणलोकीं ॥ ३८ ॥

**यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ।**
**नतदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ३९**

जें कांहिं मत्प्रियसख्या अवघ्या जगाचें । गा बीज तें समज शाश्वत मीच साचें ॥ नारायण प्रभु तया मजवीण कांहीं । हें भूत[4] भव्यहि[5] चराचर होत नाहीं ३९

**नांतोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ॥**
**एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ४०**

दिव्या अशा मम विभूतिस अंत नाहीं । नारायणप्रिय परंतप जाण तूंही ॥ संक्षिप्तचि स्मरुनि हा तुजलागिं सख्य । विस्तार मीं कथियला अजि मुख्य मुख्य ४०

---

१ यादवकुलांत २ व्यास. ३ आत्मज्ञान ४ जालेलें ५ होणारें.

**यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ॥**
**तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्॥ ४१ ॥**

जें जें अशास्तव सुसात्त्विक भाग्यवंत । श्रीमंत ऊर्जितहि वा बघसी महंत॥ नारायणात्मकचि तूं समजोनि तें तें । गा अंशसंभव असें, भज आणि मातें ॥ ४१ ॥

**अथ वा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ।**
**विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत्४२**

सांगोनि काय अथवा बहुता परीनें । तूं अर्जुना कितिक जाणसि तत्त्व येणें ॥ व्यापोनि सुस्थिर समस्तहि मीच गा हें । नारायणाख्य[1] जग एक चिदंश आहें

**इति श्रीमद्भ० सूपनि० ब्रह्म० योग० श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतियोगो नाम दशमोऽध्यायः**

श्रीमान्षड्गुणवंत कृष्ण भगवद्गीता श्रुतीसार हें ।
योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥
वर्णी दिव्य विभूतियोग दशमीं पार्थाप्रती तेंचि तो ॥
या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥१०॥

**श्रीमन्नारायणार्पणमस्तु.**

---

1 नारायणनामक.

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ... ठाणे.

# एकादशाध्यायप्रारंभः

**अर्जुन उवाच.**

**मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ॥**
**यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥१॥**

जिष्णू[1] ह्मणे मम कृपेस्तव गुह्य मातें। अध्यात्म—नामक तुवां उपदेशिलें तें ॥ त्वद्वाक्य जें परम ऐकुनि त्याच बोला। नारायणा सकल मन्मन-मोह गेला ॥१॥

**भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ॥**
**त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम्॥२॥**

गा भूत—संसृति[2]—लयोद्भव[3] सृष्टिकर्म। म्यां ऐकिलें अजि सविस्तर ही सधर्म ॥ नारायणा तुजकडोनि महा पवित्रा। माहात्म्य दिव्यहि सुपंकजपत्रनेत्रा ॥ २ ॥

**एवमेतद्यथात्थत्वमात्मानं परमेश्वरम् ॥**
**द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ३ ॥**

ऐसेंचि जें वदसि आत्म—यथास्थिततत्व। नारायणा परम हें परमेशतत्त्व ॥ मी इच्छि एक तव ईश्वररूप पाहों। ऐश्वर्ययुक्तहि तसा पुरुषोत्तमा हो ॥ ३ ॥

**मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ॥**
**योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥४॥**

नारायणा जरिहि मानिसि तूं अपैसें। पाहावया म-

---

१ अर्जुन. २ संसार. ३ मरणें, जन्मणें.

जसि शक्य असेल ऐसें ॥ योगेश्वरा तरि मला तव वि-
श्वरूप । एकत्र दावि निज अव्यय आत्मरूप ॥ ४ ॥

**श्रीभगवानुवाच**

**पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ॥**
**नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च५**

गा शेंकडों हरि ह्मणे सुसहस्रशा हीं। माझीं अनेक-
विध आणिक दिव्य पाहीं ॥ [1]नारायणीकृत विचित्र अ-
नेक रंगीं । रूपें अचिंत्य पृथगाकृति विश्वसंगीं ॥५॥

**पश्यादित्यान्वसून् रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ॥**
**बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ६ ॥**

[2]आदित्य पाहिं [3]वसु [4]रुद्राहि [5]आश्विनेय । नारायण-
स्वरुपिं या मरुदादि [6]कार्यं ॥ पूर्वीं न पाहिलिं असीं न-
वलें अनंत । गा भारता बघ सुखें असती सुसंत ॥६॥

**इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरं ॥**
**मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥७॥**

एकस्थलीं सकलही जग येथ पाहें । नारायणात्मक
चराचर आजि गा हें ॥ निद्रेश्वरा[7] विविधही मम विश्व-
देहीं । जें पाहण्यासि मनिं इच्छिसि अन्य कांहीं ॥७॥

**न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ॥**
**दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ८**

---

१ मायाकृत. २ द्वादशादित्य. ३ अष्टवसु. ४ एकादश रुद्र. ५ अश्विनीकुमार ६ शरीरें. ७ अर्जुना.

पाहों परी न शकसी मजला अशा या । दृश्य स्वचर्मनयनें जगदप्रमेया ॥ नारायणात्मक अशास्तव दिव्य दृष्टी । देतों तुला बघ मदीश्वर योगसृष्टी ॥८॥

**संजय उवाच**

**एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः ॥**
**दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरं ॥ ९ ॥**

रायासि[1] संजय ह्मणे इतुकें वदोनी । नारायण[2] प्रभु नृपा कटकांत[3] दोनी ॥ योगेश तो हरि महा परमस्वरूप । ऐश्वर्य दावि विजयाप्रति[4] विश्वरूप ॥ ९ ॥

**अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ॥**
**अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम्॥१०॥**

वक्त्रें अनेक नयनादि अनेक अंगें । या दर्शनेंहि परमाद्भुत विश्वसंगें ॥ नानापरी अभरणें विविधायुधेंहि[5] । नारायणें धरिलिं दिव्यचि पार्थ पाही ॥ १० ॥

**दिव्यमाल्यांबरधरं दिव्यगंधानुलेपनम् ॥**
**सर्वाश्चर्यमयं देवमनंतं विश्वतोमुखम् ॥ ११ ॥**

पुष्पें सतेज बहुधा वसनेंहि[6] दिव्य । गंधें अनेकविध मस्तकिं आणि भव्य ॥ आश्चर्यकारकचि देव अनंतरूपी । नारायण प्रभु असा त्रिजगत्स्वरूपी ॥११॥

**दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ॥**
**यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः१२**

१ धृतराष्ट्रासि, २ श्रीकृष्ण. ३ सैन्यांत. ४ अर्जुनास. ५ नाना प्रकारचीं हत्यारें. ६ वस्त्रें.

व्योमीं[1] सहस्त्र रविचें उदयास येतें। एकत्र तेज जरिही तरि तें न येथें ॥ नारायण प्रभु महेश्वर जो तयाच्या। तेजासि या करिल साम्य[2] महात्मयाच्या १२

**तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ॥**
**अपश्यद्देवदेवस्य शरीरे पांडवस्तदा ॥ १३ ॥**

एक्याच ठायिं जग सर्व तिथें विभक्त। दावी पृथं[3]-ग्विध तदा सितवाहभक्त[4] ॥ नारायणप्रभुचिया वपु[5]-माजि पाहे। आश्चर्य पांडव[6] नृपा[7] हरिची कृपा हे १३

**ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ॥**
**प्रणम्य शिरसा देवं कृतांजलिरभाषत ॥१४॥**

व्याकूळ होउनि तदा मनिं विस्मयानें। रोमांचयुक्त-हि धनंजय[8] आर्द्रतेनें[9] ॥ नारायणाचरणिं वाहुनि मस्तकातें। जोडोनि अंजलि वदे वदनें स्तुतीतें ॥ १४ ॥

## अर्जुन उवाच.

**पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ॥ ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥ १५ ॥**

जिष्णू[10] ह्मणे बघतसें तव देहिं देवा। मी भूतसंघ[11] सचराचरें[12] वासुदेवा ॥ पद्मासनास्थित विधी[13] हरि[14] आणि

---

१ आकाशांत. २ बरोबरी-समता ३ वेगळाले. ४।८।१० अर्जुन ५ शरीरांत ६ पंडुपुत्र ७ धृतराष्ट्रराया ९ प्रेमळपणानें ११ भूतांचे समुदाय १२ स्थावर जंगम सृष्टीसहित १३ ब्रह्मदेव १४ विष्णु.

शंर्व । नारायणा उरंग दिव्य ऋषीहि सर्व ॥ १५ ॥

**अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनं-**
**तरूपम् । नांतं न मध्यं न पुनस्तवादिं प-**
**श्यामि विश्वेश्वर विश्वरूपम् ॥ १६ ॥**

बाहू अनेकहि तशीं मुख–नेत्र–पोटें । मी पाहतों तव अनंतचि रूप मोठें ॥ सर्वांत, अंत न न मध्य न आदि तें हें । नारायणा प्रकट मी तुज विश्व पाहें १६

**किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो**
**दीप्तिमंतं । पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समंताद्दी-**
**प्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥ १७ ॥**

गा मस्तकीं मुकुट चक्र गदा करांत । मोठें सतेज सकळांहुनि दीप्तिमंत ॥ नारायणा न बघवे अनळार्कते-जें । त्वद्रूप सर्व बघतों अनुपम्य तें जें ॥ १७ ॥

**त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य**
**परं निधानं । त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता**
**सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥ १८ ॥**

नारायणा परम अक्षर जाणणें तें । तूं तूंच थोर असती निधि या जगातें ॥ तूं अव्यय प्रथित शाश्वत धर्मपाळ । माझे मतें पुरुष तूंचि अनादि काळ ॥ १८॥

---

१ शंकर २ सर्प ३ तेजस्वी ४अग्नि आणि सूर्य यांच्या तेजानें५ तुझें रूप ६ दुसरी उपमा नाहीं असें ७ अचल-अविनाश ८ भांडार खजीना-मुख्यस्थान ९ प्रख्यात १० ज्याचा जन्म कोणास ठाऊक नाहीं असा अजन्म.

**अनादिमध्यांतमनंतवीर्यमनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् ॥ पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपंतम् ॥ १९ ॥**

आद्यंत मध्य न असेचि अनंतवीर्य । बाहू बहू दिसति नेत्रिं शशांकसूर्य ॥ नारायणा तव मुखीं ज्वलिताग्नि पाहें । तेजें प्रकाशित तुझ्या जग जाहलें हें ॥१९॥

**द्यावापृथिव्योरिदमंतरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः । दृष्ट्वाद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥ २० ॥**

आकाश भूंमधिल अंतर थोर हेंही । एका तुवांचि भरिल्या विदिशा दिशाही ॥ पाहोनि अद्भुत असें तव रूप उग्र। नारायणा त्रिजगिं लोक भिती समग्र२०

**अमी हि त्वां सुरसंघा विशंति केचिद्भीताः प्रांजलयो गृणंति । स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघाः स्तुवंति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः २१**

रूपीं प्रवेशति तुझ्या सुरवृंद हेही । धाकें कृतांजलि तुला नमिताति कांहीं ॥ स्वस्त्यस्तु बोलुनि महा ऋषि सिद्ध सारे । नारायणा स्तविति तूज बहुप्रकारें२१

**रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च । गंधर्वयक्षाः सुरसिद्धसंघा वीक्षंते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥ २२ ॥**

---

१ चंद्र २ पेटलेला अग्नि ३ त्रैलोक्यांत ४ देव समुदाय

रुद्रार्क साध्य वसु आणिक विश्वदेव । जे अश्विनी-
कुमरही मरुदादि सर्व ॥ गंधर्व सिद्ध सुर ऊष्मप यक्ष-
जाती । नारायणा बघुनि विस्मित तूज होती ॥ २२ ॥

**रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम्।
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा लोकाः प्रव्यथि-
तास्तथाऽहम् ॥ २३ ॥**

त्वद्रूप थोर बहु नेत्र भुजांघ्रि[1] तोंडें । मांड्या. महा-
भुज जया उदरें उदंडें[2] ॥ नारायणा बहु तशाचि कराळ
दाढा । भीती बघोनि जन मीहि उडे धडाडा ॥ २३ ॥

**नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं
दीप्तविशालनेत्रम् । दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितां-
तरात्मा धृतिं न विंदामि शमं च विष्णो २४**

अत्युच्च[3] तैजस[4] जयास अनेक वर्ण । वक्त्रें[5]·विकासितँ[6],
विशाळचि नेत्र कर्ण ॥ नारायणा तुज बघोनि मदंत-
रात्मा । नेणे धृती[7] सुखहि सात्त्विक शांतिधामा ॥ २४ ॥

**दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैवकालानलसं-
निभानि । दिशो न जाने न लभे च शर्म प्रसी-
द देवेश जगन्निवास ॥ २५ ॥**

दंष्ट्रां[8] भयानक तुझीं वदनेंहि तैसीं । कालाग्निसन्नि-
भ विलोकुनि घोर ऐसीं ॥ नारायणा मज दिशा न गमे

---

१ हातपाय. २ अनेक. पुष्कळ. ३ फार उंच. ४ तेजस्वी.
५ तोंडें. ६ पसरलेलीं. ७ धैर्य. ८ दाढा

सुखाशा । हो सुप्रसन्न सुरनाथ जगन्निवासा ॥ २५ ॥

**अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहै-**
**वावनिपालसंघैः ॥ भीष्मो द्रोणः सूतपुत्र-**
**स्तथाऽसौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥२६॥**

हे सर्वही तुजमधें धृतराष्ट्रपुत्र । तत्साह्यकारि अवघे नृपसंघ चित्र ॥ नारायणा गुरु पितामह कर्ण सारे । आह्माकडीलहि तसे रणिं झुंजणारे ॥ २६ ॥

**वक्त्राणि ते त्वरमाणा विशंति दंष्ट्राकरालानि**
**भयानकानि ॥ केचिद्विलग्ना दशनांतरेषु सं-**
**दृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः ॥ २७ ॥**

दाढा भयानक जयां विकराळ दांतीं । तोंडें तुझीं बहु तयांत सवेग जाती ॥ नारायणा अडकले दिसती कितीक । होऊनि मस्तकिं रेंदीं शत चूर्ण देख ॥२७॥

**यथा नदीनां बहवोऽबुवेगाः समुद्रमेवाभि-**
**मुखा द्रवंति ॥ तथा तवामी नरलोकवीरा**
**विशंति वक्त्राण्यभिविज्वलंति ॥ २८ ॥**

वेगें करोनि उदकौघ जसे नद्यांचे । ते सागराभिमुख येति समग्र साचे ॥ त्वद्रूपिं हें सकल मानव वीर तैसे । नारायणा शिरति दीप्तमुखीं अपैसे ॥ २८ ॥

**यथा प्रदीप्तं ज्वलनं पतंगा विशंति नाशाय**

---

१ कौरव २ राजसमुदाय ३ द्रोणाचार्य ४ भीष्म ५ दातांनीं. ६ पाण्याचे ओघ ७ समुद्राकडेच ८ सारे ९ आपोआप

**समृद्धवेगाः ॥ तथैव नाशाय विशंति लो-**
**कास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥ २९ ॥**

किंवा जसे ज्वलित अग्निमधें पतंग । येती स्वयेंचि मरण्यासि करोनि वेग ॥ नाशार्थ लोकहि तसे शिरताति अंगें । नारायणा तव मुखांतचि पूर्ण वेगें ॥ २९ ॥

**लेलिह्यसे ग्रसमानः समंताल्लोकान्समग्रान्व-**
**दनैर्ज्वलद्भिः । तेजोभिरापूर्य जगत्समग्रं**
**भासस्तवोग्राः प्रतपंति विष्णो ॥ ३० ॥**

घेसी गिळोनि उदरीं ग्रसमान जेव्हां । सर्व प्रदीप्त मुखिं लोक समग्र तेव्हां ॥ तेजें तया भरुनिया जग हें समग्र । नारायणा तपतसे तव रूप उग्र ॥ ३० ॥

**आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोस्तु ते**
**देववर प्रसीद ॥ विज्ञातुमिच्छामि भवंत-**
**माद्यं न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥ ३१ ॥**

तूं सांग कोण अससी मज उग्र–देही । हो सुप्रसन्न नमितों अजि तूज पायीं ॥ नारायणा समजुं इच्छि तव प्रवृत्ती । नेणें तुझी ह्मणुनि देववराद्य मूर्ती ॥ ३१ ॥

## श्रीभगवानुवाच.

**कालोऽस्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धो लोकान्स-**
**माहर्तुमिह प्रवृत्तः ॥ ऋतेऽपि त्वां न भवि-**
**ष्यंति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ३२**

---

१ पेटलेल्या २ घास.

मी लोकनाशक पुरातन काळ आहें। नारायण प्रभु ह्मणे हरूं पाहताहें ॥ लोकांसि येथ, तुजवांचुनियाहि सारे । होतील नष्ट अरि जे रणिं झुंजणारे ॥ ३२ ॥

**तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धम् ॥ मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ ३३ ॥**

यासाठिं तूं सहज घे यश ऊठ वेगीं। जिंकोनि शत्रु[1]गण राज्य समृद्ध भोगीं ॥ नारायणें प्रथम मीच निवृत्ति[2] यांची । केली निमित्त परि हो अजि सव्यसाची[3] ॥३३॥

**द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथाऽन्यानपि योधवीरान् ॥ मया हतांस्त्वं जहि माव्यथिष्ठा युद्ध्यस्व जेतासि रणे सपत्नान् ॥३४॥**

हे द्रोण भीष्महि जयद्रथ कर्ण तैसे । ते अन्यही[4] रणधुरंधर मीं अपैसे ॥ नारायणें वधियले वधिं तूं न भीतां। भांडें अगा अससि आजि सपत्नजेता[5] ॥ ३४ ॥

## संजय उवाच

**एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृतांजलिर्वेपमानः किरीटी ॥ नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥ ३५ ॥**

रायासि संजय वदे वच[6] केशवाचें । ऐकोनि कंपित

---

१ शत्रु २ शांति ३ अर्जुना ४ दुसरेही. ५ हिसेदार प्रतिपक्ष जिंकणारा ६ भाषण

पृथासुत या परीचें ॥ वंदोनि मागुतिं कृतांजलि भीत भीत । नारायणासि नमि बोलुनि सद्गदीत ॥ ३९ ॥

## अर्जुन उवाच

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ॥ रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः ॥ ३६ ॥

बोले पृथातनय गोपेति तूज ठायीं । गा प्रीतियुक्त जग हर्षित त्वद्येशांहीं ॥ जाती दिशाप्रति निशाचर ते भिऊनी । नारायणा नमिति सिद्धसमूह आणी ॥३६॥

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोप्यादिकर्त्रे ॥ अनंत देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ३७ ॥

गा कोण तूज न नमील महात्मयासी । श्रेष्ठासि जो जनपितामहं तत्पित्यासी ॥ नारायणा त्रिदशनाथ अनंतसत्त्व । तो तूं जनीं सदसतां पर आत्मतत्त्व ॥३७॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ॥ वेत्तासि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनंतरूप ॥ ३८ ॥

तूं आदिदेवाचि पुरातन आत्मतंतू । विश्वासि या परम आश्रयधाम तें तूं ॥ तूं जाणता असासि वेद्यहि चित्प्रकाश । नारायणा भरुनि विश्व अनंतवेष ॥३८॥

---

१ अर्जुन २ इंद्रियेश्वरा ३ तुझ्या कीर्तिनें ४ राक्षस ५ ब्रह्मदेव

**वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ॥ नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोपि नमो नमस्ते ॥ ३९ ॥**

नारायणा शमन वन्हि शशांक वार्त । तूंच प्रजेशपणजा प्रभु विश्वतात ॥ प्रेमें असो नमन तूज सहस्त्र वेळ । वंदूं पुन्हां पुढतिंही नमुं सर्वकाळ ॥ ३९ ॥

**नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ॥ अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ ४० ॥**

मागेंपुढेंहि करुं वंदन तूज पायीं । तूं सर्व यास्तव तया नमुं सर्व ठायीं ॥ नारायणा बलि अनंत पराक्रमी तूं । व्यापोनि सर्व असती तरि विश्वतंतू ॥ ४० ॥

**सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति । अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वाऽपि ॥ ४१ ॥**

मानोनि मित्र वदलों सलगी करोनी । रे यादवा तुजसि कृष्ण सख्या ह्मणोनि । नारायणा न कळतां महिमा तुझा हा । मी जें प्रमादिं अथवा प्रणयें अहाहा ॥ ४१ ॥

**यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ॥ एकोथ वाऽप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ४२ ॥**

---

१ यम २ अग्नि ३ चंद्र ४ वायु ५ प्रजापति ६ उद्धटपणांत ७ प्रेमानें.

नारायणा इतर जे अपमान कांहीं । हास्यार्थ मार्गि शयनासनिं भोजनींही ॥ केले जनीं विजनिं अच्युत अ-प्रमेया । ते तूं क्षमा करिं मला अजि देवराया ॥४२॥

**पिताऽसि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ॥ न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः ॥ ४३ ॥**

गा तूं पिता असासि या स्थिर[1]जंगमाचा । लोकांत पूज्यहि महा गुरुवर्य साचा ॥ नारायणा तुजसमान न अन्य कोणी । लोकें[2]त्रयीं अतुल[3]वैभव थोर आणी ॥ ४३ ॥

**तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ॥ पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥४४॥**

वंदीतसें ह्मणुनिया पसरोनि काया । तूं श्रेष्ठ ईश मजलागिं प्रसन्न व्हाया ॥ नारायणा असासि योग्य जसा सुताचें । सोशी पि[4]ता प्रियहि आणि सखा सख्याचें ४४

**अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे ॥ तदेव मे दर्शय देव रूपं प्रसीद देवेश जगन्निवास ॥ ४५ ॥**

ना पाहिलें कधिंहि तें अजि हृ[5]ष्ट जालों । नारायणा बघुनि चित्तिं परंतु भ्यालों ॥ देवा मला तरिहि दाख-

---

१ स्थावर २ त्रैलोक्यांत ३ ज्याचे वैभवास तुलना नाहीं असा ४ बाप ५ आनंदित.

वि देह खासा । होऊनि तुष्ट अमरेश जगन्निवासा ४५

**किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ॥ तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ४६ ॥**

हातीं गदाब्ज दर चक्र किरीट माथां । पाहों असा तुजसि इच्छित कृष्णनाथा ॥ नारायणा तरि चतुर्भुज तूं तसा हो । झांकोनि विश्वतनु उग्र सहस्रबाहो ॥४६॥

**श्रीभगवानुवाच**

**मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात् ॥ तेजोमयं विश्वमनंतमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥ ४७ ॥**

बोले परेश तुज पार्थ कृपानुरागें । म्यां दाविलें परम रूप निजात्मयोगें ॥ नारायणें अमित तैजस विश्वखाणी । पूर्वी न जें बघितलें तुजवीण कोणीं ॥ ४७ ॥

**न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ॥ एवं रूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ४८ ॥**

नाहींच वेद यजनाध्ययनें न दानीं । कर्मींहि शक्त नचि उग्र तपें करोनी ॥ ऐसा मला नृभूवनीं बघण्यासि अन्य । नारायणेष्ट तुजवीण कुरूंत धन्य ! ॥ ४८ ॥

---

१ चांगला. सौम्य. २ विराट् शरीर. ३ श्रीकृष्ण ४ अनंत. ५ तेजोमय. ६ उत्पत्तिस्थान. ७ मनुष्यलोकीं. ८ ईश्वरप्रिय. ९ कौरवकुलांत. धन्या ! हे अर्जुना.

**मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ्ममेदं । व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ ४९ ॥**

ना हो व्यथा मनिंहि चित्त विमूढ तूझें । गा घोरें या-परि विलोकुनि रूप माझें ॥ होऊनि निर्भय सुखी पुनरेव तूं हें । नारायणात्मकाचि तें मम रूप पाहें ॥ ४९ ॥

## संजय उवाच.

**इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः । आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥ ५० ॥**

रायासि संजय ह्मणे मग वासुदेव । पार्थासि बोलुनि असें निजरूप देव ॥ दावोनि सौम्य समजाविहि भीत आत्मा । नारायण प्रकट होउनि तो महात्मा ॥५०॥

## अर्जुन उवाच.

**दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन । इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ५१**

बोले तदा नमुनि पार्थ जनार्दना मी । हें सौम्य पाहुनि तुझें नर रूप नामी ॥ नारायणा निजपणीं स्थिरचित्त जालों । पूर्वस्थिति स्मृतिहि पावुनि आजि धालों ॥

१ व्याकुलपणा. २ भयंकर ३ स्वानंदकारक सौम्य ४ धृतराष्ट्रासि ५ आपले रूप ६ भ्यालेला ७ श्रीकृष्ण ८ चांगले ९ आपुले-ठायीं १० स्मरण ११ कृतकृत्यजालो

श्रीभगवानुवाच

**सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ।**
**देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकांक्षिणः ५२**

नारायण प्रभु ह्मणे शुभ हेंचि माझें । दुर्दर्शरूपहि तुवां आजि पाहिलें जें ॥ कीं देवताहि करुं इच्छिति या तनूचें । गा नित्य दर्शन परी न घडे तयाचें ॥ ५२ ॥

**नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ॥**
**शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा॥५३॥**

नारायण प्रभु न मी निगमोक्त कर्में । नाहीं तपें करुनि दानिंहि यज्ञधर्में ॥ ऐशापरी जगतिं शक्य पहावयास । मद्रूपें सांप्रत जसें अजि पाहिलेंस ॥ ५३ ॥

**भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ॥**
**ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ५४ ॥**

पार्थां अनन्य निजभक्ति–बळेंच हा मी । नारायण प्रभु अशा परि शक्य नामी ॥ गा तत्त्वतां समजण्यास्तव पाहण्यास । वा सव्यसाचि करण्यासहि सुप्रवेश ५४

**मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ॥**
**निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥५५॥**

मद्भक्त मत्पर सदा करि नित्य कर्में । नारायणार्पित असंगाचि आत्मधर्में ॥ निर्वैर सर्व जग हें सम जो –करी । तो पांडवा मजसि निश्चित पावतो कीं॥ ५५॥

---

निर्गुण एक माझें रूप ३।६।७ अर्जुना ४ चांगला उत्तम ५ अथवा

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु
ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे
विश्वरूपदर्शनयोगो नामैकादशोऽध्यायः ॥११॥

श्रीमान् षड्गुणवान कृष्ण भगवान् गीता श्रुतीसार हें। योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥ अक्षाऽयांत जगत्स्वरूप विजया दावी कथी योग तो। या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो. ॥११॥

---

# अध्याय १२ वा.

## ॥ अर्जुन उवाच ॥

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ॥
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः॥१॥

जिष्णू ह्मणे सतत युक्त असे सुभक्त। जे का उपासिति तुला अनुरागयुक्त ॥ अव्यक्त अक्षरचि सेविति आणि अन्य। नारायणा कवण योगि तयांत धन्य॥१॥

## श्रीभगवानुवाच

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ॥
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥

धृतरा-
आपुले-

---

१ विश्वरूप. २ अर्जून ३ एकरूपी ४ अचलब्रह्म

नारायण प्रभु वदे मन मत्स्वरूपीं । योजोनिया मज निजानुभव स्वरूपीं ॥ अत्यंत भक्तियुत नित्य उपासिती जे । ते युक्त योगिजन संमत भक्त माझे ॥ २ ॥

**ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ॥**
**सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥**

जें नक्षरे न वदवे न दिसे असें जे । अव्यक्त निर्गुणचि सेविति. तत्त्व माझें ॥ नारायण स्मरुनि सर्वग ही अचिंत्य । सर्वत्र लिप्त न अचंचल आणि नित्य ॥ ३

**संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ॥**
**ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥**

गा आवरोनि सकलेंद्रियसंघ आणी । सर्व स्थलीं स्वमतिला सम ही करोनी ॥ नारायणाप्रतिच ते मज पावताती । राहे मती रत हितीं जरि सर्व भूतीं ॥४॥

**क्लेशो ऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ॥**
**अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥५॥**

होती सख्या अधिक कष्टचि कीं तयांना । अव्यक्त रूपिं निज चित्त नियोजितांना ॥ अव्यक्त ती गति अशास्तव दुःख भारी । नारायणारहित पावति देहधारी॥५॥

**ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः॥**
**अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥**

---

१ आपुले ठायीं २ सर्वमान्य ३ नहलणारे ४ सर्व व्यापी ५ निर्गुण एक अद्वैत.

जे का समर्पुनि मला अवघींहि कर्में । गा वर्तती विहित मत्पर आत्मधर्में ॥ नारायणोक्त, मतिनेंहि अनन्यें भावें । ध्याती उपासिति मलाचि निजस्वभावें ॥६॥

**तेषामहं समुद्धर्त्ता मृत्युसंसारसागरात् ॥**
**भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥७॥**

उद्धार मीच करणार अगा तयांचा । मोडोनि मृत्युपथ या भवसागराचा ॥ होतों सख्या त्वरित तारक, भक्त माझे । नारायणीं मज मनें दृढ योजिती जे ॥७॥

**मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ॥**
**निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥८॥**

या कारणें मन धरोनि मम स्वरूपीं । बुद्धी प्रवेशविं सख्या परमात्मरूपीं ॥ माझेचि ठायिं मग तूं वसशील आंगें । नारायण स्मरुनि निश्चित भक्तियोगें ॥८॥

**अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ॥**
**अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं धनंजय ॥९॥**

आतां जरी न धरवे मन मत्स्वरूपीं । नारायण स्मरुनि सुस्थिर आत्मरूपीं ॥ अभ्यासुनी तरिहि निर्मळ भक्तियोगा । पावावयासि मज इच्छि धनंजया गा ॥९॥

**अभ्यासे ऽप्यसमर्थो ऽसि मत्कर्मपरमो भव ॥**
**मदर्थमपि कर्माणि कुर्वन् सिद्धिमवाप्स्यसि १०**

---

१ वेदोक्त २ अन्य नाहीं अशा एक भक्तीनें ३ मरणमार्ग. ४ संसारसमुद्राचा. ५ अर्जुना.

अभ्यासिंही असासि तूं असमर्थ पुर्ता । होईं तरी विमेल मत्पर–कर्म–कर्ता । नारायणोक्तचि मदर्थ समस्त कर्में । गा सिद्धि पावसिल आचरतां स्वधर्में ॥ १० ॥

**अथैतदप्यशक्तो ऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ॥**
**सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान्॥११॥**

आतां जरी असासि यासहि तूं अशक्त । नारायैणाश्रितचि हो मम योगयुक्त ॥ सांडीं सख्या सकल कर्मफलस्पृहाही । गा आत्मवंत मन जिंकुनि आणि होईं ११

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते॥**
**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम्१२**

अभ्यास जो गुरु, तयाहुनि आत्मबोधं । ज्ञानाहुनी सुखद चिंतन तें प्रसिद्ध ॥ ध्यानाहुनीहि कृतकर्म फळीं उदासी । नारायणोक्त मग त्याहुनि शांति खासी १२

**अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ॥**
**निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी॥१३॥**

शत्रुत्व जो न करि भूतसखाचि साजे । नारायणेष्ट करुणार्द्र मनें विराजे ॥ निर्मुक्त गर्व ममतादि विकार–भावें । दुःखीं सुखीं सहनशील समस्वभावें ॥१३॥

**संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ॥**
**मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः॥१४॥**

---

१ निर्मल. २ वेदोक्त. ३ ईश्वराश्रित ४ सुखाची आशा ५ श्रेष्ठ ६ आत्मज्ञान. ७ चांगली. ८ मोकळा.

संतुष्टही सतत योगसुखासि भोगी। गा यत्नशील दृढनिश्चययुक्त योगी ॥ नारायणीं जरि सदा मन बुद्धि योजी। मद्भक्त तो प्रिय असे मजला समोंजीं ॥१४॥

**यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः॥**
**हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः॥१५॥**

ज्यापासुनी जन नभी जगतास[1] हाही। नारायणांघ्रियुग[2] चिंतुनि भीत नाहीं ॥ गा हर्ष शोक भय कोप विकार यांहीं। निर्मुक्त[3], जो प्रिय असे मजलागिं तोही १५

**अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ॥**
**सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः १६**

नारायणाश्रितचि[4] निस्पृह शुद्ध दक्ष। ठेवी निरिच्छ भयवर्जित नित्य लक्ष ॥ आरंभणें सकल कामिक कर्म टाकी। मद्भक्त जो मजसि तो प्रिय जाण लोकीं १६

**यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति ॥**
**शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः १७**

न द्वेषि अप्रियें[5] सुखांत न हर्ष मानी। इच्छी न कांहिं मनिं शोकहि ना करोनी ॥ नारायणार्पित[6] शुभाशुभ जो करीतो। मद्भक्तिमंत मजला प्रिय तोचि होतो १७

**समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः॥**
**शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः॥१८॥**

---

१ लोकांत २ चरणयुग्म ३ मोकळा ४ ईश्वराचा आश्रय धरून राहणारा भक्त. ५ न आवडणारे. ६ ईश्वरप्रीत्यर्थ.

मानी समानाचि सदा. रिपु मित्र पक्ष। मानापमानिं-
हि तसा सम धीर दक्ष॥ शीतोष्ण काळिं सुखिं दुःखिं सम-
स्वरूपी। नारायणाश्रित जनांत असंगरूपी॥ १८॥

**तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित्॥**
**अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः१९**

निंदास्तुतींस सम मानुनि मूक[1] राही। भोगें असो-
नि परितुष्ट जशा कशाही॥ लोकीं निराश्रय तरी
स्थिरबुद्धि संत। नारायणेष्ट[2] मज तो प्रिय भक्तिमंत १९

**ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते॥**
**श्रद्धधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः२०**

धर्म्यामृता[3] प्रति उपासिति या असे जे। नारायण-
प्रिय यथाविधि भक्त माझे॥ श्रद्धालु ज्यांस सकलांहुनि
मी वरिष्ठ। अत्यंत गा असति ते मजलागिं इष्ट॥२०॥

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां**
**योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम**
**द्वादशोऽध्यायः॥ १२॥**

श्रीमान्षड्गुणवान कृष्ण भगवान् गीता श्रुतीसार हे
योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें॥
बाराव्यांत सुभक्तियोग वदला पार्थाप्रती तेंचि तो।
या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो॥१२॥

**श्रीमन्नारायणार्पणमस्तु.**

---

१ मुकाट्यानें. २ ईश्वरप्रिय. ३ धर्मरूपी अमृताला.

# त्रयोदशाध्यायप्रारंभः

**श्रीभगवानुवाच**

**इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ॥**
**एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ १ ॥**

नारायण प्रभु ह्मणे अजि हें शरीर। जें क्षेत्र तेंचि विजेया वदताति धीरें ॥ जाणे यथाप्रतिहि जो ह्मणती तयातें। क्षेत्रज्ञ यापरि जगांतिल तत्त्ववेत्ते ॥ १ ॥

**क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ॥**
**क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ २ ॥**

क्षेत्रज्ञ जाण मज आणिक भारता ही। क्षेत्रीं बघें सकळिका जनिं भूत-देहीं ॥ नारायणोक्तचि असे उभयैक्य-बोध। जें ज्ञान तें मजसि संमत सुप्रसिद्ध ॥ २ ॥

**तत्क्षेत्रं यच्च यादृक् च यद्विकारि यतश्च यत् ॥**
**स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥ ३ ॥**

तें क्षेत्र जेंहि जसलेंचि जया विकारें। ज्या कारणास्तव जशापरि हेंहि सारें ॥ नारायणांश जनिं कोण कसाहि तेंची। संक्षिप्त ऐक मजपासुनि सर्व्यसाची ॥ ३ ॥

**ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् ॥**

---

१ श्रीकृष्ण २।५।८ अर्जुना. ३ ज्ञाते. ४ तत्त्व जाणणारे. ६ वेदोक्त. ७ क्षेत्रक्षेत्रज्ञांचें ऐक्य दाखविणारें ज्ञान.

**ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ ४ ॥**

सांडोनिया मुनिजनीं लटिके[1] स्वच्छंदे । जें गाइलें बहुविध श्रुतिसिद्ध छंदें ॥ गा ब्रह्मसूत्र—शिवसूत्र—पदींहि संतीं । नारायण स्मरुनि निश्चित बुद्धिमंतीं ॥ ४ ॥

**महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ॥**
**इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ॥५॥**

पृथ्व्यादि[2] पंचक अहंकृति[3] बुद्धि आणी । अव्यक्त तत्त्वहि दशेंद्रिय[4]वृत्ति यांणीं ॥ संयुक्त एक मन गोचरें[5] इंद्रियांचें । नारायणारहित पांच[6] तसेचि साचे ॥ ५ ॥

**इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ॥**
**एतत् क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥**

गा आस द्वेष सुख दुःख विकार पाहीं । शारीर संघ धृति[7] आणिक चेतनाही ॥ हें क्षेत्र बोलति असें सविकार जाणें । नारायणोक्तचि[9] अविस्तर[*] जे शहाणे॥६॥

**अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिराजवम् ॥**
**आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः॥७॥**

निर्मानता मनिं अदंभ तशी अहिंसा । क्षांती[10] अवक्रपण सुस्थिरभाव खासा ॥ आचारशुद्धि गुरुभक्ति विचार सांचा[11] । नारायण स्मरुनि निग्रह आत्मयाचा[12] ७

---

१ मायिक खोटें. २ पंचमहाभूतें. ३ अहंकार. ४ दहा इंद्रियांच्या दहा वृत्तींनीं युक्त. ५ समजणारे. ६ पांच विषय. ७ धैर्य. ८ जीवकला. ९ ईश्वरानें किंवा वेदांनीं वर्णिलेले. १० शांति. ११ खरा. १२ मनाचा. * सांक्षिप्त.

**इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ॥**
**जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥ ८ ॥**

वैराग्य सर्व विषयांत महा, तसीच । नारायणोक्त अनहंकृति आणि साच ॥ गा जन्म मृत्यु भय रोग जरादि दुःखीं । दोषानुदर्शन सदोदित जागतें कीं ॥८॥

**असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ।**
**नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥**

नामें असक्ति ह्मणतात अलिप्तता जी । स्त्री पुत्र आप्तजनिं वा धन–धाम–काजीं ॥ नारायणोक्तचि मनीं समता विशिष्टें । पावोनि विंश्चिं उपपत्ति अनिष्ट इष्ट ९

**मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ॥**
**विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥**

माझेचि ठायिं दृढ भक्ति अनन्य भावें । नारायण स्मरुनि अव्यभिचारि नांवें ॥ एकांतसेवन सदा जन-संघ–संग । मायीक पाहुनि तिथें अरतिप्रसंग ॥१० ॥

**अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनं ॥**
**एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ११**

अध्यात्मबोधिं दृढ भाव खरेपणाचा । अभ्यास तत्त्व-मसि–अर्थहि पाहण्याचा ॥ नारायणात्मक असी निज-बोध जाती । वाखाणिली उलट याहुनि अज्ञता ती ११

---

१ खरी. २ जागृत. ३ वेदोक्त. ४ श्रेष्ठ. ५ वाईट. ६ बरी. ७ अभेद नांवाची. ८ समुदाय. ९ रममाण न होणें. १० ज्ञान. ११ अज्ञान.

ज्ञेयं यत्तत् प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वाऽमृतमश्नुते ॥
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥

मी ज्ञेय जें तुजसि तें कथितों मनींच । जें जाणतां अमृत[1] पावति तत्क्षणींच ॥ नारायणात्मक अनंत अनादि शुद्ध । तें ब्रह्म अद्वय न सत् न असत् प्रसिद्ध १२

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखं ॥
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥

सर्वत्र हस्तपदयुक्त बहु प्रकारें । कीं सर्वदर्शि[2] बहुनेत्रशिरोमुखी रे ॥ नारायणात्मक बहुश्रुतिमंत[3] लोकीं । व्यापोनिया सकल राहतसे विलोकीं ॥ १३ ॥

सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ॥
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १४ ॥

नारायणात्मकचि भासकषड्गुणांचें । सर्वेंद्रियांरहित यद्यपि तद्गुणांचें ॥ सर्वांसि आश्रय असोनि अलिप्त ऐसें । गा निर्गुणी गुणहि भोगितसे अपैसें ॥ १४ ॥

बहिरंतश्च भूतानामचरं चरमेव च । सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिके च तत् ॥ १५ ॥

बाह्यांतरंगहि तसें अवघ्या जगाचें । नारायणात्मक चराचर तेंचि साचें ॥ लोकीं अतींद्रिय[4] अशास्तव जें कळेना[5] । दूरस्थ तें हृदयिंचें परि आकळेना ॥ १५ ॥

---

१ मोक्ष. २ चहूंकडे दिसणारें. ३ कर्ण. ४ इंद्रियातीत ५ समजत नाहीं.

**अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितं**
**भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च १६**

अव्यक्त एकचि असोनि समस्त भूतीं । भासे जनीं सगुण भिन्न पृथग्विभूती ॥ तें ज्ञेय गा भुवनपोषक जें स्वसिद्ध । नारायणाख्य लयसर्गकर प्रसिद्ध ॥१६॥

**ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ॥**
**ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् १७**

ज्योतींमधें परम तेज तमापरौतें । नारायणात्मकचि वर्णिति तत्त्ववेत्ते ॥ गा ज्ञान ज्ञेयहि तसें निजबोधगम्य । आहेचि सर्व हृदयांतरिं जें अगम्य ॥ १७ ॥

**इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ॥**
**मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १८ ॥**

हें क्षेत्र सम्यक तसें निजबोधतत्त्व । गा ज्ञेयही कथियलें तुज मुख्य सत्त्व ॥ मद्भक्त जाणुनि असें मज पावताती । नारायणात्मकचि होउनि राहताती ॥१८॥

**प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ॥**
**विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् १९**

नारायणप्रकृति पूरुष आणि तोही । लोकीं अनादि उभयत्र असींच पाहीं ॥ आणी गुणत्रय तसेचि विकार सारे । तूं जाण गा प्रकृतिसंभव ते पसारे॥ १९ ॥

---

१ वेगवेगळ्या रूपानें २ जग. लोक ३ नारायणनामक ४ प्रलय ५ सृष्टि ६ पलीकडचे ७ तत्त्व जाणणारें ८ न कळणारे ९ माया.

**कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ॥**
**पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते २०**

कर्तेपणीं जनिं सकार्यहि कारणाच्या ॥ हेतू असे प्रकृति बोलति वेदवाचा ॥ हेतू तसाचि वदती सुख-दुःखभोगीं ॥ नारायणांश पुरुषं प्रतिबिंब योगी ॥२०॥

**पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान् गुणान् ।**
**कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु॥२१॥**

नारा[1]यणांश[2] पुरुष प्र[3]कृतिस्थ दे[4]हीं । भोगीतसे प्रकृतिजन्य गुणांस पाहीं ॥ संसारिं कारण असे गुणसंग यासी । योनींत वाइट बऱ्या जनि ऱ्हावयासी ॥२१॥

**उपद्रष्टाऽनुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः ॥**
**परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः २२**

द्र[6]ष्टा तसाच अनुमोदक वा[7] धनीही । भोक्ता महेश्वरचि तो प्रतिबिंब देहीं ॥ नारा[8]यणाख्य जनिं जो ह्मणती परात्मा । देहीं यया परम तो पुरुषाद्य आत्मा ॥२२॥

**य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह । सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ २३ ॥**

जाणे असा पुरुष यापरि जो प्रशस्त । नारायणं-प्रकृति आणि गुणांसमेत ॥ सर्वांपरी जरिहि तो जगतांत

---

१।२ जीव ३ प्रकृतीत राहणारा ४ मीपणानें देहधारण कराणरा. ५ जन्म. ६ पाहणारा. ७ अथवा. ८ नारायणनामक ९ माया.

वर्ते । संसारिं जन्मुनि तथापि पुन्हां न पर्ते॥ २३ ॥

**ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ॥**
**अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥२४॥**

नारायणासि बघती आपुलेचि ठायीं । कित्येक संत-जन आपण आपणांहीं ॥ अष्टांग योगिं मुनि सांख्यपथें कितीक ॥ कर्में करोनि विधियुक्तहि अन्य लोक॥२४॥

**अन्ये त्वेवमजानंतः श्रुत्वाऽन्येभ्य उपासते ॥**
**तेऽपि चातितरंत्येव मृत्युं श्रुतिपरायणाः २५**

कित्येक नेणुनि अशापरि आत्मयातें । ऐकोनि अन्य वदनें भजताति मातें । तेही असे तरति मृत्यु-दधी सुखानें ॥ नारायणश्रवणतत्पर कौतुकानें ॥२५॥

**यावत्संजायते किंचित्सत्त्वं स्थावरजंगमम् ॥**
**क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ॥ २६ ॥**

जें होय सम्यक चराचर सर्व कांहीं । नारायणात्मक जगत् परिपूर्ण पाहीं॥ क्षेत्रज्ञयोग घडतांचि शरीर-धामीं । तें जाण तूं भरतराजकुळांत नामी[३] ॥ २६ ॥

**समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् ॥ विन-श्यत्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति ॥२७॥**

सर्वत्र भूतिं समजो परमेश[४] राहे । नारायणाभिध[५] तया अविनाश पाहे ॥ या नश्वरीं[६],सतत जो बघणार तो-

---

१ फिरे २ मननशील ३ उत्तम. ४ परमात्मा. ५ नारायण नामक. ६ या नाशवंत जडांत.

ची । गा ज्ञानडोळस जगांतिल सव्यसाची ॥ २७ ॥

**समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ॥ न**
**हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् २८**

पाहे समान जनिं सम्यक सर्व ठायीं । नारायण स्थित[1] महेश्वर सर्व देहीं ॥ जो तो सुधी[2] न वधि आपण आपणातें । तेणेंचि जाय पुढती परमा गतीतें ॥ २८ ॥

**प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ।**
**यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ २९ ॥**

होती बळें प्रकृतिच्या क्रियमाण कर्में। नारायणोक्त[3] अवघीं विहित स्वधर्मीं॥हें जो बघे तइंच गा निज आत्मयाचें । तो पाहतो जनिं अकर्तृपण स्वताचें ॥ २९ ॥

**यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ।**
**तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥३०॥**

जेव्हां पृथक् पृथक[4] सर्वहि भूतभाव । एकस्थलस्थित बघे जनिं सुस्वभाव ॥नारायणात्मक तसाचि जगत्प्रसारा। लाधे तदा परम तात्त्विक वस्तुसारा[5] ॥ ३० ॥

**अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ।**
**शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ३१**

लोकांत निर्गुण अनादिपणें स्वभावें।आत्मा स्वयें परम अव्यय सर्वभावें ॥ कुंतीसुता बघ असूनि शरीरवासी । कांहीं कधीं न करि लिप्त नव्हे तयासी ॥ ३१ ॥

---

1असलेला 2सुबुद्धी 3वेदोक्त 4निरनिराळें 5ब्रह्मनामक तत्त्वाला.

**यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ।**
**सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते॥३२॥**

व्यापोनि जेविं जग सूक्ष्मपण स्वभावें । आकाश लिप्त न तिथें कवणाहि भावें ॥ नारायण प्रभु तसा सकलांतरात्मा । व्यापोनिया जग अलिप्त असे महात्मा ३२

**यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ।**
**क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥३३**

जैसा प्रकाशि[1] रवि रूप असोनि एक । नारायण प्रभु जगांतिल सर्व लोक ॥ क्षेत्रज्ञही सकल देह तसे प्रकाशी । गा भारता[2] असुनि एक समस्त देशीं ॥ ३३ ॥

**क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमंतरं ज्ञानचक्षुषा ।**
**भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यांति ते परम् ॥ ३४ ॥**

क्षेत्रज्ञ आणि जगतांतिल देह यांचें । नारायणोक्त[3] महदंतर या परीचें ॥ गा ज्ञानदृष्टियुत[4] संसृतिमुक्त[5]तीं । जे जाणती परम ते पद पावताती ॥ ३४ ॥

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥**

श्रीमान्षड्गुणवंत कृष्ण भगवद्गीता श्रुती सार हे । योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ।

---

१ प्रकाशित करितो २ अर्जुना ३ वेदांनीं वर्णिलेले ४ ज्ञानदृष्टि प्राप्त आहे ज्यास ५ संसारमुक्ती.

पार्थाला वपुरात्मयोगहि कथी तेराविया माजिं तो
..या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥१३॥

श्रीकृष्णार्पणमस्तु.

---

# चतुर्दशाध्यायप्रारंभः ।

**श्रीभगवानुवाच.**

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ।
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः १

नारायण प्रभु ह्मणे पुनरेव तूतें । ज्ञानांत उत्तमचि
तो निजबोध येथें ॥ मी सांगतों सुमुनि जाणुनि जें प्र-
सिद्धी । गा पावले जगतिं लाहुनि आत्मसिद्धी ॥ १ ॥

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ॥
सर्गे ऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥२॥

ज्ञानासि याच अवलंबुनि लोक लोकीं । सारूप्यध-
र्मे मम वैभव पावले कीं ॥ जे ते न होति पुढतीं घडतां-
हि सृष्टी । नारायणप्रिय तसे प्रळयीं न कष्टी ॥ २ ॥

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहं ॥
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

---

१ क्षेत्रक्षेत्रज्ञयोग. २ ज्ञान. ३ स्वरूपता. ४ उत्पत्ति.

मद्योनि ब्रह्म महदाख्य जनांस हेतू । तेथें चिदंश धरितों बघ भारता तूं ॥ मी, भूतसंभवें तदा त्रिजगत्स्वरूप । नारायणात्मक घडे मम विश्वरूप ॥ ३ ॥

**सर्वयोनिषु कौंतेय मूर्तयः संभवंति याः ॥**
**तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥४॥**

कुंतीसुता सकल योनिंमधें सतेजा । मूर्ती अनेकविध संभवताति ज्या ज्या॥ तें ब्रह्म योनिच तयां महदाख्य माता । नारायण प्रभुचि मी हरि बीजदाता ॥ ४ ॥

**सत्त्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ॥**
**निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥**

हें सूत्ररूप रज सत्व तमाख्य तीन । नारायण प्रकृतिचे गुण ती-अधीन ॥ ते वेष्टिताति विजया तनुमाजि देही । जीवाख्य अव्यय मदंशचि जो विदेही ॥ ५ ॥

**तत्र सत्त्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ।**
**सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥ ६ ॥**

त्यांमाजि सत्वगुण शुद्धपणें प्रसिद्ध । कीं जो प्रकाशक निरामयहि स्वसिद्ध ॥ बांधी जनास अनघा सुखसंग योगें । नारायणोक्तहि तसा निजबोधसंगें ॥ ६ ॥

**रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवं ॥**

---

१ माझी योनि. २ महत् नांवाची३ कारण. ४ अर्जुना ५ उत्पत्ति ६ पिता. ७ जीव नांवाचा. ८ निर्दोष ९ निष्पापा अर्जुना १० वेदोक्त ११ आत्मज्ञानसंगानें.

**तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥ ७ ॥**

गा जाण कर्मठ रजोगुण काम्यधर्मी । आशेसवें उदित होय सदा स्वकर्मी ॥ नारायणप्रियेंसख्या करितो प्रसंगें । जीवासि बद्ध निजे मायिक कर्मसंगें ॥ ७ ॥

**तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनां ॥**
**प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥**

आत्माज्ञताजनित जाण तमोगुणाचा । नारायणारहित भाव जड भ्रमाचा ॥ जीवा निजेंत अथवा अळसें प्रमादें । तो भारता करुनि बद्ध सदैव बाधे ॥ ८ ॥

**सत्त्वं सुखे संजयति रजः कर्माणि भारत ॥**
**ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥ ९ ॥**

ज्ञानेंचि सत्वगुण सक्त सुखीं करीतो । कर्मीं सकामहि रजोगुण नाचवी तो ॥ ज्ञानास वेष्टुनि तमोगुण नित्य आधीं । नारायण त्यजुनि योजितसे प्रमादीं ९

**रजस्तमश्चाभिभूय सत्त्वं भवति भारत । रजः सत्त्वं तमश्चैव तमः सत्त्वं रजस्तथा ॥ १० ॥**

मोडोनिया रजतमोगुण–पौरुषातें । गा भारता सबल सत्त्वचि एक होतें ॥ हाणोनि तेविं तम सत्त्वरजांसि पाडी। नारायणोक्त रज सत्त्वतमांसि मोडी ॥ १० ॥

**सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते । ज्ञानं**

---

१ निष्पापा अर्जुना २ आपल्या ३ आत्मज्ञान नसल्यामुळें उत्पन्न होणारा ४ स्वभाव ५ अन्यायानें ६ संलग्न करितो. रमवतो. ७ पराक्रमाला. ८ अर्जुना. ९ वेदोक्त.

**यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्त्वमित्युत ॥ ११ ॥**

देहीं यया सकल इंद्रियवृत्तिमाजीं । ज्ञानप्रकाश निगमोक्त[1] जगत्समाजीं ॥ नारायणानुभव[2] आणि घडेल जेव्हां । गा वाढला समजणें गुण सत्त्व तेव्हां ॥ ११ ॥

**लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमः स्पृहा ।**
**रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥**

लोभ प्रवृत्ति बहु आस तसीच कर्मीं । आरंभ अस्थिरपणा सकल स्वधर्मीं । नारायणाविण वृथा रज[3] वाढतांना । गा भारता घडति हेचि विलास नाना ॥१२॥

**अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ।**
**तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥१३॥**

अज्ञानता हृदयिं बाह्यहि अप्रवृत्ती । मोहें सदोदित असावध चित्तवृत्ती ॥ नारायणारहित हे तम वाढतांना । गा कौरवा प्रबळ होति विकार नाना ॥ १३ ॥

**यदा सत्त्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ।**
**तदोत्तमविदांल्लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥**

गा जाहला असुनि सत्त्वगुणांश भारी । क्षीणायु होउनि मरे जरि देहधारी ॥ तो जाय निर्मळ पदाप्रति जाति जेथें । नारायणप्रिय[4] नरोत्तम सुज्ञ तेथें ॥१४॥

**रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते । तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥**

---

१ वेदोक्त. २ आत्मानुभव ३ रजोगुण. ४ भगवद्भक्त

नारायणाविण रजोगुणवृद्धिमाजीं । मेला तरी पुढ-तिं होय जगत्समाजीं ॥ गा कर्मठांमधिं, तसा मरतां तमांत । तो मूढयोनिंत रिघे पशुपक्षियांत ॥ १५ ॥

**कर्मणः सुकृतस्याहुः सात्त्विकं निर्मलं फलं ॥**
**रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलं ॥१६॥**

कीं पुण्यकर्म फल निर्मल सात्विकाचें । नारायणोक्त बुधं वर्णिति तेंचि साचें ॥ गा दुःख हेंचि फल होय जनीं रजाचें । अज्ञानता फलहि तेविं तमोगुणाचें १६॥

**सत्त्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ॥**
**प्रमादमोहौ तमसो भवतोऽज्ञानमेव च ॥१७॥**

सत्त्वामुळें प्रकट गा निजबोध होतो । तैसा रजोगुणबळें जनिं लोभ जो तो ॥ अज्ञान मोह अविवेक तमोविकारें । नारायणारहित होति बहु प्रकारें ॥ १७ ॥

**ऊर्ध्वं गच्छंति सत्त्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः।**
**जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छंति तामसाः१८**

सत्त्वस्थ ते सकल उंच गतीस जाती । कर्मामधेंचि जन राजस राहताती ॥ नारायणाविण कनिष्ठ तिज्या गुणाचे । जाती अधोगतिस तामस तेचि साचे ॥१८॥

**नान्यं गुणेभ्यः कर्त्तारं यदा द्रष्टानुपश्यति ॥**
**गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति १९**

कर्त्ता गुणांविण नसे दुसरा कदाही । जेव्हां बघेल

---

१ ज्ञान. २ प्रारब्धकर्मांत. कर्मभूमीवर.

बघणार असें सदाही ॥ स्वात्मत्व निर्गुणाचि जाणुनि तृप्त होतो । नारायणोक्त मम भाव सु पावतो तो ॥१९॥

**गुणानेतानतीत्य त्रीन् देही देहसमुद्भवान् ॥**
**जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तो ऽमृतमश्नुते ॥२०॥**

ओलांडुनी त्रिगुण यापरिचे असे हे । देही विकार तनुचे मरणांत राहे ॥ नारायण स्मरुनि जन्मजरादि योगीं। तो दुःखमुक्त उघडें अमृतत्व भोगी ॥ २० ॥

## अर्जुन उवाच

**कैर्लिंगैस्त्रीन् गुणानेतानतीतो भवति प्रभो ॥**
**किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ २१**

चिन्हीं कशा त्रिगुण पार्थ ह्मणे अहो तो । नाराय-णा ! तरुनि हेहि अतीत होतो ॥ आचार त्या कवण, केविं अशां गुणां या । वागे वलांडुनि तिघां जगदेकराया॥२१॥

## श्रीभगवानुवाच.

**प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ॥ न**
**द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥२२॥**

नारायण प्रभु वदे मम चित्प्रकाश । मायाप्रवृत्तिहि तसाच विमोहपाश ॥ द्वेषीच ना त्रिविध आर्गत लोक-रीती । गा पांडवा गतें न इच्छि महा जरी तीं ॥२२॥

---

१ वेदोक्त. २ मद्रूपता. ३ उत्तम. ४ शरीराचे. ५ बाल्य वार्धक्य प्राप्त झालें असतां. ६ मुक्तगति. ७ श्रीकृष्णा ८ प्राप्त असलेलीं ९ निवृत्त झालेलीं.

**उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ॥**
**गुणा वर्त्तंत इत्येव योऽवतिष्ठति नेंगते ॥२३॥**

राहे मृषा बघुनि विश्व उदास जैसा॥जो नाढळे त्रिगुण-वृत्तिबळें अपैसा ॥ हे वर्तती गुण असें समजोनि पाहीं । नारायणाश्रित वसे न करीच कांहीं ॥ २३ ॥

**समदुःखसुखः स्वस्थः समलोष्ठाश्मकांचनः ।**
**तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः २४**

जो स्वस्थ निर्मल सदा सुखदुःखिं राहे । ज्यातें समान कनकोपैल मृत्तिका हें ॥ धैर्यें प्रियाप्रिय बघे सम सर्व धंदा । नारायणाश्रित निज स्तुति आणि निंदा २४

**मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ॥**
**सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥२५**

मानापमानिंहि तसा सम सर्वसाक्षी। नारायण स्मरुनिया रिपुमित्रपक्षीं ॥ आरंभ जो सकलही त्यजितो सुभक्त तूं जाण गा वदति तोचि गुणां विभक्तें ॥ २५ ॥

**मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ।**
**सगुणान्समतीत्यैतान्ब्रह्मभूयाय कल्पते ॥२६॥**

नारायणासि मज अव्यभिचारिनांवें । जो सेवितो सतत एक सुभक्तिभावें ॥ लंघूनि हे गुणहि तो परिपूर्णतेला । होतो सुपात्र नर उत्तम सद्गतीला ॥ २६ ॥

---

१ खोटे मायीक २ नारायणाचे आश्रयानें ३ सोने, दगड, माती ४ वेगळा ५ ओलांडून. ६ ब्रह्मस्थितीस.

ब्रह्मणोहि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ॥
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च २७.

ब्रह्मस्वरूप जनिं वेदहि जे तयांची । गा मुक्तिचीहि शुभ शाश्वत धर्म याची ॥ नारायण[1] प्रकट मीच असें प्रतिष्ठा । एकांतिका निजसुखासहि आत्मनिष्ठा ॥२७॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशो ऽध्यायः ॥ १४ ॥

श्रीमान् षड्गुणवंत कृष्ण भगवान् गीता श्रुती सार हे । योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें॥ चौदाव्यांत गुणत्रयाख्य[2] वदला पार्थाप्रती[3] योग तो । या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥ १४ ॥

श्रीमन्नारायणार्पणमस्तु

---

# पंचदशाध्यायप्रारंभः

## श्रीभगवानुवाच.

ऊर्ध्वमूलमधः शाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ॥
छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् १

नारायण[1] प्रभु ह्मणे वर[4] ब्रह्म मूल । शाखा तळीं[5] प्रं[6]-

---

१ परमेश्वर. २ गुणत्रयनावाचा ३ श्रीकृष्ण ४ वरती ५ खाली ६ मायेच्या.

क्रुति ज्या जडजीवजाल ॥ अश्वत्थ[1] विश्वतरु अव्यय वेद
पानें । वेदज्ञ[2] तो वदति जो बुध त्यासि जाणे ॥ १ ॥

**अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः । अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ॥ २ ॥**

जीवेश्वरीं[4] सलग आश्रित देहशाखा[5] । खालीं वरी
त्रिगुणही विषयोपशाखा ॥ डाळ्या मुळ्या सतत नि-
त्यचि या विलोकीं । नारायणोक्त[6] विधिबद्ध[7] मनुष्यलोकीं ॥

**न रूपमस्येह तथोपलभ्यते नांतो न चादिर्न च संप्रतिष्ठा । अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसंगशस्त्रेण दृढेन छित्त्वा ॥ ३ ॥**

यद्रूप[8] येथ नुमगे नुमगेचि याचा ।[9] आदीहि अंतहि
विधीहि जगत्स्थितीचा ॥ अश्वत्थ हा प्रबलमूल असंग-
शस्त्रें । नारायण स्मरत तोडुनि नाममंत्रें ॥ ३ ॥

**ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तंति भूयः ॥ तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥**

नारायणाख्य[10] मग तें पद धुंडणें कीं । गेल्या जिथें
न पुढतीं फिरतीहि लोकीं ॥ त्या दिव्य आदिपुरुषास-
चि गा भजावें । जेथूनि विस्तृत[11] जुनाट जग स्वभावें ४

---

१ नश्वर पिंपळ २ वेदवेत्ते ३शाहणा ४जीव आणि ईश्वरयांचेठायीं ५ खांद्या ६ ईश्वरानें किंवा वेदानें वर्णन केलेल्या ७ प्रारब्ध सूत्रानें बांधलेल्या ८ ज्याचें रूप ९ उमगत नाहीं १० नारायणनामक ११ विस्तारलें आहे.

**निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या**
**विनिवृत्तकामाः । द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्ग-**
**च्छंत्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥**

कीं संगदोषहर[1] मानविमोहहीन । नारायणज्ञ[2] जगतांत सकामही न ॥ निर्द्वंद्व जे त्यजुनि दुःखसुखादि होती । ते सुज्ञ शाश्वत तया सुपदासि जाती ॥ ५ ॥

**न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ॥**
**यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥**

नारायणाभिध[3] पदासि तया न कोणी । ज्योती प्रकाशिति रवी शशि[4] अग्नि आणी ॥ पावोनिया भ्रमति संसृतिं ना पुन्हां जें । तूं जाण गा परम धामहि तेंचि माझें ६

**ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।**
**मनःषष्ठानींद्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥७॥**

नारायणात्मक मदंशचि जीवलोकीं । गा जीव होउनि सनातन चाळितो कीं ॥ ज्ञानेंद्रियें बघ मनासह नित्य साहीं । आकर्षितो निज बळें प्रकृतिस्थ देही ॥७॥

**शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ।**
**गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥८॥**

हा जें शरीर तनुनायक पावतो कीं । जें टाकुनीहि निघतो प्रळयीं विलोकीं ॥ नारायणांश तयिं घेउनि

---

१ संगदोष नाहींसें करणारा २ आत्मज्ञ ३ उत्तम. ४ नारायण नामक ६ चंद्र ७ संसारांत ८ प्रकृतीच्याठायीं असलेलीं ९।११ जीवात्मा १० देहांतकाली.

यांस जातो । वारा जसा विविध गंध हरोनि नेतो ॥८॥

**श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ॥**
**अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥**

श्रोत्र[1] त्वचा[2] नयन नासिक आणि जिव्हा । यांतें मनासह अधिष्ठुनि हाचि जेव्हां ॥ नारा[3]यणांश वपु[4]माजि वसे सदैव । सेवी तदां विषय भोगित देहदैव ॥ ९ ॥

**उत्क्रामंतं स्थितं वाऽपि भुंजानं वा गुणान्वितम् ॥**
**विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ॥१०॥**

नारायणांश[5] निघतो स्थित[6]ही असेना । भोगीतसे विषय वा[8] गुणयुक्त कैसा ॥ अज्ञान हे न बघतीच असोनि डोळे । या ज्ञान–डोळस विलोकिति भक्त भोळे १०

**यतंतो योगिनश्चैनं पश्यंत्यात्मन्यवस्थितम् ।**
**यतंतोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यंत्यचेतसः ॥११॥**

जे यत्नशीलचि मुनी निजयोग[10]युक्त । ते यास आत्मगत[11] पाहति एक भक्त ॥ यत्नेंहि ते अकृत[12]कर्म अशुद्ध[13]बुद्धी । नारायणासि नचि या बघती अबुद्धी[14] ११

**यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ।**
**यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् १२**

नारायणात्मकाचि भास्कर[15]मंडलस्थ । या तेज जें

---

१ कान २ कातडी ३ जीवात्मा ४ शरीरांत ५ ईश्वराचा अंश. ६ असतो. ७ स्वतंत्रपणानें ८ अथवा ९ साधक १० आत्मयोगी. ११ आपुलेच ठायीं १२ विहितकर्म न करणारे १३ चित्तशुद्धि नाहीं असे. १४ अज्ञानी. १५ सूर्यमंडलांत असणारे.

जगत भासवितें समस्त ॥ चंद्राग्निमाजिहि तसेंच महा विराजे । तें तेजही सकल शाश्वत जाण माझें १२

**गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा । पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥ १३ ॥**

भूतें समग्र धरणींत शिरोनि मीच । नारायणांश करिं धारण उंच नीच ॥ गा शक्तिनें वनिं वनस्पति वाढवीतों । लोकांत होउनि रसात्मक चंद्रमा तो १३

**अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः । प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधं ॥१४॥**

नारायण प्रकृतिसंश्रित[1] मीच ईश । प्राण्यांचिया जठरिं होउनि गा हुताशें[2] ॥ गा प्राणसंयुतें[3] अपान-मरुद्गतीनें[4] । पेटोनिया पचविं चौपरिचींहि अन्नें ॥ १४ ॥

**सर्वस्य चाहं हृदि संनिविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च । वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदांतकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५ ॥**

नारायणाख्य सकळा हृदिं मी प्रविष्ट । माझ्यामुळें स्मरण विस्मृति बोध इष्ट ॥ होतात, मी सकल वेदिंहि वेद्य[6] पुर्ता । वेदज्ञ[7] मीच निगमागमनीतिकर्ता[8] ॥ १५ ॥

**द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च । क्षरः**

---

१ मायेच्या आश्रयानें. २ अग्नि. ३ युक्त. ४ वायूच्या गतीनें. ५ चतुर्विध. ६ जाणण्यास योग्य असा. ७ वेदवेत्ता. ८ वेदशास्त्र.

**सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥१६॥**

लोकांत या पुरुष हेचि अनादि दोनी । वाखाणिले क्षरहि अक्षर मीं वदोनी ॥ नारायणें, समज तूं क्षर सर्व भूतें । कूटस्थ जाण मनिं अक्षर आत्मयातें ॥१६॥

**उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।**
**यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः १७**

यांहूनिया पुरुष उत्तम तो महात्मा । बिंब स्वयें परम वर्णिति वेद आत्मा ॥ त्रैलोक्य वां भरुनि विश्व समग्र माझें । नारायणप्रभुचि अव्यय जो विराजे ॥ १७ ॥

**यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ।**
**अतो ऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः १८**

ज्या कारणें क्षरनराहुनि होय अन्य । वा अक्षराहुंनिहि उत्तम मीच धन्य ॥ नारायणप्रभु अशास्तव गा अनादी । प्रख्यात लोकिं पुरुषोत्तम आणि वेदीं ॥१८॥

**यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् । स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥**

संमूढही नसुनियां मजलागिं लोकीं । नारायणासि पुरुषोत्तम जो विलोकी ॥ ऐसा तरी समज तो सकलज्ञ नांवें । गा भारता मज भजे अखिलात्मभावें ॥ १९ ॥

**इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयाऽनघ । एत-**

---

१ अथवा. २ अविनाश ३ शोभतो. ४ जीव पुरुषाहून. ५ शिवरूपी अक्षरात्म्याहून. ६ मोहयुक्त ७ सर्वज्ञ ८ सर्वात्मभावानें

बुद्ध्वा बुद्धिमान्स्यात् कृतकृत्यश्च भारत ॥२०॥

माझ्या सख्या तुजसि हें अति गुह्य शास्त्र । नारा-
यणें कथियलें अनघा पवित्र ॥ मीं, त्या यया समजुनी
नर बुद्धिमान । होऊनि होय कृतकृत्य तुझीच आण[1]२०

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां
योगशास्त्रे श्रीकृष्णा० पुराणपुरुषोत्तम-
योगो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

श्रीमान्षड्गुणवंत कृष्ण भगवद्गीता श्रुतीसार हे ।
योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ।
पार्थासी पुरुषोत्तमाख्य[2] वदला पंधाविंयामाजिं तो ।
या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥१५॥

श्रीमन्नारायणार्पणमस्तु.

---

# षोडशाध्यायप्रारंभः

## श्रीभगवानुवाच

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ॥
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥१॥

नारायण प्रभु म्हणे निज सत्वशुद्धी । ज्ञानीं व्यव-
स्थितिहि[3] निर्भय आणि बुद्धी ॥ गा यज्ञदान तप निग्रह

---

१ शपथ. २ पुरुषोत्तमनामक (योग) ३ वस्ति, वास्तव्य, थारा.

इंद्रियांचा । स्वाध्याय—अध्ययन आर्जव गोड वाचा १

**अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ॥**
**दया भूतेष्वलोलुप्त्वं मार्दवं न्हीरचापलम् ॥२॥**

सत्यत्व कोप नसणेंहि तशी अहिंसा । गा त्याग शांतिहि अकुत्सितभाव खासा ॥ लज्जा अलोलुपपणा मृदुता[1]हि भूतीं । नारायणीं अचल बुद्धि दयार्द्रता ती २

**तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ॥**
**भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥**

आचारशुद्धि निज[2]कांति धृ[3]ति क्ष[4]माही। अद्वेष भूत-गेणि[5] आणि अदंभता हीं ॥ दैवीर[6]माजनित जे नर त्यां-सि होती । नारायणोक्त[7] विजर्या[8] शुभ लक्षणें तीं ॥ ३ ॥

**दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ॥**
**अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीं ॥४॥**

ढोंगी स्वभाव अभिमान तसाचि मोठा । नारायणार-हित पौरु[9]ष कोप ताठा ॥ अज्ञान हे गुण पृथा[10]तनया त-यांचे । होतात जे नर जनीं असु[11]रश्रियेचे ॥ ४ ॥

**दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ॥**
**मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ९**

श्री दैविकी[12] सतत जाण विमुक्ततेला । गा आसुरी

---

१ नम्रपणा. २ स्वताचा तेजस्वीपणा. ३ जिव्हा आणि उपस्थ या दोन इंद्रियांचा जय करण्याजोगी धैर्यवृत्ति. ४ दुसऱ्याचे अपराधानें विकार पावत नाहीं ती वृत्ति. ५ सर्वभूतीं. ६।१२ दैवी संपत्ति. ७ वेदोक्त. ८।१० अर्जुना. ९ उद्योग. पराक्रम. ११ असुरी संपत्तीचे.

जनिं असे भवबंधनाला ॥ गा पांडवा न करिं शोक क-
दापि याचा। कीं जाहला अससि तूं सुर–संपदेचा[1] ॥ ५.॥

**द्वौ भूतसर्गौ लोके ऽस्मिन्दैव आसुर एव च ॥**
**दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ६**

लोकीं यया द्विविध यापरि भूतसृष्टी । दैवी तशीच
असुरी वद शास्त्रदृष्टी ॥ पार्था सविस्तरहि म्यां सुरसं-
पदा[2] ते । नारायणें कथिलि आइक आसुरीतें ॥ ६ ॥

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ॥**
**न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ७**

उक्त[3] प्रवृत्तिविधि आणि निवृत्तिपंथ । गा नेणती
असुर मानव ते असंत[4] ॥ आचार नाहिं शुचिता[5] न तसें-
चि सत्य । नारायणस्मरण तेंहि तयांसि नित्य ॥७॥

**असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ॥**
**अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥**

ते अप्रतिष्ठित उगा लटिकेंचि ऐसें । जालें निरीश
ह्मणती जग हें अपैसें[6] ॥ नारायणात्मक[7] न, केवळ काम-
जन्य । कीं मैथुनोर्द्ध्वचि[8] याहुनि काय अन्य ॥ ८ ॥

**एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानो ऽल्पबुद्धयः ॥**
**प्रभवंत्युग्रकर्माणः क्षयाय जगतो हिताः ॥९॥**

प्रत्यक्ष दृष्टि अवलंबुनि मूढ हीच । आत्मत्वहीन

---

१ दैवीसंपत्तीचा. २ दैवी. ३ रीतसर. ४ असाधु. ५ शुद्धता.
६ आपोआप. ७ अन्वयव्यतिरेकयुक्त सगुणनिर्गुणात्मक. ८ मैथुन-
धर्मानें उत्पन्न होणारे.

जन अल्पमतीहि नीच ॥ अत्युग्र–कर्मकर होति जन-क्षेयाला । नारायणारहित नेणुनि तद्भयाला ॥ ९ ॥

**काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः ॥**
**मोहाद्गृहीत्वा सद्ग्राहान्प्रवर्तंते ऽशुचिव्रताः १०**

नोहेचि पूर्ण कधिं काम तदाश्रयानें । होऊनि युक्त मद मानहि दंभ यानें ॥ नारायणाविण दुराग्रह आत्ममोहें । घेऊनि वर्तति जनांत अशुद्ध पाहें ॥ १० ॥

**चिंतामपरिमेयां च प्रलयांतामुपाश्रिताः ॥**
**कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः॥११॥**

चिंता विनाशवारि वाहति जे अपार । कामोपभोगचि जयां पुरुषार्थ थोर ॥ प्रत्यक्ष जो विषय निश्चय तेथ यांचा । नारायणीं पदिं न अल्पहि भाव सांचा ११

**आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ॥**
**ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥१२॥**

आशा गुणें नखशिखांत निबद्ध लोकीं । कोपिष्ट कामसुखलंपट ते विलोकीं ॥ संपादिती विषय लौकिक साधनांतें । नारायणाविण सदा अनयें धनांतें ॥ १२ ॥

**इदमद्य मया लब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ॥**
**इदमस्तीदमपि मे भविष्याति पुनर्धनम् ॥१३॥**

हें लाभलें अजि मला मिळवीन हाही । नारायणाविण

---

१ अल्पबुद्धि. २ जगाचा नाश करण्याला. ३ त्याच्या भयाला. ४ आपल्या. मोहानें. ५ मरेपर्यंत. ६ थोडा देखील. ७ खरा. ८ आशापाशानें. ९ बांधलेला. १० अन्यायानें.

दुजा पुरुषार्थ कांहीं ॥ आहेचि हें मजसि होइल तेंहि माझें । कीं पाहिजे मज पुन्हां धन अन्य जें जें ॥१३॥

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ॥
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी १४

हा आजि म्यां वधियेला रिपु थोर हातें । नारायणासमहि मारिन आणिकांतें ॥ मी ईशें भोगसुखसाधक आणि देव । मी सिद्ध मीच बलवंत सुखी सदैव १४

आढ्यो ऽभिजनवानास्मि को ऽन्यो ऽस्ति सदृशो मया ॥ यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥

नारायणापरिस आढ्यहि मीच धन्य । माझ्यासमान जनिं आणिक कोण अन्य ॥ देईन दान बहु यज्ञ यजीन मोदें । अज्ञानमोहित असे नर तेचि सोदे ॥१५॥

अनेकचित्तविभ्रांताः मोहजालसमावृताः ।
प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरके ऽशुचौ ॥१६॥

ज्यांचें भ्रमोनि मन एक अनेक झालें । जे वेष्टिले सतत सम्यक मोहजालें ॥ नारायणारहित ते विषयोपभोगी । होवोनि घोर नरकीं पडताति वेगीं ॥ १६ ॥

आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ।
यजंते नामयज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम् ॥ १७ ॥

लब्धप्रतिष्ठित उगा फुगल्या मनाचे । कीं व्याप्त चित्त धनमानमदेंहि ज्यांचें ॥ नारायणारहित दांभिक यज्ञ

---

१ मारिला. २ शत्रु. ३ ईश्वर. ४सुखोपभोग भोगणारा ५आनंदानें.

नामें । गा होमिती अविधिपूर्वक ते रिकामे ॥१७॥

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ।**
**मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः॥ १८ ॥**

मस्ती अहंकृति सगर्वहि काम कोप । नारायणाविण मनीं धरिती अमूप ॥ जे मत्सरी अपुलियाहि परा शरीरीं । गा द्वेषिती मजसि दुर्जन तेचि भारी ॥ १८ ॥

**तानहं द्विषतः क्रूरान् संसारेषु नराधमान् ।**
**क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥१९॥**

मी द्वेषिती मजसि निर्दय जे तयांतें । संसार संकटीं सदा पुरुषाधमातें ॥ लोटीतसें अशुभ आसुरि योनिं-माजीं । नारायणाविण अजस्त्र जगत्समाजीं ॥ १९ ॥

**आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ।**
**मामप्राप्यैव कौंतेय ततो यांत्यधमां गतिम्॥२०॥**

ते मूर्ख आसुरि अशी गति पावणारे । प्रत्येक जन्मि अघसंसृति सेविणारे ॥ नारायणाप्रति मला नाचि पाव-तांना । जातात कुंतितनयों अधमा गतींना ॥ २० ॥

**त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ॥**
**कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् २१**

नारायणारहित हीं नरकार्तिचीं रे । द्वारें निजात्मसुख-नाशक त्रिप्रकारें॥गा काम कोप मनिं लोभ तसाचि जा-ण । हे टाकणें बुधजनीं ह्मणऊनि तीन ॥ २१ ॥

---

१ अहंकार. २ आपल्या. ३ दुसऱ्याच्या. ४ पापरूपी संसार. ५ अर्जुना ६ नरकदुःखाचीं ७ आपलें आत्मस्वरूप. ८ ज्ञाते लोकांनीं

**एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ॥ आ-**
**चरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् २२**

या सूटला नर तिही नरकार्तिदारां । पासूनि जो स-
तत कुंतिसुता उदारा ॥ तो आचरे स्वहित कार्य निज-
स्वभावें । नारायणाख्य परमा गतिलागिं पावे ॥ २२ ॥

**यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ॥**
**न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् २३**

जो वर्ततो विहित शास्त्रविधी त्यजोनी । नारायणा-
रहित काम बळें सजोनी ॥ संसिद्धिला नर न तो कस-
ल्याहि पावे । नाहीं तया सुख न सद्गति भक्तिभावें २३

**तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ॥**
**ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि २४**

शास्त्र प्रमाण तुजला म्हणऊनि आहे । गा कार्य आ-
णिक अकार्य विचारितां हें ॥ जाणोनि शास्त्रविधि तूं
तरि योग्य येथें । नारायणोक्त निजधर्म करावयातें २४

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां यो-**
**गशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभाग-**
**योगो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥**

श्रीमान्षड्गुणवंत कृष्ण भगवद्गीता श्रुती सार हे ।
योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥

---

१ अर्जुना. २ नारायण नामक. ३ सोडून. ४ सम्यक् प्रकारानें सिद्धीला. ५ विचार करितांना. ६ वेदोक्त. ७ अर्जुनाला. ८ सो-ळाव्यांत.

दैवी आसुर संपदा कथि नरा जो षोडशीं तेचि तो।
या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो॥१६॥

श्रीमन्नारायणार्पणमस्तु.

# सप्तदशाध्यायप्रारंभः

## अर्जुन उवाच.

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजंते श्रद्धयान्विताः॥
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः १

जिष्णू[१] ह्मणे त्यजुनि शास्त्रनियुक्त[२] पंथ। जे भक्तिनें-
चि यजिती तुजलागिं संत॥नारायणा कवण ती ह्मणणें
तयांची। निष्ठा सुसत्त्वगुणि राजस[३] कीं तमाची॥ १ ॥

## श्रीभगवानुवाच

त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा॥
सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु २

नारायण[४]प्रभु वदे त्रिविध स्वभावें। जीवांसि भक्ति
घडते त्रिगुणात्म[५]भावें॥ गा सात्विकी तसिच राजस ता-
मसीही। ऐसी त्रिधा[६] कथितसें तुज ऐक तीही॥ २ ॥

सत्त्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत॥ श्र-
द्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः॥३॥

सत्त्वानुरूप[७] सकळांप्रति भक्ति होते। नारायणीं त्रि-

---

१ अर्जुन. २ विधियुक्त. ३ रजोगुणी किंवा तमोगुणाची. ४ श्रीकृष्ण. ५ गुणयुक्त अहंभावानें. ६। ८ तीन प्रकारची. ७ जसें जितक सत्त्व असेल त्याप्रमाणें.

गुण ती तुज भारतातें ॥ मी सांगतों समज जो नर भक्ति-
मान । यद्भक्तिनें, स्वमनिं तो तरि तोंचि जाण ॥ ३ ॥

**यजंते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ॥**
**प्रेतान् भूतगणांश्चान्ये यजंते तामसा जनाः ४**

सात्विकि ते यजिति देवगणांस पाहीं । कीं यक्ष रा-
क्षसाचि राजस लोक तेही ॥ गा प्रेत भूतगण आणि
पिशाचजाती । नारायण त्यजुनि तामस पूजिताती ४

**अशास्त्रविहितं घोरं तप्यंते ये तपोजनाः॥ दंभा-**
**हंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥**

शास्त्रप्रणीत न असें करिताति घोर। नारायणारहित
जे जन थोर थोर ॥ दंभें अहंकृतिबळें तप कामवेगें ।
प्रीती धरोनि विषयांत सकामयोगें ॥ ५ ॥

**कर्षयंतः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ॥ मां चै-**
**वांतःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥६॥**

जे पीडिती निजतनुस्थित पंच भूतें । तैसेचि पीडिति
विमूढमती जगातें ॥ नारायणासि मजही हृदयस्थिताला ।
या त्यांचिया समज आसुर निश्चयाला ॥ ६ ॥

**आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ॥**
**यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥७॥**

आहारही सकळिकांप्रति जाण आतां । होती प्रिय-
त्रिविध गा अभिमन्युताता ॥ तैसेच यज्ञ तप दान विभाग
त्यांचे । नारायणोक्त अजि आईक हे स्वमताचे ॥ ७ ॥

---

१ आपल्या शरीरांतील २ मूर्ख ३ अर्जुना ४ वेदवाक्य. ५ माझे मताचे.

**आयुःसत्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ॥ रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः ८**

आरोग्य आ[1]यु अ[2]नुरागहि सत्त्व शक्ती । ना[3]रायणोक्त सुख वाढविणार भक्ती ॥ स्निग्ध प्रमो[4]दकर जे रसयुक्त सोचे । आहार ते सुखद सुस्थिर सात्विकांचे ॥ ८ ॥

**कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरुक्षविदाहिनः ॥ आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥९॥**

जे क्षा[5]र अंबट कडू अति उष्ण तैसे । नारायणारहित दाहक रुक्ष ऐसे ॥ आहारही तिखट ते प्रिय राजसांना । देणार दुःख-गंद-शोक-भयांसि नाना ॥ ९ ॥

**यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ॥ उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥ १० ॥**

गेले जयावरुनि याम असेंचि पाहीं । जालें रसारहित जें विटलें शिळेंही ॥ उच्छिष्ट आणि अपवित्र कदन्न कीं तें । नारायणाविण वृथा प्रिय तामसांतें ॥ १० ॥

**अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ॥ यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः ॥ ११ ॥**

ना इच्छितां फलहि जे यजिताति यज्ञ । नारायणोक्त विधि जाणुनि संत सुज्ञ ॥ कर्तव्यकर्मचि अस

---

१ आयुष्य. २ प्रीति. ३।११ वेदोक्त. ४ आनंद. ५ खरे. ६ खारट. ७।१० निकस. ८ रोग. ९ प्रहर.

स्वमनीं धरोनी। तो सात्विक क्रतु पहा मजला स्मरोनी ११

**अभिसंधाय तु फलं दंभार्थमपि चैव यत् ॥**
**इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम्॥१२॥**

संधान ठेवुनि फळींहि तसेंच ढोंगें । नारायणस्मरणशील करोनि सोंगें ॥ जें अर्जुना यजिति मानव थोर सान । तो यज्ञ राजस रजोगुणयुक्त जाण ॥ १२ ॥

**विधिहीनमसृष्टान्नं मंत्रहीनमदक्षिणम् ॥**
**श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १३ ॥**

नारायणोक्त विधिमंत्र विधान नाहीं । ना अन्नशांति नचि सम्यक दक्षिणाही ॥ श्रद्धा मनीं नसुनि मानव जें यजीती । तो यज्ञ तामस सदा बुधें बोलताती ॥१३॥

**देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् । ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥**

ज्ञानी सुरें द्विजें गुरू जनिं पूज्य-बुद्धी। लोकीं अवक्रपण अंतरिं चित्तशुद्धी ॥ गा ब्रह्मचर्यहि अपीडक भाव पाहें । नारायणोक्त तप कायिक बोलती हें ॥ १४ ॥

**अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ॥**
**स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते१५**

कीं त्रासदायक नसोनिहि सर्व सत्यें। सद्वाक्य जें हित-

---

१ यज्ञ. २ हरिभक्तीची. ३।१० वेदोक्त. ४ मक्ति. ५ ज्ञाते ६ ज्ञानवान्. ७ देव. ८ ब्राह्मण. ९ वांकडेपणा नसणें. ११ शरीराचें. १२ खरें.

कर प्रिय आणि नित्य[1] ॥ स्वाध्याय–अध्ययन धार्मिक भक्तिभावें । नारायणोक्त[2] तप वाचिक[3] हें ह्मणावें॥१५॥

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ॥
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥१६॥

राहे प्रसन्न मन नम्रपणाहि मौन । योगें स्ववृत्ति[4]-बल–निग्रह तेविं जाण ॥ नारायण स्मरुनि[5] सम्यक भाव शुद्धी । हें मानसीक[6] तप या परि सुप्रसिद्धी ॥ १६ ॥

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः ॥ अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते ॥१७॥

केलें असे परम कीं दृढ भक्तिभावें । जें मानवीं तपहि तें त्रिविध स्वभावें ॥ निष्कामतायुत[7] सुखें विधियुक्त होतें । नारायण स्मरुनि सात्विक बोलती तें॥१७॥

सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत् ॥ क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १८ ॥

इच्छूनि मान मनिं आदर–पूजनातें । दंभें करोनि तप जें करिताति येथें ॥ वाखाणिलें चपल[8] राजस तें स्वभावें । नारायणाविण अशाश्वत सर्व भावें ॥ १८ ॥

मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ॥
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥१९॥

---

१ शाश्वत २ वेदोक्त ३ वाचेचें ४ अहंवृत्तीच्या बळाचा ५ ईश्वरनामस्मरणानें ६ मनाचें ७ निष्कामपणानें ८ अस्थिर.

नारायण त्यजुनि मूढ दुराग्रहानें । पीडूनिया स्वतंनु जें तप निग्रहानें ॥ इच्छोनि नाश अथवा परकी नरांचे। वाखाणिलें करिति तें तप तामसांचें ॥ १९ ॥

**दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ॥ देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् २०**

देणें असे विहित या मतिनेंचि दान । देती जनीं अनुपकारकिं, सद्विधान ॥ कीं देशकालयुंत पात्र बघूनि उक्तें । नारायणोक्त तरि सात्त्विक तें सुयुक्त ॥ २० ॥

**यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ॥**
**दीयते च परिक्लिष्टं तद्राजसमुदाहृतम् ॥ २१ ॥**

इच्छूनिया फलहि प्रत्युपकार यातें ॥ नारायणारहित जें अथवा पुन्हां तें ॥ मानोनि कष्ट जनरीति बळेंचि देती । तें दान सुज्ञजन राजस बोलताती ॥ २१ ॥

**अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ॥**
**असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥**

जें देशकाल नसतां अविचाररीती । सत्पात्रही न बघतां भलत्यासि देती ॥ नारायणोक्त न कळोनि अनादरानें । तें दान तामस सदा वदती शहाणे ॥ २२ ॥

**ओंतत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ॥**

---

१ आपलें शरीर २ योग्य कर्तव्य. ३ उपकारक नव्हे अशा ठायीं ४ वैदिक विधीनें युक्त ५ योग्य ६ वेदांनीं वर्णिलेलें ७ उपकाराचा मोबदला ८ वेदवाक्य

**ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा २३**

ॐ तत् तसोंचि शुभ सत्पद या खुणेनें। नारायणेत्व[1]-
हि असे त्रिविध प्रमाणें ॥ गा[2] ब्राह्मण प्रकट वेदहि आ-
णि तेणें । संयुक्त सद्विहित यज्ञ विधी पुराणें॥ २३ ॥

**तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ।**
**प्रवर्तंते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् २४**

या कारणें प्रथम सर्वहि ओं ह्मणोनी । यज्ञ क्रिया
तपहि दान धियें[3] अजोनी ॥ नारायणोक्त जनिं वर्तति
वैदिकांच्या। जे ब्रह्मवादि[4] विधिपूर्वक नित्य त्यांच्या २४

**तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः ।**
**दानक्रियाश्च विविधाः क्रियंते मोक्षकांक्षिभिः २५**

तें ब्रह्म वर्णुनि सदोदित तत्पदानें । इच्छा न ठे-
वुनि फळीं करिताति दानें ॥ यज्ञ क्रिया विविध आणि
तपक्रिया ही । नारायण स्मरुनि सुज्ञ मुमुक्षु पाहीं॥२५॥

**सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ॥**
**प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते २६**

सत्यत्व[5] आणि मनिं साधुपणा तयाला । सच्छब्द हा
शुभ पुरातनिं[6] योजियेला ॥ नारायणोक्त असकाम[7] सुक-
र्मिंही तो। सच्छब्द तेविं सखया जनिं योजिजेतो[8]॥२६॥

**यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते॥**
**कर्म चैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥२७॥**

---

१ ईश्वरत्व. २ बुद्धि. ३ वेदोक्त. ४ ईश्वरवादी. ५ खरेपणा. ६ पूर्वीच्या पूर्वजांनी. ७ निष्काम. ८ योजिला जातो.

ओंकारयुक्त तप दान मखीं तयांचीं । सत्त्वें स्थिती जगतिं वर्णिति भाविकांची ॥ नारायणार्थक सुकर्महि सत्पदार्थें । सत्कर्म बोलति कवी श्रुतिशास्त्रकर्ते ॥२७॥

**अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ॥**
**असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह २८**

श्रद्धा मनीं नसुनि जें यजिलें दिलेंही । केलें तपोनि तप वा कृत कर्म कांहीं ॥ नारायणाविण असत् ह्मणताति तेंची । मेल्यां जितेपणिं निरर्थक सव्यसाची ॥ २८ ॥

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्यायः॥१७॥**

श्रीमान् षड्गुणवान कृष्ण भगवान् गीता श्रुती सार हें। योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥ सत्राव्यांत पृथासुतासि वदला श्रद्धा त्रिधा तेचि तो। या चिंतामणिनंदनाननिं हरी टीकामिसें बोलतो ॥१७॥

---

१ यज्ञाचे ठायीं. २ सत्पणानें. ३ सत्पदाच्या अर्थानें. ४ वेद शास्त्रकर्ते. ५ भक्ति. ६ पूजिलें, होमिलें. ७ अर्जुना.

# अष्टादशाध्यायप्रारंभः

॥ अर्जुन उवाच ॥

संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ।
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १ ॥

नारायणा विनवि पार्थ महाभुजातें । संन्यासतत्त्व कळण्यास्तव ओस मातें ॥ जो त्यागही वदति तत्त्व पृथक् तयांचें । तूं केशिसूदन कथीं मजलागिं सांचें ॥१॥

श्रीभगवानुवाच

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ॥
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥

नारायण प्रभु वदे कवि काम्य कर्मे । संन्यास तो वदति सांडिलियां स्वधर्मे ॥ सर्व क्रियाफल समर्पुनि सांडिताती । तो त्याग यापरि विचक्षण बोलताति ॥ २ ॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ॥
यज्ञदानतपःकर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥

गा त्याज्य यापरि सदोषचि सर्व कर्म । धीमंत एक वदती निजसांख्य वर्म ॥ नारायणोक्त निज यज्ञ तपक्रियाही । ना टाकणें अपरं हें ह्मणताति कांहीं ॥ ३ ॥

---

१ श्री कृष्णाला. २ इच्छा. ३ केशीदैत्याचा नाश करणारा. ४ खरें. ५ ज्ञाते. ६ टाकण्यास योग्य असें. ७ बुद्धिमंत. ८ आत्मज्ञानाचें तत्त्व. ९ वेदोक्त. १० दुसरे.

**निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ॥ त्या-**
**गो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥४॥**

त्यागीं[1] तया मम सुनिश्चय आयकें तूं । नारायण प्रणत भारतवंशकेतू ॥ तो त्यागही नरवेरा[2] त्रिविध प्रकारें । वाखाणिला विधिमुखें[3] निगमीं[4] निका[5] रे ॥ ४ ॥

**यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ॥**
**यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥५॥**

ना यज्ञ दान तपकर्म कधीं त्यजावें । नारायण स्मरुनि तेंचि करीत जावें ॥ टाकूं नये मख[6] तपादिक दान कर्में । तीं पावनें ह्मणुनि सुज्ञजनीं स्वधर्में ॥ ५ ॥

**एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ॥**
**कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ ६ ॥**

ऐसींच हीं विहित सर्व परंतु कर्में । सांडूनि संग फलही करणें स्वधर्में ॥ कर्तव्य जाणुनि, असें मत नित्य माझें । नारायणोक्त[7] अतिउत्तम अर्जुना जें ॥ ६ ॥

**नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ॥**
**मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ७**

जें नित्यकर्म निगमोदित[8] गा तयाचा । संन्यास मत्स्मृतिपथें[9] न घडेचि साचा ॥ नारायण त्यजुनिया करितां स्वमोहें[10] । तो त्याग तामस असें श्रुति बोलताहे ७

---

१ त्यागाविषयीं २ अर्जुना. ३ ब्रह्मदेवाच्या मुखानें ४ वेदांत. ५ निश्चित. ६ यज्ञ ७ वेदोक्त. ८ वेदोक्त. ९ माझ्या शास्त्रमार्गानें. १० आत्ममोहानें.

**दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ॥**
**स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ८**

हें दुःखदायक असें समजोनि लोकीं । शारीर कष्ट-भय मानुनि कर्म टाकी॥ तो त्याग राजस करूनि असा स्वभावें । नारायणोक्त[1] फल निर्मल गा न पावे ॥ ८ ॥

**कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ॥**
**संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्विको मतः ९**

कर्तव्य हें विहित मानुनि कर्म नित्य । नारायणप्रियसख्या[2] करितांच सत्य ॥ सांडोनि उक्तफलिं[3] आवड संग आणी । तो त्याग सात्विक सुसंमत गा पुराणीं ९

**न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ॥**
**त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः १०**

न द्वेषि जो असुखकारक कर्म तेंही । जें सौख्यकारक तिथें न जडोनि राहीं ॥ त्यागी महाविर्मल[4] सत्त्वगुणी पसंत । नारायणेष्ट[5] गतसंशय[6] बुद्धिमंत ॥ १० ॥

**न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ॥**
**यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ११**

नारायणात्मक जरीहि तथापि देही[7]। टाकावया सकल कर्म समर्थ नाहीं ॥ सांडी क्रियाफलचि[8] अर्पुनि[9] जो सुभक्त । त्यागी तया ह्मणति तें ह्मणणें सुयुक्त॥ ११ ॥

---

१ वेदोक्त २ अर्जुना. ३ वर्णिलेल्या फलाचे ठायीं. ४ निर्मल. ५ ईश्वरप्रिय ६ गेला आहे संशय ज्याचा असा ७ देहधारी प्राणी. ८ कर्माचें फल. ९ ब्रह्मार्पण करून.

**अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलं ॥भव-**
**त्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥१२**

नारायणोक्तचि[1] प्रियाप्रिय मिश्र आहे । तें होतसें त्रिविध कर्मफल[2] प्रवाहें । अत्यागियांसि[3] परलोकिं, तशा स्वरूपें । संन्यासियांसि न कधींहि परंतु लिंपे ॥१२॥

**पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ॥**
**सांख्ये कृतांते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् १३**

हीं कारणें असति पांच सुभव्य[4] साचीं[5] । तीं ऐक तूं मजचि पासुनि सव्यसाची[6] ॥ वेदांत सांख्यपथिं वर्णिलिं मींच ओठीं । नारायणें सकल कर्मसुसिद्धिसाठीं ॥१३॥

**अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ॥**
**विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् १४**

कीं क्षेत्र आणिक अहंकृतिरूपकर्ता[7] । तैसा पृथग्विध दशेंद्रियसंघ[8] पुर्ता ॥ व्यापारही विविध आणिक दैव येथें । नारायणोक्त बलवत्तर पांचवें तें ॥ १४ ॥

**शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः । न्या-**
**य्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥१५॥**

देहें[9] तसेंचि वचनेंहि[10] मनें[11] करोनी । आरंभितो पुरुष जो निजकर्म कोणी ॥ नारायणोक्त[12] अथवा विपरीत येथें । हीं कारणें असति पांच बलिष्ठ त्यातें ॥ १५ ॥

---

१ वेदोक्त. २ कर्माचें फल. ३ त्याग न करणारास. ४ मोठी प्रसिद्ध. ५ खरी. ६ अर्जुना. ७ अहंकाररूपी. ८ समुदाय. ९ देहानें. १० वाणीनें. ११ मनानें. १२ वेदोक्त.

**तत्रैवं सति कर्त्तारमात्मानं केवलं तु यः ॥**
**पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः १६**

तेथें असें असुनि जो नर मूढ पुर्ता। आत्मा असंग-
चि तयाप्रति कर्मकर्ता ॥ पाहे असंस्कृतें अजाण
म्हणोनि बुद्धी। नारायण प्रकृति तो न बघे कुबुद्धी १६

**यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ॥**
**हत्वाऽपि स इमाँल्लोकान्न हंति न निबद्ध्यते १७**

कर्मी अहंपण नसोनिहि बुद्धि ज्याची। नारायण त्यजु-
नि लिप्त फळीं नसेची ॥ तो हे वधूनि जन सर्व कधींच
कांहीं। नाहींच मारित निबद्धहि होत नाहीं ॥ १७ ॥

**ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ॥**
**करणं कर्म कर्त्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥१८॥**

गा ज्ञान ज्ञेय जगतांतिल जाणताही । नारायणीं
त्रिविध कर्मप्रवृत्ति पाहीं ॥ साहित्य कार्य करणार अ-
सा त्रिधाच। हा कर्मसंग्रह असे ह्मणऊनि साचें १८

**ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ॥**
**प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि १९**

तें ज्ञान कर्महि तसा करणार आंगें। नारायण त्रिविध
मी गुणभेदयोगें ॥ गा सांख्यशास्त्रयुत वर्णिन की-
शकेतू। प्रेमें यथास्थित तया तरि आयकें तूं ॥ १९ ॥

---

१ जिला ज्ञानसंस्कार नाहीं ती. २ माया. ३ खरा. ४ वानर-
ध्वजा अर्जुना.

**सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ॥ अवि-**
**भक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम् २०**

जेणें बघे विमेल भाव समस्त भूतीं। गा एक अव्यय सनातन आत्मता ती ॥ नारायणात्मक अभिन्नचि भिन्न देहीं। तें ज्ञान सात्विक सुमंगल जाण तूंही ॥२०॥

**पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान् पृथग्विधान्॥**
**वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम्॥२१**

जें ज्ञान गा करुनि भिन्नपणें तनाना ॥ नारायणाविण पृथग्विध भाव नाना ॥ जाणे अनेकपरि नित्य समस्त भूतीं। तें ज्ञान राजस असें समजें स्वचित्तीं ॥ २१ ॥

**यत्तु कृत्स्नवदेकस्मिन् कार्ये सक्तमहेतुकं ॥**
**अतत्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥**

जें ब्रह्म कारणचि सर्व तया समान ॥ मानोनि एक लघु कार्य तयांत लीन ॥ नारायणाविण यथार्थ न, जें वृथैव ॥ गा ज्ञान तें समज तामस तूं सदैव ॥ २२ ॥

**नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतम् । अफल-**
**प्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते ॥ २३ ॥**

कर्तृत्वसंगपरिवर्जित नित्य चाळे । इच्छा तिरस्कृति मनांत नसोनि केले ॥ ना इच्छितां फलहि जें समजोनि धर्म। नारायणोक्त तरि सात्विक तेंचि कर्म॥२३॥

---

१ निर्मल. २ अविनाश. ३ भेदरहित. ४ निरनिराळ्या देहांत ५ द्वैतभावानें. ६ निरनिराळे. ७ पुष्कळ. ८ अनेक प्रकारचे. ९ वेदोक्त.

यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ।
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥

जें का जगाद्विषय[1] इच्छुनि कर्म होतें । कर्तृत्वभाव धरुनी अथवा पुन्हां तें ॥ नारायणाविण करी बहु कष्ट सोसें । वाखाणिलें निगमिं[2] राजस तेंचि ऐसें ॥ २४ ॥

अनुबंधं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम् ।
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥२५॥

होणार कार्य[3] पुढतीं, क्षय आणि पीडा । ना पाहतां निजपराक्रम फार थोडा ॥ आरंभिलें विविध कर्म विमूढ[4]-भावें ॥ नारायणारहित तामस तें ह्मणावें ॥ २५ ॥

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः।सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्ता सात्विक उच्यते ॥२६॥

ज्यातें अहंपण न, जो फलसंगमुक्त ॥ उत्साह-धैर्य-समवेत महाविरक्त ॥ नारायणीं समचि सिद्धि-असिद्धि-माजी ॥ कर्ता अगा वदति सात्विक तो समाजीं ॥२६॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ।
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः २७

कामी स्वकर्मफल अंतरिं इच्छिणारा । लोभी तसा अशुचि[5] हिंसक[6] पार्थवीरा ॥ जो हर्षशोकयुत[7] वर्णियला अपुर्ता । नारायणारहित राजस तोचि कर्ता ॥२७

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः॥

---

१ जगांतले विषय २ वेदांमध्यें. ३ ह्मा अनुबंध ४ मूर्खपणानें.
५ अशुद्ध. ६ पीडा करणारा. क्रूर. ७ हर्षशोकयुक्त.

**विषादी दीर्घसूत्री च कर्त्ता तामस उच्यते ॥२८॥**

लोकीं अयोग्यहि अशिक्षित[1] दुष्ट नष्ट । जो स्तब्ध गर्वित सदा कपटैकनिष्ठ ॥ द्वेषी महा, फुकट हेकट कर्म कर्ता । नारायणीं विमुख तामस तो सपुर्ता[2] ॥२८॥

**बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु । प्रोच्य-मानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥**

गा बुद्धिचे त्रिविध भेद तसे धृतीचे । सांगेन ते सकल आइक मन्मुखींचे ॥ नारायणोक्त[3] गुणयुक्त पृथक्पणानें । जे जाणसीलचि धनंजय तूं मनानें ॥ २९ ॥

**प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ॥ बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी ॥३०**

जाणे प्रवृत्ति जनिं आणि निवृत्ति तैसी । जी कार्य आणिक अकार्य भयाभयांसी । ते बंध मोक्ष समजे स्फुट[4] जी हितार्था । नारायणोक्तमति सात्विक तीच पार्था ३०

**यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ॥ अ-यथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ३१**

गा धर्म आणिक अधर्म जिणें पवित्ता । तैसें अकार्य निजकार्यहि कुंतिपुत्ता[5] ॥ जाणे खरें न कळतां भलत्या प्रकारें । नारायणारहित राजस ती मती रे ॥ ३१ ॥

**अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसा वृता ॥ सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ३२**

जो कां अधर्मचि तयाप्रति धर्म मानी । जी आणि

---

१ अविद्वान. २ पूर्णपणानें. ३ वेदोक्त. ४ स्पष्ट. ५ अर्जुना.

वेष्टितें सदैव तमोगुणांनीं ॥ नारायणोक्त सकलार्थ वि-रुद्ध दावी । ती बुद्धि तामस पृथातनया वदावी ॥३२॥

**धृत्या यया धारयते मनःप्राणेन्द्रियक्रियाः ॥ योगे-नाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी ॥ ३३**

कीं ज्या धृतीकरुनियां धरिजे नरांनीं । प्राणक्रिया दृढ मनेंद्रियकर्म आणी ॥ नारायणात्मक अनन्य सुभ-क्तिभावें । ती सात्विकी धृति पृथातनया स्वभावें ३३

**यया तु धर्मकामार्थान्धृत्या धारयतेऽर्जुन । प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी ३४**

धर्मार्थ काम अति सत्वर ज्या धृतीनें । नारायण-प्रिय सख्या धरिजे मतीनें । इच्छोनि कर्मफल कायिक भोगसंगें । ती अर्जुना धृति रजोगुणयुक्त अंगें ॥३४॥

**यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ॥ न विमुंचाति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ३५**

धैर्यें जया विषमता भय झोंप दुःख । तैसेंचि खेद मद हे अविचार देख ॥ सोडीचना कुमति ती धृति तामसाची ॥ नारायणाविण अमंगल सव्यसाची ॥३५॥

**सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ ॥ अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति ३६**

नारायणोक्त सुखही त्रिविध प्रकारें । माझ्या मतें श्र-वण तूं कारि भारता रे ॥ अभ्यासयुक्त नर जेथ रमे

---

१ गुंडाळलेली. २ उलट. ३।६ अर्जुना ४ द्वैतभाव नाहीं अशा एक. ५ धैर्यवृत्ति. ७ शारीरिक. ८ अर्जुना. ९ वेदोक्त.

स्वभावें । संसारदुःखभयनाशक वृत्ति पावे ॥३६॥

**यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ॥**
**तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ३७**

दृष्टीपुढें प्रथम थोर[1] असह्य थाटे । जें सेवितां अनुभवे अति[3]गोड वाटे ॥ आत्मप्रसादभव सात्विक सूख तेंची । नाराय[4]णोक्त निगमोक्तहि स[6]व्य[5]साची ॥ ३७ ॥

**विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ॥**
**परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥३८॥**

आधीं जगांत विषयेंद्रियसंगतीनें । जें आवडे अमृततुल्य अस[7]न्मतीनें ॥ नारायणाविण विषासम शेवटीं तें । गा राजसी सुख सदैव जिवासि होतें ॥ ३८ ॥

**यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ॥**
**निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९॥**

आरंभिं आणिक पुढें फलबंधनीं ही । नारायणारहित जें मतिलागिं मोही ॥ झोंपेंत जें घडतसे अळसें[8] प्रमादें[9] । तें तामसी सुख अजाण जनांत नांदे ॥३९॥

**न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ॥**
**सत्त्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥४०**

पृथ्वींत तें न अथवा नचि देवलोकीं । तैसें कदा सुरजनीं न पुन्हां विलोकीं ॥ जें सत्त्व या प्रकृतिच्या त्रिगुणां[10] विभक्त । नारायणप्रिय असें ह्मणती सुभक्त ४०

---

१ विषासारखें. २ उमें राहतें. दिसतें. ३ अमृताप्रमाणें. ४ मीं सांगितलेलें भाषण. ५ वेदवाक्य. ६ अर्जुना. ७ अज्ञानानें. ८ आळसापासून. ९ प्रमादानें. १० मायेच्या तिन्ही गुणांहून.

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ॥
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ४१

पार्थो अशींच जगिं ब्राह्मण-क्षत्रियांचीं ॥ गा वैश्य जे असति शूद्र तसे तयांचीं ॥ कर्में पृथग्विधचि वर्तति भिन्न भावें ॥ नारायणप्रकृतिच्या त्रिगुण स्वभावें ४१

शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ॥
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ४२

नारायणोक्त शमही दमें आणि शौचें । लोकीं क्षमा तप अवक्रपणा तसाच ॥ ज्ञान स्वयें अनुभवासह आस्तिकत्व । हें जाण गा सहज ब्राह्मण–कर्म–तत्त्व ४२

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनं ॥
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ४३

शूरत्व तैजसपणा धृति धूर्तताही । युद्धीं कधींच अपराक्रमवृत्ति नाहीं ॥ नारायणीं भरंवसा जनिं दान धर्म । हें क्षत्रियांप्रति असे सहज स्वकर्म ॥ ४३ ॥

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ॥
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ४४

शेती वणिक्पणहि रक्षण गोधनांचें । वैश्यस्वकर्म सहजीं क्रयविक्रयांचें ॥ शूद्रासि तीनहि जगीं वर वर्ण यांचें । नारायण स्मरुनि सेवन कर्म सांचें ॥ ४४ ॥

---

१ निरनिराळीं. २ मायेच्या. ३ वेदोक्त. ४ मनाचा निग्रह. ५ इंद्रियनिग्रह. ६ आचारशुद्धि. ७ लोकप्रियपणा. ८ वाणीपणा. ९ श्रेष्ठ. १० खरें.

**स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ॥**
**स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ४५**

आपापल्या रत सदोदित शुद्ध कर्मीं । पावे सुसिद्धि नर तत्पर आत्मधर्मीं ॥ सिद्धि स्वकर्मरत आइक केविं पावे । नारा[1]यणप्रियसख्या सहज स्वभावें ॥ ४५ ॥

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ॥**
**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ४६**

जेथूनियां पसरली त्रि[2]जगत्प्रवृत्ती ॥ जेणेंचि हें सकल व्यापियलें स्ववृत्ती ॥ नारायण स्मराणिं पूजुनि तो स्वकर्में । पावे निजात्मसुखसिद्धि मनुष्य धर्में॥४६॥

**श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥**
**स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ४७**

कल्याणकारकचि गौण तरी स्वधर्म । संपूर्ण सांग करण्याहुनि अन्यै[3] कर्म॥ वर्णाश्रमोक्त करितां निज कर्म भावें । नारा[4]यणप्रियसख्या अघ तो न पावे ॥ ४७ ॥

**सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् ॥**
**सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥४८॥**

व[5][6]र्णाश्रमें सहज जें निजकर्म होतें ॥ पार्था सदोषहि तरी नच टाकणें तें ॥ कीं वेष्टिलें सकल कर्महि कल्मैं-षानें । नारायणांश बघ अग्नि जसा धुरानें ॥ ४८ ॥

**असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ॥**

---

१।४ माझ्या प्रिय सख्या अर्जुना. २ त्रैलोक्य. ३ दुसऱ्याचें. ५ वर्णाश्रमधर्मानें. ६ दोषानें.

नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ४९

जो कां समस्त विषयांत असक्तबुद्धी । ज्या न स्पृहा विजितचित्तहि जो सुबुद्धी । नारायण स्मरुनि तो नर मोक्ष-सिद्धि । संन्यास हा करुनि पावतसे प्रसिद्धी ॥ ४९ ॥

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ॥
समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ५०

नैष्कर्म्यसिद्धि नर पावुनि ब्रह्म पावे । जैसा तसीहि मजपासुनि ऐक भावें ॥ संक्षिप्त यापरि पृथातनया वरिष्ठा । नारायणोक्त शुभ जी निजबोधनिष्ठा ॥ ५० ॥

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ॥
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ५१

निष्काम शुद्ध मतिनें धृतिनेंचि गा हें । नारायणाख्य पदिं योजुनि चित्त राहे ॥ शब्दादि सांडुनि जगद्विषयौघ पांच । जे क्रोधकामहि तसे स्वविरुद्ध साचे ॥ ५१ ॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ॥
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥५२॥

एकांत सेवि, लघु अल्प सदन्न जेवी । वाणी शरीर मनही नियमोनि ठेवी ॥ गा ध्याननिष्ठचि सदोदित आत्म-योगी । नारायणप्रणत संतत जो विरागी ॥ ५२ ॥

---

१ ज्याला २ गरज ३ मन जिंकिलेला. ४ मोक्ष. ५ अर्जुना. ६ वेदोक्त. ७ आत्मज्ञानाची स्थिति. ८ धैर्यानें. ९ नारायणनामक ब्रह्म. १० आपल्या विरुद्ध. ११ खरें. १२ हलकें. १३ थोडें. १४ सात्विक अन्न. १५ ईश्वरभक्त. १६ सतत, नेहमीं.

**अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ॥ विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते ॥५३॥**

सोडुनि पौरुष[1] अहंकृति गर्वरूप । आशा परिग्रह[2] मनांतिल काम कोप ॥ नारायणोक्त[3] ममताहि सुशांत होतो । ब्रह्मत्वयोग्य सखया पुरुष स्वयें तो ॥ ५३ ॥

**ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ॥ समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥५४॥**

जो ब्रह्म होउनि प्रसन्नपणें महात्मा । कांहीं न इच्छि नचि शोक करीहि, आत्मा ॥ नारायण स्मरुनि तो सम सर्व भूतीं । पावे प्रगल्भ मम भक्ति अनन्य जी ती ५४

**भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ॥ ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥५५॥**

त्या भक्तिनें समजतो सकलस्थ मातें । जो तत्त्वतां अणि जसा जितुका तयातें ॥ जाणोनि तत्त्व मग तो शिरतो स्वरूपीं । नारायणीं स्वपणिं अंतिं अभेदरूपीं ५५

**सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ॥ मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥५६॥**

दैवें सदोदित जरी करि सर्व कर्मे । माझाचि आश्रय करूनि तरी स्वधर्मे ॥ तो पावतो स्वपद शाश्वत मत्प्रसादें[7] । नारायणात्मक सदव्यर्य आत्मबोधें ॥ ५६ ॥

---

१ पराक्रमाचा अहंकार. २ संसारसंग. ३ वेदांत वर्णन केलेली. ४ सर्वांतर्यामी. ५ आत्मरूपीं. ६ आत्मपद. ७ माझ्या प्रसादानें. ८ सत्य व अविकारी. ९ आत्मज्ञानानें.

**चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ॥**
**बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥५७॥**

सारे सख्या! दृढमनें निजकर्म तंतू। मातें समर्पुनिच मत्पर होउनी तूं ॥ नारायणप्रिय उपासुनि बुद्धियोगा। मच्चित्तें हो सतत शुद्ध धनंजयां गा ॥ ५७ ॥

**मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ॥**
**अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनंक्ष्यसि ५८**

मच्चित्त तूं सकळ संसृतिचीं स्वबोधें। दुर्गें चढोनि तरशील मम प्रसादें ॥ आतां न ऐकसि जरीहि अहंकृतीनें। नारायणोक्त तरि पावसि नाश तेणें ॥ ५८ ॥

**यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ॥**
**मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति॥५९॥**

स्वाहंकृती धरुनि मानसिं आणि मोहा। जें मानिसी न करिं युद्ध असा तुझा हा ॥ नारायणाराहित निश्चय व्यर्थ वाटे। योजील गा तुज तुझी प्रकृतीच नेटें ॥५९॥

**स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ॥**
**कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ६०**

नारायणप्रिय पृथातनया सुधर्मं। वर्णाश्रमें असति बद्ध सदा स्वकर्में ॥ यालागिं जें न करुं इच्छिसि आत्ममोहें। तें युद्ध तूंच करिशील अवश्य गा हें ॥६०॥

---

१ माझा आवडता भक्त. २ मला चित्त समर्पण केलें आहेस असा. ३ अर्जुना. ४ संसारगडाची. ५ आत्मज्ञानानें. ६ अहंकारानें. ७ माझें भाषण किंवा वेदवाक्य. ८ देहाहंकार. ९ मनामध्यें. १० निरर्थक. ११ बांधलेला. १२आपल्या अज्ञानानें.

**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥ भ्रा-**
**मयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥६१॥**

नारायण प्रकट तिष्ठतसे जगांत। गा अर्जुना सकल
भूतहृदाशयांत ॥ भूतें समस्त जड नाचवि जेविं चित्रें।
तो कालयंत्रगत तीं निजबुद्धिसूत्रें ॥ ६१ ॥

**तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ॥ तत्प्रसा-**
**दात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥६२॥**

जा भारता शरण त्यासचि सर्व भावें । कीं तोचि
सर्वहि अशा सरळ स्वभावें ॥ त्याच्या कृपें करुनि पा-
वसि थोर शांती। नारायणाख्यें पद शाश्वत तेंहि अंतीं॥६२

**इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद् गुह्यतरं मया ॥ वि-**
**मृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥**

मीं ज्ञान गा कथियलें तुजला असें हें। गुह्याहुनी परम
गुह्य असेंचि आहे ॥ नारायणोक्त तरि साग्र विचार भावें।
याचा करोनि मग इच्छिसि तें करावें ॥ ६३ ॥

**सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः ॥ इष्टोऽ-**
**सि मे दृढमतिस्ततो वक्ष्यामि ते हितम् ॥६४॥**

सर्वांत गुह्य गुज तेंचि पुन्हां परंतु। नारायणोक्त मम
भाषण आयकें तूं ॥ कीं मत्सखा अससि गा दृढबुद्धि-
मंत । या कारणें हित तुला कथितों पसंत ॥ ६४ ॥

**मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥**

---

१ हृदयांत. २ नारायणनामक. ३ मीं सांगितलेलें, वेदवाक्य.
४ वेदोक्त.

**मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ६५**

मच्चित मद्गतमती मम भक्त होई । माझाचि योजक नमीं मजलागिं पायीं ॥ नारायणासि मज पावसि सत्य वालीं । गा पैज तूं असति मत्प्रिय नित्यकालीं ॥६५॥

**सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥ अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ६६**

नारायणाप्रति समर्पुनि सर्व धर्म ॥ एका मला शरण ये समजोनि वर्म । त्वत्संचितें सकल पातककर्मतंतू॥ वारोनि मी करिन मुक्त भिऊं नको तूं ॥ ६६ ॥

**इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ॥ न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ६७**

त्वां ज्ञान हें न तपहीन नेरा वंदावें । किंवा अभक्त मनुजासि कधीं न द्यावें ॥ सांगूं नको श्रवणिं आस नसे जयासी । नारायणासि मज निंदिति वा तयांसी ॥६७॥

**य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ॥ भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ६८**

जो ज्ञान हें परम गुह्य बुझोनि आंगें । नारायण स्मरुनि मद्भजकांत सांगे ॥ मद्भक्तिं ते करुनि थोर अनन्यभावें । तो सत्य सत्य मम भक्त मलाचि पावे ६८

---

१ यज्ञ करणारा. २ खरोखर. ३ ईश्वराला. ४ तुझीं जन्मोजन्मीं सांचलेलीं प्रारब्धें. ५ श्रवण करण्याविषयीं. ६ अथवा. ७ समजोनी. ८ माझ्या भक्तांत. ९ माझी भक्ति. १०ऐक्यभावानें. ११ माझा.

**न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ॥**
**भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि६९**

त्याहूनि मानवजनांत शरीरधर्ता । कोणीच नाहिं नर मत्प्रियकर्मकर्ता ॥ होणार ही नचि तयाहुनि लोकिं धन्य । नारायणा शपथ मत्प्रिय पात्र अन्य ६९

**अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ॥**
**ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ७०**

संवाद हा नर पढे जरि साग्र नित्य । माझा तुझा परम धार्मिक आणि सत्य ॥ नारायणासि निजबोध-मखेंचि तेणें । गा पूजिलें मज असें मम बुद्धि जाणे ७०

**श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः ॥ सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान्प्राप्नुयात्पुण्यकर्मणां ७१**

श्रद्धालु जो न करि दूषित यास ऐसा । ऐकेल अर्थ न कळोनि जरी अपैसा ॥ तोही समस्त-अघमुक्तचि तत्प्रभावें । नारायणोक्त शुभ पुण्य पदासि पावे ॥७१॥

**कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ॥**
**कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥**

हें ऐकिलेंसि अथवा नचि कुंतिपुत्रा । नारायण स्मरुनि एकमनें पवित्रा ॥ अज्ञान मोह बरवा गत जाहला कीं । नाहीं? तुझा वद धनंजय तूंच लोकीं ॥ ७२ ॥

---

१ निश्चयेंकरून. खरोखर. देवा शपथ. २ पठन करील. ३ खरा. ४ आत्मज्ञान. ५ यज्ञानें. ६ भक्तिमान्. ७ अनायासें. आपोआप. ८ वेदोक्त. ९ शत्रूंचा नाश करून धन जिंकिणारा.

## ॥ अर्जुन उवाच ॥

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाऽच्युत ॥
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ७३

जिष्णू वदे सकल मन्मनमोह गेला । आली स्मृती तव कृपें निजलाभ झाला ॥ आतां असें विगतसंशय अच्युता मी । नारायणा करिन त्वद्वच मान्य नामीं ७३

## संजय उवाच

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ॥
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥ ७४ ॥

संवाद संजय ह्मणे अजि या परीचा । मीं वासुदेव विभुपार्थमहात्मयांचा । नारायण स्मरुनि अद्भुत ऐकिला हा । रोमांचकारि अतिहर्षद कीं अहाहा ॥ ७४ ॥

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ॥
योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयं ७५

श्रीव्यास सद्गुरु कृपेस्तव हा सुयोग । मीं ऐकिला परम गुह्य निजात्मयोग । योगेश्वर प्रकट कृष्णचि वर्णितांना । नारायणा शपथ संगेरिं ना भितांना ॥ ७५ ॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतं ॥
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ ७६ ॥

राया स्मरस्मरुनि पुण्यद हा तयांचा । संवाद अद्भुत धनंजयकेशवांचा ॥ नारायणोक्त निजबोध खरांच नामीं । होतो प्रहर्षित ह्मणूनि पुनः पुन्हां मी ७६

---

१ अर्जुन २ तुझें वचन. ३ उत्तम प्रकारें करून. ४ प्रत्यक्ष. ५ युद्धांत. ६ कृष्णार्जुनांचा. ७ वेदोक्त. ८ हर्षयुक्त.

**तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ॥**
**विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ७७**

तैसें स्मरस्मरुनि[1] अद्भुत तें अमूप[2] । नारायणात्मक नृपा हरिचें स्वरूप ॥ आश्चर्य मन्मनिं महा, परमेश नाभीं । होतों प्रहर्षित ह्मणूनि पुनः पुन्हां मी ॥ ७७ ॥

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ॥**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥७८॥**

योगेश कृष्ण जिकडे अजि पार्थ[3] जेथें । नारायण[4]-प्रिय धनुर्धर[5] वीर, तेथें । श्री सात्विकी विजय भाग्य विभूति राहे । तीनी-हि शाश्वत अशी मम बुद्धि आहे ७८

**इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगो नामाष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ ७९ ॥**

श्रीमान्षड्गुणवान कृष्ण भगवान् गीता श्रुतीसार हे ।
योगाची स्मृति द्यावया जनपदीं जी ब्रह्मविद्या स्वयें ॥
पार्थाला अठरावियांत वदला जो मोक्षसंन्यास तो ।
या चिंतामणिनंदनानिं हरी टीकामिसें बोलतो ॥१२॥

**इति श्रीमद्रामचरणा[6]रविंदमिलिंद[7]-चिंतामणिसूनु[8]-वासुदेवविरचितायां श्रीमन्नारायणभावदीपिकायां अष्टादशोऽध्यायः ॥ ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु. ॥**

---

१ आठवून आठवून. २ अनंत. ३ पृथेचा मुलगा अर्जुन. ४ ईश्वराचा आवडता भक्त. ५ धनुष्य धारण करणारा. ६ चरणकमल. ७ भ्रमर. ८ पुत्र.

## उपसंहार

. . अनंतवर्णाग्रियुतैर्वृत्तैः सिंहोन्नताभिधैः ॥
निबंधोयं निबद्धो वै सद्भक्तजनतुष्टये ॥ १ ॥

अनंत संज्ञक, चतुर्दश संख्याक अक्षरांनीं युक्त ज्याचे चरण आहेत अशा " सिंहोन्नता " ' मधुमाधवी, उद्धर्षिणी इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेल्या वसंततिलका वृत्तांत सद्भक्तजनांच्या संतोषासाठीं हा निबंध ( ग्रंथ ) रचिला आहे ॥ १ ॥

नारायणप्रसादेन श्रीमन्नारायणाज्ञया ॥
नारायणाख्यदीपोयं मया संदर्शितः खलु ॥२॥

खरोखर, सर्वेश्वराच्या प्रसादानें तसेंच त्या हृदयस्थ नारायणाच्या आज्ञेनें ( प्रेरणेनें ) हा नारायण नांवाचा ज्ञानदीप मीं उत्तमप्रकारें दाखविला आहे॥२॥

जगत्कल्याणसिद्ध्यर्थं स्वात्मनः सुखसिद्धये ॥
गीर्वाणार्थप्रबोधाय कृतोयं दीपिकोद्यमः ॥३॥

जगत्कल्याणसिद्धीसाठीं तसाच आपला आत्मा जो हृदयस्थ नारायण त्याच्या सुखसिद्धीसाठीं आणि संस्कृत भाषेचा अर्थबोध होण्यासाठीं हा नारायणभावदीपिकेचा उद्योग केला आहे ॥ ३ ॥

नारायणस्मृतिकरः परबोधदीपो नारायणेन
विजयस्य विषादकाले ॥ प्रज्वालितः किल
पुरा हरिणैव मेऽसौ संदर्शितोद्य निखिला-
त्मतमोपहत्यै ॥ ४ ॥

नारायणाचें स्मरण देणारा परमात्मबोधदीप श्री-

कृष्णानें अर्जुनाच्या शोकसमयीं जो पूर्वी प्रज्वलित केला तो हा त्या श्रीहरीनेंच सांप्रतकाळीं अशेष अज्ञान अंधतमाचा नाश होण्यासाठीं मला उत्तम प्रकारें दाखविला आहे ॥ ४ ॥

**नारायणेन सकलश्रुतिसारभूतं येनैव तत्कुरुवराय नराय गीतम् ॥ ज्ञानं नियुज्य हि कलौ भवमोक्षणाय तस्मै नमो भगवते कमलेक्षणाय ॥ ५ ॥**

नारायणानीं सर्व वेदार्थसारभूत ज्ञान कलियुगांत भवबंधमुक्तीकरितां योजून ज्याणींच तें कुरुकुलांतील श्रेष्ठ पुरुषाला ( अर्जुनाला ) सांगितलें अशा त्या सगुणस्वरूपी भगवान् कमलेक्षणाला नमस्कार असो ॥५॥

**॥ श्रीरामचंद्रचरणांबुरुहे मिलिंदश्चिंतामणेस्तनुभवः खलु वासुदेवः ॥ लक्ष्मीसुतः स्त्वहमृणत्रयमुक्तिकामो नारायणे निजकृतिं विनिवेदयामि ॥ ६ ॥**

श्रीसद्गुरु जो रामचंद्र त्याचे चरणकमलाचे ठायीं भ्रमर, चिंतामणीपासून उत्पन्न झालेला वासुदेव नामक मी एक लक्ष्मीपुत्र ज्याला निश्चयेंकरून देवर्षिपितरांच्या ऋणांतून मुक्त होण्याची इच्छा आहे तो नारायणाच्या नाममंत्रानें सुशोभित केलेलीही आपली नूतन कृति श्रीमन्नारायणाचे ठायीं समर्पण करितों.॥६॥

**श्रीमन्नारायणार्पणमस्तु.**

**इति श्रीनारायणभावदीपिका समाप्ता.**

# ॥ शुद्धिपत्र ॥

| फार्म | पृष्ठ | ओळ | अक्षर | आहे तें | पाहिजे तें. |
|---|---|---|---|---|---|
| १७ | टाय. | ६ | १२।१७ | नित्यस्मरणांत | नित्यनामस्मरणांत |
| १ | ५ | १९ | १९ | व | हि |
| ,, | ८ | १ | १२ | व | हि |
| २ | १३ | ११ | ११६ | संजयउ वाच | संजय उवाच |
| ,, | ,, | १७ | ९।१० | ता सू | तामू |
| ,, | १४ | ४ | ८।११ | टीका मिसें | टीकामिसें |
| ,, | १५ | ३ | ३ | ह | ह्ह |
| ,, | ,, | १० | ११।१४ | भोग कामी | भोगकामी |
| ,, | ,, | १६ | १७।१८ | न्न भ | न्न-भ |
| ,, | १६ | ६ | १७।१८ १९ | कुरूंतें | कुरू ते |
| ४ | ३९ | ३ | १४ | र्ष | र्षे |
| ,, | ४१ | १५ | ८ | रा | रां |
| ,, | ४८ | १६ | १७।१८ | क्तीत | क्तति |
| ६ | ६१ | ५ | १० | र | रा |
| ,, | ६७ | १३ | ४।८ | ध्यानस्थितीस | ध्यान, स्थितीस |
| ७ | ७४ | ५ | १४।१५ | पहा | पाह |
| ,, | ,, | ६ | ४ | श्या | श्य |
| ,, | ७६ | १४ | ११।१४ | महाभुज | महाभुज ! |
| ,, | ८२ | ३ | १३ | नि | स |
| ,, | ८४ | १४ | ४ | ति | ती |

| फार्म | पृष्ठ | ओळ | अक्षर | आहे तें | पाहिजे तें. |
|---|---|---|---|---|---|
| ८ | ८८ | ३ | २।३ | आणि | जनिं |
| ,, | ८९ | ७ | ४ | वै | वे |
| १० | ११४ | २२ | १४ | जिं | जि |
| ,, | ११५ | ७ | ६ | हं | ढं |
| ११ | १२४ | १३ | १५ | बं | वं |
| ,, | १२९ | १९ | १५ | भू | भु |
| १२ | १३९ | ८ | १७ | । | म |
| ,, | १४४ | ४ | ९ | आ | अ |
| १३ | १४५ | १९ | २१ | स | म |
| १४ | १६८ | ५ | २।३ | त्वकि | त्वीक |
| १५ | १६९ | १९ | १९ | स | से |
| १६ | १८८ | ३ | २ | हु | हू |
| ,, | ,, | १८ | १५ | भा | मा |
| १७ | १९४ | ५ | २ | मीं | मी |
| ,, | ,, | १० | ६।७ | तीनी | नीती |

मराठी ग्रंथ संग्रहालय.
...... नं.
ता.
ठाणे.